नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ७५ * | * नागपूर * | शुक्रवार, दिनांक १३ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## देशात कोरोनाचे ७१५४ वर सक्रिय रुग्ण

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
देशात कोरोना विषाणूचा नवीन प्रकार वेगाने पसरत आहे. ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या ७१५४ वर पोहोचली आहे. एका आठवड्यापासून दररोज सरासरी ४०० नवीन रुग्णांची नोंद होत आहे. तथापि, बुधवारी फक्त ३३ रुग्णांची नोंद झाली. केरळमध्ये सर्वाधिक २१६५ रुग्ण आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, गेल्या एका आठवड्यात कोरोनामुळे ३० जणांचा मृत्यू झाला आहे. नवीन व्हेरिएंटमुळे आतापर्यंत ७७ जणांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी ३ जणांना आपला जीव गमवावा लागला. महाराष्ट्रात २, मध्य प्रदेश आणि प. बंगालमध्ये प्रत्येकी १ रुग्णाचा मृत्यू झाला.

# डॉक्टरांच्या वसतिगृहाला धडकले एअर इंडियाचे विमान
# २४० प्रवाशांचा मृत्यू

### अहमदाबादमध्ये भीषण दुर्घटना : एका ब्रिटिश नागरिकासह २ जण बचावले : लंडनला जात होते विमान : माजी मुख्यमंत्री रुपाणी यांचेही निधन

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १२ :
अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान कोसळले आहे. विमानातील सर्व २४२ जणांचा मृत्यू झाला आहे. गुजरात पोलिस आयुक्तांच्या हवाल्याने वृत्तसंस्था एपीने ही माहिती दिली.

वृत्तसंस्था एएनआयने पोलिस आयुक्तांच्या हवाल्याने सांगितले की, विमानातील सीट क्रमांक ११-ए वर बसलेले भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक रमेश विश्वास कुमार हे अपघातातून वाचले. त्यांचा व्हिडिओही समोर आला आहे. आणखी एक जिवंत प्रवाशाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वी एपीने म्हटले होते की विमानातील सर्व लोकांचा मृत्यू झाला आहे.

विमानात २३० प्रवासी होते. यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि एका कॅनेडियन नागरिकाचा समावेश होता. उर्वरित १२ जण क्रू मेंबर्स होते. अपघातस्थळी सापडलेले बहुतेक मृतदेह इतके जळालेले आहेत की त्यांची ओळख पटवणे अत्यंत कठीण आहे. डीएनए चाचणीनंतरच त्यांची ओळख पटवणे शक्य होईल.

या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृत्यू झाला. भाजपचे राज्यसभा खासदार परिमल नाथवानी यांनी एक्स वर ही माहिती दिली. तथापि, काही वेळाने त्यांनी त्यांची पोस्ट डिलीट केली.

ज्या इमारतीला विमान धडकले त्या इमारतीत अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर राहतात. माहितीनुसार, १५ डॉक्टर जखमी झाले आहेत.

एअर इंडियाचे विमान क्रमांक एआय - १७१ ने दुपारी १:३८ वाजता उड्डाण केले आणि ते दुपारी १:४० वाजता कोसळले. मिळालेल्या माहितीनुसार, विमान विमानतळाच्या भिंतीजवळ आणि एअर कस्टम कार्गो ऑफिसजवळ कोसळले. विमान पडताच संपूर्ण परिसरात धुराचे लोट दिसले.




विमानाने उड्डाण केल्यानंतर काही वेळातच ते वसतिगृहाच्या इमारतीवर धडकले. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा त्याच विमानातील हा अखेरचा फोटो. बाजूच्या छायाचित्रात विमान कोसळण्यानंतर उठलेले धुराचे लोट आणि पसरलेला मलबा.







अहमदाबादमध्ये ज्या इमारतीवर एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान कोसळले होते, त्या इमारतीत अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे इंटर्न डॉक्टर राहत होते. हे इंटर्न डॉक्टरांचे वसतिगृह होते. विमान कोसळले तेव्हा तिथे ५० ते ६० इंटर्न डॉक्टर होते.

विमानात लागलेल्या आगीद्वारे निघणाऱ्या धुरामुळे वसतिगृहाची इमारत पूर्णपणे काळी पडली आहे आणि सर्वत्र फक्त कचरा आहे. आत जाऊन पाहिले तर वसतिगृहाचे अवशेष झाले होते.

अग्रलेख

## खरीखरी..

## दुर्दैवी अपघात

आज गुजरातच्या अहमदाबाद येथे एका बोईंग विमानाचा अपघात झाला. त्यामध्ये पायलट आणि 12 क्रू मेंबरसह एकूण 242 प्रवाशांचा समावेश होता. विशेष म्हणजे सुदैवाने त्यामधील एक सुदैवी किंवा नशीबवान प्रवासी बचावला आहे. ज्याप्रमाणे समुद्रात बुडलेल्या टायटॅनिकच्या अपघातातून काही नशीबवान प्रवासी बचावले होते. तसाच काहीसा प्रकार या सुदैवी नागरिकाचा आहे. विमान अपघात होणे म्हणजे विमानातील जवळजवळ सर्वच प्रवाशांच्या जीवावर बेतणे. असा आजवरचा अनुभव आहे. या विमानाने उड्डाण घेतल्यावर जितक्या उंचीवर हे विमान उडायला हवे. त्यापेक्षा अर्धी उंची जेमतेम पार केल्यावर या विमानाला पहिला झटका बसला. साधारणपणे 1200 फुटांवरती अशा प्रकारच्या विमानांचे उड्डाण झाल्यावर प्रवासाची सुरुवात होत असते. कारण त्या ठिकाणी ते विमान स्थिर होत असते. मात्र आज हे विमान अवघ्या 625 फुटांवर गेले आणि मग वर चढलेच नाही. उड्डाण घेत असतानाच विमानाच्या शेपटीला कुठल्यातरी भिंतीचा धक्का लागला. त्यानंतर हे विमान वर चढलेच नाही. हेलकावे घेत खाली खाली गेले आणि विमानाच्या हेलकाव्याबरोबर त्यात बसलेल्या दुर्दैवी प्रवाशांच्या हेल काव्याने किती गोंधळ उडाला असेल. याची कल्पना करणे कल्पनेच्याही पलीकडचे आहे. या बोइंग विमानात 169 भारताचे प्रवासी होते. सात पोर्तुगालचे प्रवासी होते. एक कॅनेडियन नागरिक होता. त्यासोबतच 11 लहान वयाच्या मुलांसह दोन नवजात बालके या अपघातामध्ये बळी पडली. आता असे सांगितले गेले आहे की, हे विमान बारा वर्षे जुने होते. उड्डाणापूर्वी दिल्लीवरून येताना दिल्लीत या विमानाची काटेकोर तपासणी झाली असावी. कारण कोणतेही विमान उड्डाण करण्यापूर्वी तशी तपासणी करण्याची प्रथा आहे. ते विमान एअर इंडियाचे बोइंग विमान आहे. भारतातील विमान उड्डाण करणारी एअर इंडिया ही पहिली कंपनी आहे. टाटांची मालकी ज्या कंपनीमध्ये असते. त्या कंपनीला सरकारने ताब्यात घेतले होते. पण शेवटी प्रचंड तोटा झाला आणि परिस्थिती हाताच्या बाहेर गेली. त्यामुळे पुन्हा एअर इंडिया टाटांच्या ताब्यात आली. टाटा यांच्या कारभाराबद्दल, त्यांचा प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुख कारभाराबद्दल सर्व भारतीयांना नवीन काही सांगावे. असे आम्हाला आता वाटत नाही. परंतु टाटांनी कंपनी ताब्यात घेतल्यानंतर अजूनही एअर इंडियाचा कारभार जसा पाहिजे. तसा व्यवस्थित झाला नाही. हे मान्यच करावे लागेल. तरीही एअर इंडियाच्या कार्यपद्धतीला एका विमान अपघातामुळे दोष देणेही योग्य वाटत नाही. सध्याच्या काळात अपघात झाला नाही असा दिवस जात नाही. प्रवासी बस, रेल्वे, खाजगी कार अपघात, एक्सप्रेस वे आणि हायवेवर होणारे अपघात वगैरे सारख्या अपघातामधून भारतात काही मरतात आणि काही वाचतात. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे विमानाच्या अपघातात सहसा कोणी वाचत नाही. तरीही या विमानातील एक प्रवासी वाचण्याचा चमत्कारच झाला आहे, असे आता म्हणावे लागेल. पंधरा-वीस वर्षांपूर्वी या क्षेत्रात अनेक कंपन्या आल्या होत्या. त्यापैकी कितीतरी कंपन्यांना आता टाळे लागले आहे. त्यात विजय मल्ल्याच्या किंगफिशर सारख्या अनेक कंपन्यांचे पार वाटोळे झालेले आहे. एअर इंडिया ही सरकारी कंपनी आणि दुसरी सध्याच्या काळात अत्यंत वेळेवर धावणारी कंपनी म्हणजे इंडिगो ही आहे. इतरही लहान मोठ्या कंपन्यांचे सध्यातरी बऱ्यापैकी चाललेले आहे. आजच्या अपघाताच्या मुळाशी जाऊन अपघाताची कारणे शोधावी लागतील. एअर इंडियाच्या मागचे शुक्लकाष्ट अजूनही का बरे दूर होऊ शकत नाही. याचा आढावा सुद्धा घ्यावा लागेल. आज देशात इंडिगो पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर एअर इंडियाचा क्रमांक लागतो. त्यामुळेच आता या विमान अपघाताचा सर्वांग परिपूर्ण चौकशी अहवाल हाती आल्यावरच त्यावर भाष्य करता येईल. विमानातील तमाम प्रवाशांच्या जीवाची झालेली हानी भरून निघणे शक्य नाही. त्यांच्या कुटुंबाला बसलेला धक्का त्याची कल्पना करता येणे शक्य नाही. नवजात बालके आणि जी काही अत्यंत लहान वयाची मुले, ज्यांनी अजून पुरती दुनिया पाहिलीच नाही आणि या दुनियेतून त्यांना अलविदा व्हावे लागले. या सगळ्या गोष्टी म्हणजे दुःखाची परिसीमा आहे. काळीज हे लावून टाकणाऱ्या या अपघातामध्ये ज्यांना आपला जीव गमवावा लागला. त्या सर्व दुर्दैवी प्रवाशांना आणि अपघात स्थळी ज्यांना आपला नाहक जीव गमवावा लागला. त्या सर्वांना आमची अश्रुपुरीत श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## अपघातग्रस्त विमानात ७ मराठी प्रवासी

### क्रू अपर्णा महाडिक या सुनील तटकरेंच्या भाच्याच्या पत्नी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :
गुजरातच्या अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे एक प्रवासी विमान कोसळले. त्यात २४० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला.



मृत प्रवाशांत ४ केबिन क्रू व ३ प्रवासी अशा एकूण ७ मराठी प्रवाशांचाही समावेश होता. विशेष म्हणजे क्रू सदस्या अपर्णा महाडिक ह्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नातलग असल्याची माहिती समोर आली आहे.

एअर इंडियाचे एआय १७१ विमान अहमदाबादहून लंडनच्या दिशेने झेपावले होते. या विमानाने दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी उड्डाण केले. पण त्यानंतर ३ मिनिटांतच ते एका नागरी इमारतीवर कोसळले. विमान कोसळल्यानंतर त्यात एक मोठा स्फोट झाला. या दुर्घटनेत २४० जणांचा बळी गेलो.

एअर इंडियाच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमानात २४२ प्रवासी होते. त्यात १२ क्रू मेंबर्स व 230 प्रवासी होते. एक क्रू मेंबर असणाऱ्या अपर्णा महाडिक (कर्मचारी संख्याः ८०००८८७२) या खासदार सुनील तटकरे यांचा सख्खा भाचा अमोल यांच्या पत्नी आहेत. त्या एअर इंडियात सीनियर केबिन क्रू म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे पती अमोल स्वतःही एअर इंडियामध्ये पायलट म्हणून कार्यरत आहेत. ते दोन तासांपूर्वी दिल्लीत लँड झालेत. त्यानंतर ते तत्काळ अहमदाबादला जाणार आहेत, असे महाडिक कुटुंबीयांनी सांगितले.

अपर्णा महाडिक यांच्याशिवाय महादेव पवार, आशा पवार, मयूर पाटील, मैथिली पाटील, दीपक पाठक, रोशणी सोंघरे या ६ मराठी प्रवाशांचाही या दुर्घटनेत बळी गेला आहे.

### रमेश विश्वास कुमार बचावले

अहमदाबाद विमान अपघातात दोन जण बचावले. एकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दुसरा जखमी प्रवासी रमेश विश्वास कुमार आहे. तो विमानाच्या ११ अ वर बसला होता. रमेशचा एक व्हिडिओ समोर आला आहे .



## लिखित युक्तिवादानंतर आमदारकीबाबतचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याची शंका व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजयाला आव्हान देणारी निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल आहे. याचिकेवर न्या. प्रवीण पाटील यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली.

गुडधे यांनी लिखित युक्तिवादाची परवानगी मागितल्यावर सोमवार, १६ जूनपर्यंत लिखित युक्तिवाद सादर करण्याचे निर्देश दिले. न्यायालयात लिखित युक्तिवाद सादर झाल्यावर न्यायालय फडणवीसांच्या आमदारकीबाबतचा निर्णय राखून ठेवणार आहे.

### फडणवीस, राज ठाकरे भेटीने
## भावांची युती वांध्यात?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
मुंबईतील ताज लँड्स अँड हॉटेलमध्ये आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीसाठी राज ठाकरे प्रथम हॉटेलवर पोहोचले. त्यानंतर अर्ध्या तासातच फडणवीस तिथे पोहोचले. त्यानंतर या दोन्ही नेत्यांत जवळपास दीड तास प्रदिर्घ चर्चा झाली.

त्यात कोणत्या मुद्यांवर चर्चा झाली हे स्पष्ट झाले नाही. पण हे दोन्ही नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र आलेत. त्यामुळे याविषयी वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. फडणवीसांच्या वेळापत्रकात भेटीचा उल्लेख नव्हता.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या व्यस्त वेळापत्रकात ताज लँड्स हॉटेलचा कुठेही उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांची राज यांच्यासोबत झालेली ही अनपेक्षित भेट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णायक ठरेल का? विशेषतः ठाकरे गटासोबतच्या संभाव्य युतीला ब्रेक लावून मनसे लोकसभा निवडणुकीसारखाच पुन्हा भाजपला पाठिंबा देणार का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, या भेटीवर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ाज ठाकरे यांनी कुणाला भेटावे हा त्यांचा प्रश्न आहे. ते आम्हाला बांधील नाहीत. पण त्यांना महाराष्ट्राच्या मनात काय आहे याला अनुसरून निर्णय घ्यायचा की गुजरातधार्जिणे धोरण अवलंबणाऱ्या फडणवीसांच्या हिताचा घ्यायचा हे सर्वस्वी राज ठाकरे यांना ठरवायचे आहे, असे त्या म्हणाल्यात.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी
## कालबद्ध कार्यक्रम जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाच्या वतीने कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

या माध्यमातून आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानुसार निवडणूक आयोगाने कालावधीनुसार टप्पानिहाय कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगर परिषदा तसेच नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना दिले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवकरात लवकर घेण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाच्या वतीने केला जात आहे. त्यानुसार राज्य सरकारला प्रभाग रचना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासाठी आता निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषद आणि नगरपंचायत यांच्या प्रमुखांना नियमबद्ध कार्यक्रम आखून प्रभागाची रचना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या नियमबद्ध कार्यक्रमाच्या तारखा देखील जाहीर करण्यात आल्या असून, त्या कालावधीत सर्व शासकीय अधिकाऱ्यांना ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग रचना करण्यासाठी आयोगाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ११ जून ते १६ जून दरम्यान प्रगणक गटाची मांडणी करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात आले आहेत.

या सर्व प्रक्रियेनंतर राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यासाठी २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यानचा वेळ देण्यात आला आहे.

## प्रभाग रचनेवर विश्वास नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भात अधिकारी करत असलेल्या प्रभाग रचनेबद्दल आम्हाला विश्वास नसल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

अमित शहा यांना मुंबईवर ताबा मिळवायचा आहे. त्यामुळे अमित शहा आणि त्यांचा पक्ष 'एसंशि' कोणत्याही थराला जाईल. मात्र, आम्ही ते होऊ देणार नाही, असे राऊत म्हणाले.

### संजय राऊत यांनी दाखवला अविश्वास



महानगर पालिका निवडणुकीमध्ये प्रभाग रचनेसंदर्भात निवडणूक आयोगाने आदेश दिले आहेत. ही प्रभाग रचना करणारे अधिकारी, सरकार आणि निवडणूक आयोग, यावर कोणाचाही विश्वास नाही. आपल्याला सोयीचे ठरेल, अशा पद्धतीने वार्ड फोडले जातील, तशाच प्रभाग रचना केल्या जातील. त्याचा फायदा निवडणुकीत मिळवला जाईल, असे ते म्हणाले.




## अभियंत्याकडे १९ भूखंड ३ टोलेजंग इमारती

■ वृत्तसंस्था
हैदराबाद, दि. १२ :
मंगळवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) तेलंगणा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नूने श्रीधर यांच्या १३ ठिकाणी छापे टाकले. यादरम्यान कोट्यवधी रुपयांची बेकायदेशीर मालमत्ता जप्त करण्यात आली. एसीबीने या प्रकरणाची माहिती दिली.

श्रीधरकडे सापडलेली मालमत्ता त्याच्या ज्ञात उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. हैदराबादमध्ये त्याच्याकडे १९ उत्तम निवासी भूखंड, एक व्हिला, ३ इमारती आणि अनेक फ्लॅट आहेत. याशिवाय, त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोने आणि बँक बॅलन्स देखील आहे. श्रीधरने त्याच्या मुलाचे थायलंडमध्ये लग्न केले होते.

## राहुल गांधींना काँग्रेस नेतेच गांभीर्याने घेत नाहीत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी मोदी सरकारवर सातत्याने टिका करत आहे. त्यांनी अकरा वर्षांच्या काळात भाजप सरकारने काहीच केले नाही. फक्त स्वप्न दाखवून लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप केला होता. त्यावर केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी थेटच भाष्य केले आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी रोज भाजपवर तुटून पडत आहेत. अकरा वर्षांच्या कार्यकाळात भाजपने काहीच केले नाही. फक्त स्वप्ने दाखवून दिशाभूल केली जात असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. याबाबत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांना विचारणा केली असता ते म्हणाले, राहुल गांधी यांना काँग्रेसचेच नेते गांभीर्याने घेत नाहीत, तुम्ही कशाला घेता, असा टोला लगावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपने अकरा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. या अकरा वर्षात भाजपने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती गडकरी यांनी दिली. यावेळ त्यांनी राहुल गांधी आणि काँग्रेस नेते यावर करीत असलेली टीकाटीपणी आणि आरोपांचाही चांगलाच समाचार घेतला.

ते म्हणाले, काँग्रेसच्या साठ वर्षांच्या कार्यकाळात जे झाले नाही ते आम्ही अवघ्या अकरा वर्षांत करून दाखवले. ही कामगिरीची देशाच्या इतिहासात नोंद करण्यासारखी आहे.



## नवीन खनिज धोरण सर्वसमावेशक असेल : शंभूराज देसाई



**मुंबई :** राज्य शासन नवीन खनिज धोरण करत आहे. प्रस्तावित खनिज धोरण सर्वसमावेशक बनविण्यासाठी सर्वांच्या सूचनांचा विचार केला जाईल, प्रत्येकाने आपली मते याबाबत मांडावीत, असे आवाहन खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. मंत्रालय येथे नवीन प्रस्तावित खनिज धोरणाबाबत आढावा बैठक पार पडली या बैठकीत खनिकर्म मंत्री श्री. देसाई बोलत होते. यावेळी वित्त राज्यमंत्री डॉ.आशिष जयस्वाल, खनिकर्म विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इकबालसिंह चहल, खनिज कायदा सल्लागार ॲड बी.के.शुक्ला, राजेंद्र कोरडे उपस्थित होते. राज्य शासनाने खाणपट्टे सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही, तज्ज्ञ व जाणकार यांची मते, नागरिकांची मते, केंद्र व राज्य शासन यांचा समन्वय, राज्यस्तरावर खाण, वन, पर्यावरण आणि महसूल विभागांमधील समन्वयासाठी यंत्रणा तयार करणे, भूवैज्ञानिक अहवालांच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करणे, दफ्तर दिरंगाई टाळणे, खाणपट्टे लिलाव प्रक्रियेमध्ये व इतर कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्र अभ्यासाचा अधिकाधिक वापर करणे, महसूल विभागाकडे उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींची माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देणे, ज्या खाणी कार्यरत नाहीत अथवा कालबाह्य झालेल्या आहेत त्यांचे विश्लेषण करणे यासह इतर सर्वसमावेशक बाबींचा अभ्यास करून लवचिक आणि आधुनिक धोरण तयार करणे गरजेचे असल्याचेही खनिकर्म मंत्री देसाई यांनी यावेळी सांगितले.

## दरडप्रवण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जाळ्या बसविण्याचे काम पूर्ण करावे

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुंबई महापालिकेला निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

मुंबईत दरडप्रवण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा जाळ्या बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे. अतिधोकादायक ठिकाणालगत एसआरए, म्हाडा यांचे प्रकल्प सुरू आहेत अशा प्रकल्पांमध्ये अतिधोकादायक ठिकाणच्या रहिवाशांना सामावून घेण्याबाबत धोरण तयार करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

कुर्ला विधानसभा मतदारसंघातील विविध समस्यांबाबत आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. आमदार मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे,



उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, म्हाडाचे मिलिंद बोरीकर आदी अधिकारी उपस्थित होते.

या भागातील चुनाभट्टी येथे डोंगराळ भागात वारंवार दरड कोसळण्याच्या घटना होत असल्याने तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत आमदार श्री.कुडाळकर यांनी मागणी केली होती. त्याचबरोबर चांदीवली येथील मतदारसंघात अशाच प्रकारचा भाग असल्याचे आमदार श्री.लांडे यांनी यावेळी सांगितले होते. मदत व पुनर्वसन विभागाकडे असलेल्या निधीतून मुंबईतील दरडप्रवण भागातील सुमारे 42 झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा जाळ्या बसविण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

अतिधोकादायक भागावर लक्ष केंद्रीत करावे. याचबरोबर अशा धोकादायक ठिकाणालगत म्हाडा, एसआरएचे प्रकल्प सुरू असतील तर त्या प्रकल्पांमधील काही घरांमध्ये अतिधोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना सर्वोच्च प्राधान्य देता येईल का याबाबत धोरण तयार करावे. अशा धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे श्री. शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.

कुर्ला येथील तकीया वॉर्ड भागात असलेल्या 20 एकर जमिनीवरील घरांसाठी क्लस्टर योजना राबविण्याची विनंती यावेळी करण्यात आली. कुर्ला विधानसभा मतदारसंघातील रेल्वे हद्दीतील झोपडपट्टीधारकांच्या समस्यांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

## कंत्राटी कामगारांचे वेतन थेट बँक खात्यात जमा करावे : अण्णा बनसोडे



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कंत्राटी कामगारांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमानुसार कंत्राटदारांमार्फत निश्चित केलेल्या किमान वेतन दरानुसार थेट बँक खात्यात वेतन जमा केले जावे, असे आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

विधिमंडळ समिती कक्षात विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीधर, पोलीस आयुक्त प्रवीण पवार दूरदृश्यप्रणाली द्वारे बैठकीत सहभागी झाले होते. तसेच सहाय्यक कामगार आयुक्त नितीन पाटणकर, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे यशवंत भोसले उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी कंत्राटदारांमार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांच्या सेवा घेतल्या आहेत. या सेवेपोटी महानगरपालिकेकडून सदर वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा केले जात आहे. कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात जमा केलेल्या वेतनाची तपासणी महानगरपालिका अधिकाऱ्यांनी करावी. कंत्राटदाराने २५० कामगारांना कामावरून काढून टाकले असून त्यांना परत कामावर घेण्यासाठी औद्योगिक न्यायालयाने निकाल दिला आहे, यानुसार कंत्राटदाराने त्यांना पुन्हा कामावर घेण्यासाठी कार्यवाही करावी, अशा सूचना विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांनी केल्या.

महानगरपालिका आयुक्त जी. श्रीधर यांनी कंत्राटी कामगारांच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास दिली गेली असून त्याने ती कामगारांना अदा केली नसल्याचे आढळून आल्याने त्याच्यावर कारवाई केली जात आहे. तसेच काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार परत कामावर नेमणुका देण्याबाबत कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

## भारताच्या निवडणूक प्रामाणिकतेचा जागतिक व्यासपीठावर गौरव

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

भारताच्या निवडणूक प्रक्रियेतील प्रामाणिकता, व्यापकता आणि विविधतेचा जागतिक स्तरावर गौरव करत, भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल स्वीडनमध्ये झालेल्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इलेक्टोरल इंटिग्रिटी मध्ये प्रमुख भाषण केले. या परिषदेत त्यांनी भारतातील निवडणूक व्यवस्थापनाची भूमिका, पारदर्शकता व जागतिक पातळीवरील निवडणूक संस्थांसाठी भारताच्या योगदानावर प्रकाश टाकला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, भारतात निवडणुका केवळ निवडणूक आयोगापुरती मर्यादित नसून त्यात राजकीय पक्ष, उमेदवार, सामान्य व विशेष निरीक्षक, पोलिस यंत्रणा आणि माध्यम प्रतिनिधी अशा अनेक घटकांची सक्रिय व पारदर्शक भूमिका असते. या सर्वांचा समन्वय साधत सुमारे दोन कोटी कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने निवडणूक आयोग एक विशाल संस्था म्हणून कार्य करते, जी अनेक देशांच्या सरकारांपेक्षा आणि जागतिक कंपन्यांपेक्षा अधिक व्यापक आहे. १९५१-५२ मध्ये १७.३ कोटी मतदारांपासून सुरू झालेला भारताचा निवडणूक प्रवास २०२४ मध्ये ९७.९ कोटी मतदारांपर्यंत पोहोचला आहे. सुरुवातीच्या दोन लाख मतदान केंद्रांपासून आता ही संख्या १०.५ लाखांपर्यंत पोहोचली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ७४३ राजकीय पक्षांनी सहभाग घेतला, ज्यामध्ये सहा राष्ट्रीय पक्ष, ६७ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर नोंदणीकृत पक्षांचा समावेश होता. एकूण २०,२७१ उमेदवारांनी ६.२ दशलक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांद्वारे देशभर निवडणुका लढवल्या.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नमूद केले की, १९६० पासून आजपर्यंत सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना दरवर्षी मतदार यादीचा पुरवठा केला जातो. यात दावे, हरकती आणि अपील्सची व्यवस्थाही आहे. ही प्रक्रिया भारतातील निवडणूक प्रणालीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधोरेखित करते. प्रत्येक मतदार महत्त्वाचा आहे, हे दाखवत ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की पहिल्यांदा मतदान करणारे, ८५ वर्षांहून अधिक वयाचे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार, तृतीयपंथी नागरिक आणि अतिदुर्गम भागातील मतदारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात येते. हिमाचल प्रदेशातील ताशिगंगसारख्या उंचावरील मतदान केंद्रापासून एकाच मतदारासाठी उभारलेल्या बूथपर्यंत, "कोणताही मतदार मागे राहू नये" हे भारतीय निवडणूक आयोगाचे ब्रीद आहे.

परिषदेच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मेक्सिको, इंडोनेशिया, मंगोलिया, दक्षिण आफ्रिका, स्वित्झर्लंड, मोल्दोवा, लिथुआनिया, मॉरिशस, जर्मनी, क्रोएशिया, युक्रेन आणि युनायटेड किंगडममधील त्यांच्या समकक्ष अधिकाऱ्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेतल्या. यामध्ये मतदार सहभाग, निवडणूक तंत्रज्ञान, प्रवासी भारतीयांचे मतदान आणि संस्था क्षमतावृद्धी यावर चर्चा झाली. भारताची निवडणूक प्रणाली ही केवळ जगातील सर्वात मोठी नाही, तर सर्वात विश्वासार्ह व समावेशक आहे, हे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले, असे निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

## पॅनकार्ड क्लब गुंतवणूदार ठेवीबाबत मंत्रालयात बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

पॅनकार्ड क्लब लिमिटेडमध्ये गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली आहे. या गुंतवणूकदारांना त्यांचा पैसा परत मिळाला पाहिजे, यासाठी गृह विभागाने सेबी, एनसीएलटी यांच्या समन्वयाने सर्व कायदेशीर प्रकिया तातडीने पूर्ण करून गुंतवणूकदारांचा पैसा परत देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. यावेळी गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांनीही या बाबतीत सर्व पयार्यांचा उपयोग करून गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याच्या सूचना दिल्या. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये पॅनकार्ड क्लब लि. बाधित गुंतवणूकदारांच्या परतावा प्रक्रियेबाबत मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, आर्थिक गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस महासंचालक सुरेश मेकाले, आर्थिक गुन्हे शाखेचे राहुल देशमुख, उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे यांच्यासह संबधित अधिकारी उपस्थित होते.

## कसारा गावातील शासकीय जमिनींचे खातेफोड करून पायाभूत सुविधा द्या : गणेश नाईक



**मुंबई :** शहापूर तालुक्यातील कसारा ग्रामपंचायती हद्दीत वन विभाग, महसूल आणि रेल्वे विभागाची जागा आहे. या जागांचे ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर खातेफोड करावी. जेणेकरून तेथील ग्रामस्थांना पायाभूत सुविधा देण्यात येतील, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले. शहापूर तालुक्यातील मोखावणे कसारा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कसारा येथील जमिनी संदर्भात व गावासाठी गावठाण मंजुरी संदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, माजी आमदार पांडुरंग बरोरा, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिस्वास, मुख्य वन संरक्षक रविकिरण गोवेकर, अपर प्रधान मुख्य वन संरक्षक नरेश झिरमुरे, उपसचिव विवेक होशिंग, वन विभागाचे विशेष कार्य अधिकारी उदय ढगे आदी उपस्थित होते.

कसारा गावात वन विभाग, महसूल आणि रेल्वे विभागाची जागा आहे. या जागांचे सीमांकन न झाल्याने तेथे रस्ते, विद्युत, पाऊलवाट आदी सुविधा देता येत नाहीत. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागतो. ही समस्या सोडविण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने या जागांची खातेफोड करावे. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा निर्माण करून द्याव्यात. तसेच प्रलंबित वनहक्क दावे तातडीने निकाली काढण्यात यावेत. सागरी किनारा क्षेत्रातील गावांमध्ये वन जमिनी अथवा कांदळवन भागातील स्मशानभूमीची माहिती गोळा करावी.

## वादळामुळे कोसळली ४५ फूट उंच भगवान बुद्धांची मूर्ती



■ महासागर प्रतिनिधी
पवनी (भंडारा), दि. १२ :

ऐतिहासिक आणि प्राचीन बौद्ध नगरीतील चंद्रमणी बौद्ध विहार येथील आकर्षक ४५ फूट उंच बुद्ध मूर्ती १० जूनला आलेल्या वादळी वाऱ्याने कोसळली.

पवनी ही नगरी प्राचीन बौद्ध नगरी विदर्भात प्रसिद्ध आहे. सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धमार्चा प्रसार करण्यासाठी श्रीलंकेला दिवा पाठवले होते. तेव्हा त्यांच्या प्रवास वर्णनात पवनी या शहराचा उल्लेख येतो. चंद्रमणी विहार येथे तथागत गौतम बुद्ध यांचा केस असल्याचे नमूद आहे. चंद्रमणी विहार समितीने परिश्रम करून व बौद्ध उपासकांच्या सहकायार्ने पवनी शहरात ४५ फूट उंच अशा भव्य दिव्य मूतीर्ची स्थापना करण्यात आली होती. १० जूनला सायंकाळी पाच ते सहाच्या दरम्यान निसर्गाच्या वादळी वाऱ्याने तथागतांची मूर्ती कोसळली आहे. ही घटना पवनीकरांच्या मनाला चटका लावून गेली आहे.

## ५००० हून अधिक एसटी विशेष बसेस आषाढी यात्रेसाठी सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी राज्य सरकारकडून भव्य नियोजन करण्यात आले आहे. यंदा राज्य परिवहन महामंडळातर्फे ५२०० विशेष एसटी बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी पंढरपूर येथे अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिली.

यात्रेच्या काळात राज्याच्या कोणत्याही गावातून ४० अथवा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास, त्यांच्या गावातून थेट पंढरपूरसाठी एसटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित आगाराशी संपर्क साधावा, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले. या बससेवेवर सरकारच्या "महिला सन्मान योजना" अंतर्गत महिलांना ५०% सवलत आणि "अमृत ज्येष्ठ नागरिक योजना" अंतर्गत ७५ वर्षावरील नागरिकांना मोफत प्रवास सुविधा मिळणार आहे.



**जिल्हानिहाय प्रवासाचे नियोजन**

* चंद्रभागा बसस्थानक - मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा
* भिमा देगाव स्थानक - औरंगाबाद (छ.सं.नगर), नागपूर, अमरावती
* विठ्ठल कारखाना - नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर
* पांडुरंग स्थानक - सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

प्रवासीसेवेसोबतच बस चालक व वाहक यांच्यासाठीही प्रवासात योग्य सोयी-सुविधा देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राहण्याची व्यवस्था, गरम पाण्याची सोय, तसेच बसस्थानकांवर गाड्यांची देखभाल-दुरुस्ती आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक यांचा समावेश आहे.

प्रवाशांनी तिकीट न काढता प्रवास केल्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी १२ ठिकाणी तपासणी नाके, तसेच २०० एसटी सुरक्षा अधिकारी आणि कर्मचारी २४ तास पंढरपूर परिसरात तैनात राहणार आहेत. यात्रेच्या दिवशी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने तैनात करण्यात येणार आहेत.

गर्दीचे व्यवस्थापन सुकर करण्यासाठी यंदा पंढरपूरमध्ये चार तात्पुरती बसस्थानके - चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज), विठ्ठल कारखाना उभारली जाणार आहेत. प्रत्येक बसस्थानकावर पिण्याचे पाणी, शौचालय, चौकशी कक्ष, आरक्षण केंद्र, फलक आदी सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

मागील वर्षी एसटीने ५ हजार विशेष बसेसद्वारे २१ लाख भाविकांचा सुरक्षित प्रवास केला होता. यंदा ही संख्या आणि सुविधा अधिक व्यापक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भाविकांनी या सुरक्षित व सवलतीच्या एसटी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. राज्य शासनाचे हे व्यापक नियोजन यात्रेतील बिनधास्त दर्शन व सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# सरकारी कामासाठी 'वजन' हवंच : जयंत पाटील

### जालन्यातील ३५ कोटींच्या अफरातफरवर तिव्र प्रतिक्रिया

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

सरकारी कार्यालयात गेल्यावर कोणतेच काम वजन ठेवल्याशिवाय होत नाही, असा सर्वसामान्यांचा अनुभव बनला आहे, अशी तिखट प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी दिली आहे.



ते जालना जिल्ह्यात उघड झालेल्या तब्बल ३४ कोटी ९७ लाख रुपयांच्या शेतकरी अनुदान घोटाळ्यावर बोलत होते. सोशल मीडियावरून आपली भूमिका मांडताना जयंत पाटील यांनी "राज्यात भ्रष्टाचार बिनधास्त फोफावत आहे; ही धोक्याची घंटा आहे" असा इशाराही दिला.

२०२२-२३ व २०२४ मध्ये अतिवृष्टी, गारपीट व पूर या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतकरी नुकसानीसाठी शासनाने दिलेल्या अनुदान वितरणात जालना जिल्ह्यात २६ तलाठ्यांनी बनावट शेतकरी दाखवून सुमारे ३५ कोटींचा गैरव्यवहार केल्याचे चौकशीतून उघड झाले आहे. या प्रकारामुळे शासन यंत्रणेवर विश्वास डळमळीत झाला असून, शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

जयंत पाटील यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिलंय, "राज्याच्या प्रशासनावर वचक राहिलेला नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे. जर दोषींवर तत्काळ कठोर कारवाई झाली नाही, तर हे प्रकार आणखी वाढतील."

त्यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

जयंत पाटील यांच्या मते, सरकारी यंत्रणांमध्ये काम वेळेवर होणे दुर्मीळ झाले आहे. वजन, ओळख, किंवा खाजगी हात चालविल्याशिवाय काम होत नाही, ही लोकशाहीतील बिघडलेली स्थिती असल्याची खरमरीत टीका त्यांनी केली आहे.

शासनाच्या विविध योजना, निधी आणि सवलती यांचा लाभ जेव्हा गरजूंना न मिळता काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या घशात जातो, तेव्हा लोकशाहीला हादरा बसतो. जालना घोटाळा हा अशाच एका गंभीर प्रशासकीय अपयशाचं दर्शन घडवतो. आता पाहावं लागेल की दोषींवर खरोखर कारवाई होते की नेहमीप्रमाणे ही फाईलही 'वजन'ाच्या प्रतीक्षेत राहते.

## आश्रमशाळांमध्ये होणार प्रवेशाचा सण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागाकडून शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी एक आगळावेगळा उपक्रम राबवला जात आहे. १६ जून रोजी 'प्रवेशोत्सव' साजरा करण्यात येणार असून, नव्याने दाखल होणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे स्वागत थेट लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या उपक्रमामागे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईकेंची अभिनव संकल्पना असून, प्रवेशदिन केवळ एक औपचारिकता न राहता विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा आणि प्रेरणेचा दिवस ठरावा, असा उद्देश त्यामागे आहे.

आदिवासी भागांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. मात्र पहिल्याच दिवशी शाळेच्या अंगणात पाऊल टाकताना त्यांना सन्मानाने आणि प्रेमाने वागणूक मिळावी, यासाठी 'प्रवेशोत्सव' उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती मंत्री अशोक वुईकेंनी दिली.

या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी राज्यातील सर्व खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिकारी यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फक्त भाषणं नव्हे, प्रत्यक्ष हजेरी आणि विद्यार्थ्यांशी संवाद आवश्यक आहे, असा संदेश वुईकेंनी दिला आहे.

प्रवेशोत्सवच्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, मिठाई, स्वागत गीत, आणि शाळेतील वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून ओळख परेड अशा स्वरूपात उत्सवी वातावरणात त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल.




मोजरी, अमरावती येथे बच्चुभाऊ कडू यांच्याशी आंदोलनात संवाद करताना जालन्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटना नेते साईनाथ चिन्नदोरे, वरिष्ठ पत्रकार लियाकत अली खान यासिर, सीए गोविंद प्रसाद मुंदडा दिसत आहे

## सरकारच्या प्रभाग रचनेवर विश्वास नाही : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात अधिकारी करत असलेल्या प्रभाग रचनेबद्दल आम्हाला विश्वास नसल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. अमित शहा यांना मुंबईवर ताबा मिळवायचा आहे. त्यामुळे अमित शहा आणि त्यांचा पक्ष 'एसंशि' कोणत्याही थराला जाईल. मात्र, आम्ही ते होऊ देणार नाही, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.



महानगरपालिका निवडणुकीमध्ये प्रभाग रचनेसंदर्भात निवडणूक आयोगाने आदेश दिले आहेत. ही प्रभाग रचना करणारे अधिकारी, सरकार आणि निवडणूक आयोग, यावर कोणाचाही विश्वास नाही. हे आम्ही विधानसभेला पाहिले आहे. आपल्याला सोयीचे ठरेल, अशा पद्धतीने वार्ड फोडले जातील. तशाच प्रभाग रचना केल्या जातील. त्याचा फायदा निवडणुकीत मिळवला जाईल. या पद्धतीने काम करणारे सरकार आहे. पैशांची ताकद देखील त्यांच्याकडे प्रचंड आहे. प्रशासनावर दहशत निर्माण केली जाईल, हे सत्य आहे. त्यामुळे कोणी यावर आक्षेप घेतला असेल तर त्याकडे गांभीर्याने पाहायला हवे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. प्रभाग रचना करताना निपक्षपणाने काम होणे गरजेचे आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने जागल्याची भूमिका घ्यायला हवी. आयोगाने सरकारला दिलेल्या अधिकाऱ्यांचा गैरवापर तर होत नाही ना. हे पाहायला हवे.

## पुण्यात महिलेचा खून करून उत्तर प्रदेशात पळालेल्या आरोपीला अटक

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :

पुण्यातील आंबेगाव परिसरात धबाडी येथे सर्व्हिस रस्त्यावर एका महिलेच्या डोक्यात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने धारदार हत्याराने वार करुन तिचा खून केल्याचा प्रकार 20 मे रोजी उघडकीस आला होता. याप्रकरणात सहाय्यक पोलिस निरीक्षक समीर कदम यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल केला होता. या गुन्हयाचा पोलिसांनी कौशल्यपूर्वक तपास करत, 320पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करताना, पावसात चमकलेल्या विजेच्या प्रकाशात मयत महिला ही एका रिक्षात बसत असताना दिसुन आली. संबंधित रिक्षाची माहिती काढण्यासाठी पुणे आरटीओकडून टीव्हीएस कंपनीच्या पुणे शहरातील रजिस्टर असलेल्या दहा हजार 794 रिक्षांची माहिती प्राप्त करुन त्या रिक्षापैकी 1200 रिक्षांची वाहतूक विभागाकडून झालेल्या दंडात्मक कारवाईचे चलनावरुन रिक्षाचे पुढील व मागील फोटो प्राप्त करत, रिक्षाचालकाचा माग काढला.

# जिल्ह्यात अकरा नगर पालिकांच्या निवडणुकांसाठी होणार प्रभाग रचना

## वॉर्डांच्या संख्येत वाढ : दोन पालिकांची नव्याने रचना

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. १२:

२०२२मध्ये निवडणुका लागल्या असत्या तर फक्त नऊ नगर पालिकांची निवडणुकांची तयारी होती. मात्र निवडणुका न लागल्याने सिंदखेडराजा व लोणार या पालिकांवरही २०२४ मध्ये प्रशासक राज सुरु झाले आहे. त्यामुळे आता अकरा पालिकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम आता सुरु झाला आहे. त्याची तयारीसाठी सध्या नगर विकास विभागाच्याही बैठका सुरु झाल्या आहेत.



नगर पालिकेच्या निवडणुकांसाठी ११ जून रोजी निवडणूक विभागाचे आयुक्त आदेश धडकले आहेत. त्यानुसार २०११ च्या जनगणनेवर आधारित निवडणुका राहणार आहेत. यापूर्वी २०११ च्या निवडणुका ज्या पध्दतीने झाल्या त्या प्रकारे होणार असल्याचे संकेत आहेत. मात्र २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकांनंतर २०२२ मध्ये होणाऱ्या निवडणुकीच्या प्रभाग रचनेत फेरबदल करण्यात आले होते. त्याबाबत आक्षेपही नोंदवण्यात आले होते. मात्र निवडणुकाच झाली नाही. परंतु, तेव्हाची प्रभाग रचना प्रत्येक नगर पालिकेत कायम आहे. पीडीटी जी.एस.पेंटे, जिल्हा सह आयुक्त, नगर विकास विभाग, बुलडाणा विर्ग ब लोकसंख्या : बुलडाणा ६७४३१, चिखली ५७८८९, खामगाव ९४११९, शेगाव ५९६७२, नांदुरा ४४४१९ विर्ग क लोकसंख्या : देऊळगावराजा ३०८२७,मेहकर ४५२४८, जळगाव २८२७६, f सिदंखेडराजा व लोणार या नगर पालिका क वर्गात मोडतात.

लोकसंख्येवर आधारित सदस्य राहणार ज्या पालिकेत २७ सदस्य आहे तेथे आता तीस सतरा पेक्षा अधिक सदस्य असलेल्या पालिकेत २० सदस्य राहणार आहे. लोकसंख्येवर आधारित हे सदस्य वाढणार आहे. २०२२ मध्ये झालेल्या प्रभाग रचनेवर ही निवडणुक होणार नाही.नव्याने प्रभाग रचना करण्यात येणार आहे. बुलडाणा जिल्ह्यात एकही अ वर्गाची नगर पालिका नाही. २०११ च्या जनगणनेनुसार ही निवडणुक होणार आहे. आरक्षणातही बदल होऊ शकतो.

# पावसाने १५ घरे पूर्णतः उद्ध्वस्त, ११२९ घरांची अंशतः पडझड

## झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक विस्कळीत

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद, दि. १२ :

पुसद तालुक्यात अचानक वादळ वाऱ्यासह पाउस कोसळला. या पावसामुळे तालुक्यातील बहुतांश भागांमध्ये मोठ्या प्रमाणात शेती पिके, घरे व जनावरांचे नुकसान झाले आहे. पुसद, वाशीम मार्गावरील खंडाळा घाटात अनेक झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.

तालुक्यातील गहुली, चोंढी, बान्सी, पिंपळगाव, मुंगशी, वनवार्ला, येलदरी, जाम बाजार, भोजला, जमशेदपूर, वालतूरसह आदी भागासह शहरात वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. अर्धा तास पावसाच्या सरी कोसळल्या होत्या. वादळी वाऱ्यामुळे सारिका सुनील केवटे (वय ३५)यांच्या पायावर दगड पडल्याने तर अभिषेक कैलास दरडे (वय २५) यांच्या अंगावर घराची भिंत कोसळल्याने जखमी झाले आहेत. चार शेळ्यांची हानी झाली. तालुक्यातील १ हजार १२९ घरांची अंशतः पडझड झाली आहे. तर एका बुद्ध विहारावर झाड पडल्याने नुकसान झाले आहे. तालुक्यातील १५ घरे पूर्णतः जमीनदोस्त झाले आहे. त्याशिवाय तीन गोठ्याचेही नुकसान झाले आहे. १२५ हेक्टरवरील केळी, पपई, भाजीपाल्याचे नुकसान झाल्याचा अंदाज प्रशासनाने अहवालात नमूद केला आहे. तालुक्यातील बहुतांश भागांमध्ये नुकसानीचा आकडा वाढणार असून तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यासह तहसीलदार देखील पंचनामा करण्यासाठी गावोगावी भेटी देत आहे.



पंचनामे करून मदत देण्याची मागणी पुसद शहरांसह तालुक्यात वादळी वाऱ्यांसाह पावसाने जोरदार हजेरी लावली. या वादळी वाऱ्यामुळे शहरात व तालुक्यात अतोनात नुकसान झाले आहे. यात पुसद तालुक्यातील तांडे, वाडे, चिखली, निंबी, पार्डी, खंडाळा यासह आदी गावातील व शेतातील पिकांचे, घरांचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने याचे पंचनामे करून तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# उमरखेड बाजार समितीच्या सभापतीपदी कृष्णा पाटील

## उपाध्यक्षपदी श्रीपाल आडे यांची निवड



■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड , दि. १२ :

उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपा प्रणित वसंतराव नाईक सहकारी पॅनेलने १८ पैकी ११ जागांवर दणदणीत विजय मिळवून आपले बहुमत सिद्ध केल्याने सभापतीच्या निवडणुकीत कृष्णा पाटील देवसरकर यांना १८ पैकी ११ मते तर उपसभापती पदासाठी श्रीपाल आडे यांनाही १८ पैकी ११ मते मिळवून निवड होऊन सत्ता काबीज करण्यात आली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात बुधवारी निवडणूक निर्णय अधिकारी ओंकार पहूकर यांनी सभापती व उपसभापती निवडणूक प्रक्रीया पार पाडली. सभापती पदासाठी भाजपा प्रणित पॅनेलचे कृष्णा पाटील देवसरकर तर काँग्रेस प्रणित शेतकरी सहकारी पॅनेलचे प्रविण पाटील मिरासे या दोघांनी नामांकन दाखल केले होते.

यामध्ये कृष्णा पाटील देवसरकर यांना १८ पैकी ११ मते मिळाली. तर प्रविण पाटील मिरासे यांना १८ पैकी ७ मते मिळाली. यामध्ये कृष्णा पाटील देवसरकर हे विजयी झाले तर उपसभापती पदासाठी भाजप प्रणित पॅनेलचे श्रीपाल आडे यांनी तर काँग्रेस प्रणित पॅनेलचे राजेश कवाने यांना १८ पैकी ७ मते मिळाली असे निवडणूक अधिकाऱ्यांनी घोषित केले.

# दर्यापूर तालुक्यात वादळ; २ बैलांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
दर्यापूर , दि. १२ :

वातावरणात बदल होऊन शहरासह तालुक्यात वादळी पावसाने हजेरी लावली. हवेने रौद्ररुप धारण करून नांद्रुण,रामागड,ऊमरी , ममदाबाद व ऊमरी इतबारपूर या गावांत घरांची पडझड, टीनपत्रे उडाली. विद्युत तारा पडून खांबही वाकले असून, दोन बैलांचा मृत्यू होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.वादळी पावसामुळे नांद्रुण शेतशिवारात पाणीच-पाणीुंबल्याने पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले. दुसरीकडे महावितरणचेही नुकसान झाले आहे .

चार दिवसांपासून उन्हाच्या तीव्र झळा असह्य होत होत्या. वादळीवाऱ्यासह अर्धातास मुसळधार पाऊस बरसला. या वादळी पावसाने नांद्रुण येथील प्रशांत खेडकर यांच्या घराची अंशतः पडझड, दीपक सावळे यांच्या घरावरील टीनपत्रे उडून घरातील सामानाचे नुकसान झाले. रामागढ येथे गोठ्याची भिंत कोसळून अशोक लोणकर यांचा बैल ठार झाला. ऊमरी ममदाबाद येथे एका बैलाच्या अंगावर वडाचे झाड कोसळल्याने त्याचा मृत्यू झाला. तर ऊमरी इतबारपूर येथील दोन घरांची टीनपत्रे उडाली आहेत. चांडोळा येथेही निंबाचे झाड गोठ्यावर

## घरासह गोठ्यांची पडझड



कोसळल्याने अनिल वारुळकर यांचे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये विद्युत तारा तुटल्या असून, खांबही वाकले आहेत. परिणामी अनेक गाव-खेड्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तर दुसरीकडे वादळी वाऱ्याने काही गावांमधील शेतकऱ्यांची धांदल उडाली. शहरातील नगर परिषद क्षेत्रात समाविष्ट हद्द वाढ साईनगर आदी भागात काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था नाही.त्यामुळे पावसाचे पाणी साचून आहे. प्रशासनाने पंचनामे करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अंजनगाव शहर आणि आजूबाजूच्या परिसरात वादळी पावसामुळे वीज यंत्रणा विस्कळीत झाली.

दुपारी झालेल्या पावसाने संपूर्ण तालुक्यात अनेक भागांत मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. अंजनगाव तालुक्यातील विहिगाव येथे सुयोग काळे या शेतकऱ्याने उन्हाळ्यात पिकविलेला कांदा भाव वाढीच्या आशेने आपल्या घरामध्ये साठवून ठेवलेला होता.परंतु, बुधवारी झालेल्या वादळामुळे घरावरील टिनाचे शेड उडून गेल्याने त्याच्या घराचे नुकसान तर झालेच. परंतु १०० क्विंटल कांदा पाण्याने भिजल्यामुळे या शेतकऱ्यावर आभाळ कोसळले असून सुमारे दीड दोन लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# अखेर महामार्गांवरील जीवघेणे खड्डे बुजवले

■ महासागर प्रतिनिधी,
आर्णी , दि. १२ :

तालुक्यातील दत्तरामपूर येथील नागपूर - तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम न्यायालयीन प्रक्रियेमुळे अर्धवट आहे. येथील वळण रस्त्यावर निर्माण झालेल्या खड्डयात वाहने सरळ येऊन आदळतात. त्यामुळे झालेल्या अपघातात अनेकांना प्राण गमवावे लागले. सोबतच आर्थीक नुकसानीला सामोरे जावे लागत होते.

ही बाब आर्णी येथील कुणाल आणि विशाल मनवर यांनी लक्षात घेत केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. निवेदनाद्वारे ही गंभीर समस्या मांडली.

दरम्यान ना. नितीन गडकरी यांनी महामार्ग प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना त्या खड्डयांची दुरुस्ती करण्यासाठी आदेश दिले. सातत्याने पाठपुरावा करीत महामार्गावरील वळण रस्त्यावर सूचना फलक तसेच डांबरीकरण करुन खड्डे भरुन घेतले. यामुळे अपघाताची मालिका थांबली आहे.

मनवर बंधुंच्या सततच्या पाठपुराव्यांमुळे सलग दुसऱ्या



वेळी उद्भवणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी, महामार्गांवरील खड्डे बुजवण्यात मनवर बंधूना यश आले आहे. सामान्य जनतेला होणाऱ्या गैरसोयीतुन दिलासा मिळाल्याने सर्व स्तरातून मनवर बंधूंचे कौतुक होत आहे. दत्तरामपुर येथील अर्धवट महामार्गाच्या कामामुळे सामान्य जनतेला होणाऱ्या गैरसोयीतून लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार असल्याचे कुणाल मनवर यांनी सांगितले.

# मुख्याधिकाऱ्यांच्या कारभाराच्या चौकशीसाठी नगरसेवकांचे उपोषण




■ महासागर प्रतिनिधी,
बाभूळगाव , दि. १२ :

नगर पंचायत बाभूळगाव मुख्याधिकारी यांच्या संपूर्ण कारभाराची निर्धारित कालावधीत उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करून फौजदारी कारवाई करण्यात यावी. तसेच नगरपंचायतच्या मुख्याधिकारी यांच्यासह नगराध्यक्ष व सर्वांची संपत्तीची चौकशी करण्यात यावी व सर्व दोषींवर विविध कलमाखाली गुन्हे दाखल करण्यात यावे. या मागणीसाठी नगरसेवक चंद्रशेखर परचाके, अभय तातेड यांनी नगर पंचायत समोर शुक्रवारी दि. ६ जूनपासून ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.

आपल्या विविध मागण्यांचे निवेदन त्यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे. न्याय मिळेपर्यंत करणार ठिय्या आंदोलन सुरुच राहणार असल्याचा इशारा नगरसेवकांनी दिला आहे. नगरपंचायतीने नुकतेच बाभूळगाव ते गणोरी रस्त्यावर आतमध्ये असलेली तीन एकर जमीन डम्पिंग ग्राउंडसाठी खरेदी केली. त्या भागामध्ये एकरी ५ ते ७ लाख रुपये भाव असताना २३ लाख रुपये एकरप्रमाणे शासनाचे ७० लाख रुपये जमीन खरेदीवर खर्च केले. वहीतीत असलेले शेत खोलगट भागात आहे. या शेतामध्ये जाण्यासाठी कॅनॉलच्या भिंतीवरून जावे लागते. रस्ता तयार करायचा असल्यास अंदाजे एक कोटी रुपये खर्च येईल. या व्यवहारामध्ये आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप केला आहे.

अलीकडेच शासनाकडून आलेल्या लाखो रुपयाचे रस्ते बांधून पूर्ण झाले. कोट्यवधी रुपयांच्या शहरातील रस्त्याची चाळणी झाली आहे.

मुख्याधिकारी या अनेक नगरसेवकांचे सर्वसाधारण सभेत विषयसूचीवर जाणीवपूर्वक विषय घेत नाही. असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी नगरसेवक चंद्रशेखर परचाके, अभय तातेड उपस्थित होते.

# एकाच ग्रामसेवकाकडे सहा गावांचा कारभार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १२ :

भातकुली पंचायत समितीमध्ये प्रशासकीय बेशिस्तीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. एकाच ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे सहा गावांचा कारभार सोपवण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

पाच दिवसांच्या कामकाजात दोन दिवस पंचायत समिती कार्यालयात आणि तीन दिवस गावपातळीवरील कामकाजासाठी द्यावे लागतात. त्यामुळे एका गावाला महिन्यातून फक्त एकदाच भेट देता येते. या व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शाळा दाखले, नागरिकांचे उत्पन्न व रहिवासी दाखले आणि वृद्धांच्या निवृत्तीवेतनाशी संबंधित कामे प्रभावित होत आहेत. संबंधित ग्रामसेवकाकडे जळका हिरापूर, साउर, वातोंडा, हिम्मतपूर, पोहरा पूर्णा आणि देवरी निपाणी या गावांचा कार्यभार होता. आता म्हैसपूर हे सहावे गाव त्यांच्याकडे देण्यात आले आहे. विशेषतः वातोंडा आणि पोहरा येथील नागरिकांनी या व्यवस्थेविरोधात तक्रारी केल्या आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायत अधिकाऱ्याचे कंत्राटदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असलेल्या जवळच्या संबंधांमुळे त्यांना हा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने शासकीय योजनांचे अर्ज सादर करणे अशक्य होत आहे.

# नवी अमरावतीपंढरपूर विशेष रेल्वेच्या ४ फेऱ्या

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १२ :

आषाढी एकादशीनिमित्त भाविकांना विठू माऊलींचे दर्शन घेता यावे यासाठी मध्य रेल्वेद्वारे अकोली येथील नवी अमरावती रेल्वे स्थानक ते पंढरपूर विशेष रेल्वेची सुविधा दिली आहे. दोन फेऱ्या भाविकांना पंढरपूर येथे नेण्यासाठी तर दोन फेऱ्या पंढरपूर येथून परत आणण्यासाठी अशा एकूण चार फेऱ्या ही विशेष रेल्वे करणार आहे. गाडी क्र. ०१११९ पंढरपूर विशेष रेल्वे नवी अमरावती येथून २ व ५ जुलै रोजी दु. २.४० वाजता वारकऱ्यांना घेऊन निघेल.

त्यानंतर १८ तास ३० मिनिटांचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०११२० ही पंढरपूर येथून ३ व ६ जुलै रोजी सायं. ७.३० वाजता निघेल व नवी अमरावती रेल्वे स्थानकावर दुसऱ्या दिवशी दुपारी १२.५० वाजता पोहोचेल.

नवी अमरावती रेल्वे स्थानक ते पंढरपूर दरम्यान ही विशेष रेल्वे बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगांव, पोचोरा, चाळसगांव, नांदगाव, मनमाड, कोपरगांव, बेलापूर, अहमदनगर, दौंड आणि कुर्डूवाडी या स्थानकांवर थांबा घेणार आहे. दोन तृतीय वातानुकुलित, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, २ सामान्य द्वितीय श्रेणी केवळ बैठक आणि सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन अशी या विशेष रेल्वेची संरचना आहे.

अमरावतीकर वारकरी, विठ्ठल भक्तांसाठी विशेष रेल्वेची सुविधा झाल्यापासून दरवर्षी शेकडोच्या संख्येत भाविक पांडुरंगाच्या दर्शनाला भू-वैकुंठपंढरीत जात



असतात. विशेष रेल्वेने जाणे ही एक पर्वणीच आहे. कारण, या भाविकांना सामाजिक संस्था, राजकीय पक्षाचे नेते निरोप देण्यासाठी येतात. चहा, नाश्ता, बिस्कीट, फळे, पाणी, प्रसादाचे वितरण करतात. त्यामुळे भाविकांना मार्गात खानपानासाठी कुठेही उतरावे लागत नाही. किंवा पैसेही खर्च करावे लागत नाही. पंढरपूरपर्यंतचा प्रवास अगदी मजेत व आरामात होतो.

विठ्ठलाचे नामस्मरण करीत भाविक पंढरीला जातात. दर्शन घेऊन याच विशेष रेल्वेने परत येतात. दर्शन करता आले नाही तर चंद्रभागेत स्नान करून तसेच पांडुरंगाचे मुखदर्शन करूनही काही भाविक परत येत असतात.

ज्या भाविकांना काही कारणास्तव नवी अमरावती-पंढरपूर रेल्वेने सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाणे शक्य होणार नाही त्यांच्याकरिता पंढरपूरला जाण्यास गाडी क्र. ०१२०५ नागपूर-मिरज रेल्वेची सुविधा आहे. ही विशेष रेल्वे ४ व ५ जुलै रोजी बडनेराहून दुपारी १२ वाजताच्या सुमारास निघणार असल्यामुळे सुविधाजनक आहे. गाडी क्र. ०१२०६ मिरज-नागपूरने ५ व ६ जुलै रोजी परतीचा प्रवास करता येणार आहे. कारण, ही विशेष रेल्वे पंढरपूर स्थानकावर थांबा घेणार आहे.

# विठू माऊलींच्या दर्शनाची भाविकांना संधी

**मध्य रेल्वे**

**ई-लिलाव सूचना**

**बल्हारशाह रेल्वे स्थानकावर वॅगनच्या उरलेल्या साहित्याचा खुला लिलाव**
**ई-लिलाव क्रमांक: एनएजी/सी/१५२/जी/लिलाव/बल्हारशाह**

संबंधित सूचनेनुसार, बल्हारशाह गुड्स शेडच्या लोडिंग लाईनमधून उरलेल्या सुमारे २००० टन साहित्याचा लिलाव सक्षम अधिकाऱ्यांनी गुरुवार, १९.०६.२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता बल्हारशाह रेल्वे स्टेशनच्या मुख्य स्टेशन व्यवस्थापक कार्यालयात करण्याचे नियोजन केले आहे.

इच्छुक पक्षांनी बल्हारशाहला भेट द्यावी आणि उर्वरित मालाची एकदा तपासणी करावी आणि तेथून तो नेण्यासाठी मार्ग निश्चित करावा आणि गुरुवार, १९.०६.२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपूर्वी बल्हारशाह रेल्वे स्टेशनच्या मुख्य स्टेशन व्यवस्थापक कार्यालयात अहवाल द्यावा. इच्छुक पक्ष/पक्षांनी बोली लावण्यापूर्वी रु. ८,०४,००० (रु. आठ लाख चार हजार फक्त) + ५% अतिरिक्त जीएसटीची सुरक्षा ठेव जमा करावी. कोणत्याही अनुसूचित व्यावसायिक बँकेने वित्तीय सल्लागार कम मुख्य लेखा अधिकारी, मध्य रेल्वे, मुंबई (FA&CAO, मध्य रेल्वे, मुंबई) यांच्या नावाने जारी केलेला डिमांड ड्राफ्ट जो बल्हारशाह येथे देय असेल. कोणतीही रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही. किंमत: ३२,१६,००० रुपये (बत्तीस लाख सोळा हजार रुपये फक्त) + ५% जीएसटी अतिरिक्त. इच्छुक पक्ष/पक्षांना खुल्या बोली लिलावासाठी विहित वेळेवर/तारीखावर आणि ठिकाणी उपस्थित राहून प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल आणि नियमांनुसार सर्वाधिक बोली लावणाऱ्या पक्ष/पक्षांच्या नावे लिलाव आयोजित केला जाईल.

लिलावाद्वारे खरेदी केलेल्या वस्तूंची संपूर्ण किंमत (अधिक जीएसटी) लिलावाच्या ठिकाणी डीडी स्वरूपात भरावी लागेल आणि संबंधित पक्ष/पक्षांना त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर रेल्वे परिसरातून माल काढून टाकावा लागेल जो लिलाव अधिकारी ठरवतील. याबाबत रेल्वे प्रशासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

AK/11/87 सहाय्यक व्यावसायिक व्यवस्थापक, मध्य रेल्वे, नागपूर

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**नगर परिषद रामटेक, जिल्हा - नागपूर**

**निविदा सूचना**

क्र./नपरा/सवि/२०२५/००२२ दि.१२/०६/२०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी, नगर परिषद रामटेक, जिल्हा नागपूर यांचे वतीने नगर परिषद रामटेक क्षेत्रातील विविध विकास कामाकरिता नॉन सी एस आर बाबींचे दर मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा विस्तृत तपशील, अटी व शर्ती व शुद्धीपत्रके हि https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरच पाहण्यास उपलब्ध आहेत.

-स्वा-
मुख्याधिकारी
नगर परिषद रामटेक

# राज - उद्धव ठाकरेंच्या संभाव्य युतीला ब्रेक?

गत काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाची चर्चा सुरू आहे. पण राज ठाकरे यांनी गुरूवारी सकाळी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमुळे मनसेसोबतच्या युतीसाठी सकारात्मक असणा?या उद्धव ठाकरे यांना जोरदार झटका बसला आहे. विशेषतः राज ठाकरे आपले बंधू उद्धव यांच्यासोबत युती करणार की भाजपसोबतच राहणार? असा सवालही या निमित्ताने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

-------------------

मुंबईतील ताज लँड्स अँड हॉटेलमध्ये आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीसाठी राज ठाकरे प्रथम हॉटेलवर पोहोचले. त्यानंतर अर्ध्या तासातच फडणवीस तिथे पोहोचले. त्यानंतर या दोन्ही नेत्यांत जवळपास दीड तास प्रदिर्घ चर्चा झाली.

त्यात कोणत्या मुद्यांवर चर्चा झाली हे स्पष्ट झाले नाही. पण हे दोन्ही नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र आलेत. त्यामुळे याविषयी वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. फडणवीसांच्या वेळापत्रकात भेटीचा उल्लेख नव्हता.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या व्यस्त वेळापत्रकात ताज लँड्स हॉटेलचा कुठेही उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांची राज यांच्यासोबत झालेली ही अनपेक्षित भेट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णायक ठरेल का? विशेषतः ठाकरे गटासोबतच्या संभाव्य युतीला ब्रेक लावून मनसे लोकसभा निवडणुकीसारखाच पुन्हा भाजपला पाठिंबा देणार का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाला भाजपने दिला पूर्णविराम?**

उल्लेखनीय बाब म्हणजे गत काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीची चर्चा सुरू झाली होती. प्रथम राज ठाकरे व त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एकमेकांना टाळी देण्याचे सूतोवाच केले होते. त्यामुळे या चर्चेला अधिकच बळ मिळाले होते. पण आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या राजकीय कौशल्याद्वारे ठाकरे



बंधूंच्या संभाव्य युतीला पूर्णविराम दिल्याचे दिसून येत आहे.

**फडणवीस, शिंदेंशी राज ठाकरेंचे चांगले संबंध**

उद्धव ठाकरे यांचा सत्ताधारी महायुतीमधील भाजप व शिवसेना शिंदे गट या दोन पक्षांना कडाडून विरोध आहे. याऊलट राज ठाकरे यांचे या दोन्ही पक्षांशी चांगले संबंध आहेत.

विशेषतः त्यांचे मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चांगले मेतकुट जमते. हे दोन्ही नेते अनेकदा शिवतीर्थावर येऊन राज ठाकरे यांच्याशी हितगुज करतात. त्यामुळे राज व फडणवीस यांच्या आजच्या भेटीवर उद्धव ठाकरेंचा पक्ष कोणती प्रतिक्रिया देतो? यावर ठाकरे बंधूंच्या पुढच्या मनोमिलनाचे गणित अवलंबून असणार आहे.

**राज ठाकरेंना महायुतीच्या गोटात वळवण्याचा प्रयत्न**

राज ठाकरे व उद्धव ठाकरे या दोघांना मानणारा एक मोठा वर्ग मुंबई, नाशिक, ठाणे या शहरी भागांमध्ये आहे. त्यामुळे हे दोन्ही नेते एकत्र आले तर त्याचा मोठा परिणाम आगामी महापालिका निवडणुकांवर होऊ शकतो.

देवेंद्र फडणवीस नेमकी हीच गोष्ट हेरून राज ठाकरे यांना आपल्या बाजूने वळवण्याचे प्रयत्न सुरू केलेत. ही भेट याच प्रयत्नांचा एक भाग असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या कलानगर येथील मातोश्री निवासस्थानापासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असणाऱ्या ताज हॉटेलमध्ये ही भेट घेतली.

दरम्यान, राज ठाकरे आणि फडणवीस भेटीवर उद्धव ठाकरे गटाकडून प्रतिक्रिया आली आहे . हे बघा राज ठाकरे यांनी त्यांच्या मुलाखती दरम्यान म्हटलं होतं, महाराष्ट्राच्या हितापेक्षा त्यांचा इगो मोठा नाही. त्यानंतर माझ्या पक्षाने, माझ्या प्रमुखांनी सकारात्मकता दाखवली. त्यासाठी आवश्यक असणारी कृती करणारी पावलं उचलली. आता मनसे प्रमुखांच्या मनात काय आहे, हे आपल्याला सांगता येत नाही. मनसे प्रमुखांनी मौन साधलेलं आहे, असं उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या.

मनसे प्रमुखांची आज मुख्यमंत्र्यांशी भेट झाली असेल, तर ती कुठल्या कारणासाठी झाली, ते आपल्याला माहित नाही. त्यांनी कोणाला भेटावं, हा त्यांचा प्रश्न आहे. ते आम्हाला बांधिल नाहीत. ते त्यांचा निर्णय घ्यायला सक्षम आहेत. महाराष्ट्राच्या मनात काय आहे, त्याला अनुसरून निर्णय घ्यायच कि, महाराष्ट्राचे उद्योगधंदे गुजरातला पळवणाऱ्या आणि गुजरातधार्जिणं धोरण अवलंबणाऱ्या फडणवीसांच्या हिताचा घ्यायचा, हा निर्णय राज ठाकरेंना घ्यायचा आहे, असं सुषमा अंधारे म्हणाल्या.

या दोन नेत्यांच्या भेटीमध्ये मुंबई मनपा निवडणूक दडली आहे, एवढे मात्र नक्की.

■ ■ ■

# मोहंमद युनूस यांचे कारनामे!

बांगलादेशच्या अंतरीम सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांचे कारनामे आता हळूहळू बाहेर येऊ लागले आहेत.

त्यांनी आपला पदभार स्वीकारल्यानंतर जी भारत विरोधी भूमिका घेतली ती जगजाहीर आहे. बांगलादेशातील जमाते इस्लामी या कट्टरवादी पक्षाबद्दल युनूस यांना वाटणारी सहानुभूती लपून राहिलेली नाही.

जमाते इस्लामी पक्षाने बांगलादेश स्वातंत्र्य युद्धात पाकिस्तानची बाजू घेतली होती, तसेच पाकिस्तानी सैनिकांनी पूर्व पाकिस्तानातील जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले त्यामध्ये जमाते इस्लामीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी जमाते इस्लामी पक्षावर बंदी घातली होती.मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने काही दिवसांपूर्वी जमाते इस्लामी या पक्षावरील बंदी उठवली आहे. मोहंमद युनूस यांनी मध्यंतरी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची इच्छा प्रकट केली होती.बांगलादेशातील राजकीय पक्ष हे आपल्याला साथ देत नसल्याचे कारण त्यांनी पुढे केले होते.परंतु तो एक बनाव होता. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी आपल्या पाठीशी उभे रहावे,या करता युनूस यांनी ती चाल खेळ्ली होती.



अभय गोखले

विशेषतः माजी पंतप्रधान खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने त्यांना पाठिंबा द्यावा म्हणून युनूस यांनी आपल्या राजीनाम्याचे पिल्लू सोडले होते. युनूस यांनी असे घोषित केले आहे की बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात येतील.

परंतु बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर २०२५ मध्ये घेण्याचा आग्रह धरला आहे.सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर २०२५ मध्ये न घेतल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल,असा इशारा बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने, मोहंमद युनूस यांना दिला आहे त्यामुळे युनूस हे धास्तावले आहेत.

मोहंमद युनूस यांना जास्तीत जास्त वेळ आपल्या पदाला चिकटून रहायचे आहे, आणि त्यांचा हा कावा बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने बरोबर ओळखला आहे. महत्वाचे म्हणजे जमाते इस्लामी या कट्टरवादी पक्षाची अशी इच्छा आहे की मोहंमद युनूस यांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या पदावर रहावे.

मोहंमद युनूस आणि लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्यातील विळ्या-भोपळ्याचे नाते सर्वश्रुत आहे.वकार उज जमान हे माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे नातेवाईक आहेत.त्यामुळे शेख हसीना यांच्याबाबत जमान यांना सहानुभूती असणे स्वाभाविक आहे.जमान हे सेक्युलर आहेत,तर युनूस हे जमाते इस्लामी सारख्या धर्मांध पक्षाबरोबर जवळीक साधून आहेत.

मोहंमद युनूस,जमाते इस्लामी पक्ष,आरक्षण विरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थी नेत्यांनी स्थापन केलेला नॅशनल सिटिझन्स पक्ष या सर्वांना, लष्कर प्रमुख वकार उज जमान हे आपल्या मार्गातील अडथळा वाटत आहेत, त्यामुळे हा अडथळा दूर करण्यासाठी त्यांचे एकत्रित प्रयत्न सुरू आहेत

मार्च महिन्यात, पाकिस्तानी गुप्तहेर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सच्या मदतीने, लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांच्या पदावरुन घालवण्याचा एक प्लॅन बांगलादेश लष्करातील काही अधिकाऱ्यांनी बनवला होता. लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली हा प्लॅन तयार करण्यात आला होता. मात्र हा प्लॅन अयशस्वी ठरला होता. त्यानंतर फैजूर रेहमान यांना नजर कैदेत ठेवण्यात आले होते.

मोहंमद युनूस यांनी आपली खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी जे कारनामे केले त्यापैकी एक कारनामा आता बाहेर आला आहे. स्वराज्य मॅगझिनने दिलेल्या माहितीनुसार युनूस यांनी सीमेवर तैनात असलेल्या बॉर्डर गार्ड बांगलादेश (बीजीबी ) या दलाचा वापर करून आपले स्थान बळकट करण्याचा प्रयत्न नुकताच केला होता.पण लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्या सतर्कतेमुळे तो प्रयत्न अयशस्वी ठरला.

भारत - बांगलादेश सीमेवर दोन्ही बाजूला तैनात असलेल्या बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यात चकमकी घडवून आणायच्या आणि बांगलादेश मध्ये भारत विरोधी वातावरण निर्माण करायचे असा प्लॅन युनूस यांच्याकडून तयार करण्यात आल्याचे बोलले जात होते.

बॉर्डर गार्ड बांगलादेश या दलाने सीमेवर आक्रमक भूमिका घ्यायची आणि भारतीय सीमा सुरक्षा दलाला उचकवायचे अशाप्रकारचा तोंडी निरोप, मोहंमद युनूस यांच्याकडून बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना पाठवण्यात आला होता.

भारतातर्फे पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूरची मोहीम जेंव्हा चालवण्यात आली, ती वेळ या प्लॅन करता निवडण्यात आली होती. बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यात चकमकी झाल्यास, भारतीय लष्कर, ऑपरेशन सिंदूर मध्ये व्यग्र असल्याने, भारतीय लष्कराला तिकडे फारसे लक्ष देता येणार नाही, असा डाव त्यामागे होता.

चकमकी हाताबाहेर गेल्यास बॉर्डर गार्ड बांगलादेशला मदत करण्यासाठी, बांगलादेश लष्कराची काही युनिट्स सीमा भागात तैनात करण्याबाबत विचार सुरू होता. बॉर्डर गार्ड बांगलादेश आणि सीमा सुरक्षा दल यांच्यातील संघर्ष वाढल्यास, बांगलादेश मधील जनतेमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत होईल आणि पक्षीय भेदाभेद विसरून बांगलादेश मधील जनता मोहंमद युनूस यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिल, अशी कल्पना त्यामागे होती.

मात्र लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांची कुणकुण लागताच त्यांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना असा वेडेपणा करू नका असे सांगितले.

हे प्रकरण आपल्याला भारी पडेल, यांची जाणीव लष्करप्रमुखांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना करून दिली. तसेच आपल्या शिवाय इतर कोणाचेही आदेश मानू नका अशी सूचना, लष्करप्रमुखांनी, बॉर्डर गार्ड बांगलादेशच्या प्रमुखांना केली. मोहंमद युनूस आणि बांगलादेशचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांनाही लष्करप्रमुखांनी अशाप्रकारचे धाडस अंगाशी येऊ शकेल, या गोष्टीची जाणीव करून दिली.

अशा प्रकारे आपली खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी अंतरीम सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांनी जो प्लॅन तयार केला होता, तो ते अमलात आणू शकले नाहीत.

मोहंमद युनूस हे सर्वच बाबतीत अपयशी ठरल्याने,त्यांची चारही बाजूंनी कोंडी होत आहे.आता ते त्यातून कसे बाहेर पडतात ते पहावे लागेल.

# रोज मरे त्याला कोण...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

मुंबईच्या विस्तारीत पूर्व उपनगरातील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले.

मुंबईची रेल्वे उपनगरी सेवा म्हणजेच लोकल ही या महानगराची लाइफलाइन आहे. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईची जनवाहिनी आहे. सर्वात स्वस्त आणि सर्वात जलद अशी ही रेल्वे सेवा आहे. म्हणूनच चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसटी)पासून विरार-पालघर-डहाणू, कसारा-कर्जत, पनवेल अशी धावणारी लोकल सेवा ही मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मुंबईकरांच्या सेवेत मेट्रो-मोनो दाखल झाली, हार्बरच्या जोडीला ठाणे-पनवेल ट्रान्स हार्बर आली. नऊ डब्यांचे बारा डबे झाले, आता अनेक गाड्यांना पंधरा डबे आहेत. दर चार ते पाच मिनिटांच्या अंतराने लोकल सेवा आहे. तरीही सर्व देशांतून मुंबईवर लोंढे आदळतच असल्याने वाढती लोकसंख्या व वाढत्या प्रवासी संख्येला उपनगरी रेल्वे सेवा अपुरी पडत आहे.

रोज खचाखच गर्दीतून रेल्वे प्रवास ही मुंबईकरांची मोठी परीक्षा असते. रोज धक्काबुक्कीतून लोकल डब्यात प्रवेश करणे आणि आपल्या स्टेशनवर कसे तरी प्लॅटफॉर्मवर उतरणे यासाठी रोज मुंबईकरांना मोठी कसरत करावी लागते. डब्यात चौथी सीट सोडाच पण नीट उभे राहायला मिळावे म्हणूनही देवाकडे प्रार्थना करावी लागते. रोजचे हाल सांगणार तरी कुणाला?

मध्य, पश्चिम व हार्बर-ट्रान्स आणि हार्बर लोकलमधून रोज पंचाहत्तर लाख मुंबईकर प्रवास करतात. हे कोणी मजा म्हणून लोकलमधून फिरत नाहीत. कोणी हौस म्हणून गर्दीत घुसत नाही. रोजंदारीसाठी, पोटापाण्यासाठी, व्यापार-व्यवसायासाठी, शाळा-कॉलेजसाठी ही गर्दी लोकलमधून जा-ये करीत असते.

त्यात भाजीवाले, मच्छीवाले, फेरीवाले, कामगार-कारकुनांपासून ते टायवाले असतात. याच गर्दीत भजन करणारे नि पोथी वाचणारे असतात आणि मालाची आवक- जावक व शेअर्सचे भाव फोनवर विचारणारे असतात. बहुसंख्य प्रवासी बसायला सीट मिळाली नाही तरी उभे राहूनच मोबाईलवर चॅटिंग करीत असतात. लोकलच्या डब्यात हौशे-गवशे आणि नवशेही भरपूर असतात. त्यात विनातिकीटही बिनधास्त प्रवास करीत असतात.

पाकीटमार आणि मोबाईल चोरांचा वावर असतो. भिकारी, फेरीवाले, नशेडे आणि गर्दुल्लेही याच गर्दीत त्यांच्या धुंदीत असतात. डब्यात शिरायला जागा नाही किंवा येणाऱ्या स्टेशनवर उतरायचे म्हणून लोकलच्या दरवाजात लोक उभे असतात पण त्याचबरोबर काही गणेगंपे आणि रंगेल दरवाजात हातवारे करीत त्यांच्या मस्तीत उभे दिसतात. मुंबईचा लोकल कल्लोळ हा शब्दाने वर्णन करता येणार नाही पण या मुंबईकर प्रवाशांकडे रेल्वे प्रशासनाचे आणि राज्य व केंद्र सरकारने म्हणावे तसे लक्ष नाही...

गर्दी व चेंगराचेंगरीतून लक्षावधी मुंबईकरांचा रोजचा प्रवास रामभरोसे चालू आहे. लोकलच्या अपघातात रोज सात ते आठ माणसे चिरडली जात आहेत किंवा गाडीखाली सापडून मृत्युमुखी पडत आहेत. काहींचे हात-पाय कायमचे निकामी होत आहेत, पण त्याची कधी चर्चाही होत नाही, कारण रोज मरे त्याला कोण रडे... असे मुंबईचे जीवन आहे.

युद्धात किती मृत्युमुखी पडले? प्रयागराजच्या महाकुंभमध्ये किती जणांनी अखेरचा श्वास घेतला? नवी दिल्ली रेल्वे स्टेशनच्या चेंगराचेंगरीत किती जण ठार झाले? बंगळूरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लाखोंच्या अफाट गर्दीत नेमके किती घुसमटून मेले? कोविड काळात मुंबई, महाराष्ट्रात किती जणांचा मृत्यू झाला? अशा प्रश्नांचा भडीमार ऐकायला मिळाला. पण मुंबईच्या लोकल अपघातात रोज आणि दरवर्षी किती मृत्युमुखी पडतात किंवा गेल्या दहा वीस वर्षांत किती मरण पावले असा प्रश्न कोणी जाहीरपणे किंवा संसदेत विचारत नाही.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत लोकल अपघातात ५२ हजार लोकांचा मृत्यू झाला तरीही केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या कोणत्याही सरकारला त्याचे गांभीर्य वाटत नाही का? मुंबईच्या उपनगरी रेल्वे अपघातात आणखी किती बळी जायला हवेत म्हणजे सरकार आणि रेल्वे प्रशासनाला त्याची गंभीर दखल घ्यावीशी वाटेल ?

मुंब्रा घटनेनंतर मुंबईतील लोकल अपघाताची रेल्वे मंत्रालयाला सुद्धा दखल घ्यावी लागली. रेल्वे मंत्र्यांनी दिल्लीत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. दरवाजात उभे असलेल्या प्रवाशांचा खाली पडून मृत्यू झाला म्हणून मुंबईतील लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार, अशी घोषणा झाली.

मुंबईत मध्य व पश्चिम रेल्वेच्या उपनगरी मार्गावर एअर कंडिशन्ड लोकल्स धावत आहेत. त्यांना स्वयंचलित दरवाजे आहेत. मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे धावत आहेत त्यांनाही स्वयंचलित दरवाजे आहेत. आता विना वातानुकूलित म्हणजेच साध्या लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार आहेत. पण त्याला आतापासूनच विरोध सुरू झाला आहे. एअर कंडिशन्डचे तिकीट परवडत नाही म्हणून लोकांचा ओढा साध्या लोकलकडे असतो. एसी लोकल्सना मागणी चांगली आहे, त्याही गर्दीने भरलेल्या दिसतात. पण खचाखच गर्दी ही साध्या लोकल्सना असते. स्टेशनवर अवघ्या वीस सेकंद थांबणाऱ्या लोकलमध्ये हजारो लोकांची चढ-उतार शक्य आहे का, हा कळीचा मुद्दा आहे.

लोकल्सला दरवाजे म्हणजे रोगापेक्षा औषध जालीम असे होऊ नये असे प्रवाशांना वाटते. पण लोकलसंबंधी निर्णय घेणारे कधी लोकलमधून प्रवास करीत नसतात, ते त्यांच्या एसी केबिनमधे बसून प्रवाशांची सुरक्षितता ठरवत असतात, त्यामुळे प्रवाशांच्या नेमक्या भावना रेल्वे प्रशासनाला कळत नाहीत. मुंबईत रेल्वे प्रवासी संघटना डझनभर तरी आहेत. त्यांच्याशी रेल्वे प्रशासनाचा संवाद कितपत आहे? प्रवासी संघटना निवेदने देतात पण त्याचे पुढे काय होते? प्रवासी संघटनांशी रेल्वे प्रशासन कितपत संवाद ठेवते?

पत्र देऊन व निवेदने देऊन चर्चेला रेल्वे प्रशासन वेळ देत नाही ही प्रवासी संघटनांची तक्रार असते. सीएसटीहून शेवटची लोकल पूर्वी रात्री १२.४५ वाजता सुटत असे, आता ती १२.१५ वाजता सुटते. यामुळे प्रवाशांची किती गैरसोय होते, याचा प्रशासनाने कधी विचार केलाय का?

एसी लोकल्स वाढवून साध्या लोकल्स रद्द करण्यात येतात तेव्हा प्रवाशांमध्ये असंतोष प्रकट होतो, त्याची दखल प्रशासनाने कधी घेतली आहे का? विशेषतः मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या कधीच वेळेवर धावत नाहीत, रोज त्या उशिरा धावतात व अनेक गाड्या रद्द होतात, हे दुष्टचक्र कधी थांबणार?

मेट्रोच्या गाड्या मिनिटांवर धावतात मग टाइमटेबलनुसार मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या का धावू शकत नाहीत? लांब पल्ल्याच्या गाड्या किंवा मेल-एक्स्प्रेसला प्राधान्य देण्यासाठी लोकल्स रखडवल्या जातात तेव्हा प्रवासी संतप्त होतात. राजधानी, शताब्दी, वंदेभारत, अमृत भारत यांना कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही, पण मुंबईच्या लोकल्स ट्रेनचे वेळापत्रक पाळले गेले पाहिजे हा प्रवाशांचा आग्रह असतो.

लोकलच्या प्रत्येक डब्यात विनातिकीट प्रवासी असतात. प्रथम श्रेणीच्या डब्यातही बिनधास्त परप्रांतीय व त्यांचा परिवार प्रवास करीत असतो. गर्दीच्या वेळी तर प्रत्येक डब्यात दहा-वीस विनातिकीट प्रवासी सीट बळकावून बसलेले असतात. अशा वेळी तिकीट तपासनीस कुठे असतात?

चालत्या गाडीत तिकीट तपासनीसांना तिकिटे वा पास तपासण्याचा रेल्वेने अधिकार दिलेला आहे, असे फलक डब्यात दिसतात, मग टीसी का दिसत नाहीत? रेल्वे स्टेशनवर विनातिकीट प्रवेशच मिळणार नाही अशी यंत्रणा बसवली तर लोकल डब्यातील अनवॉन्टेड गर्दी कमी होऊ शकेल.

मुंबईच्या विस्तारीत उपगरात लोकसंख्या प्रचंड वाढली आहे, दादर, ठाणे, दिवा, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, कुर्ला, अंधेरी, बोरिवली, वसई-विरार, पालघर, नेरूळ, खारघर-पनवेल येथे लोकसंख्येबरोबर प्रवासी संख्या प्रचंड वाढली आहे, हे लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने नियोजन केले पाहिजे. मुंबईत रेल्वे अपघातात चारजण ठार झाले म्हणून रेल्वे मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करणे हास्यापद आहे. सार्वजनिक जीवनात आज कोणी लालबहादूर शास्त्री नाहीत आणि अटलबिहारी वाजपेयीही नाहीत...

■ ■ ■

# शून्यातून शिखरापर्यंत

एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या सुभाष दांडेकर यांनी ज्या प्रकारे कॅम्लिन या भारतीय ब्रँडला घराघरात पोहचवलं, ती कथा आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.

त्यांची वाटचाल शून्यातून शिखरापर्यंतची आहे. शालेय जीवनात डांडेकर यांना आर्ट आणि सायन्सची विशेष आवड होती. त्यांनी सुरुवातीला रंग बनवण्याचा छोटासा प्रयोग सुरू केला आणि तिथूनच पुढे कॅम्लिनची सुरुवात झाली.




१९३१ साली त्यांनी डोंबिवली येथे एका छोट्याशा गोडाऊनमधून हिंदुस्तान इंक अँड वॉटरप्रूफ वर्क्स सुरू केली. सुरुवातीला फक्त काळी शाई बनवली जात होती, परंतु त्याची गुणवत्ता इतकी उत्कृष्ट होती की ती लवकरच शिक्षक, आर्टिस्ट आणि सरकारी कार्यालयांमध्ये पसंतीस उतरली.

पुढे त्यांनी कॅम्लिन ब्रँड नावाने विविध स्टेशनरी प्रॉडक्ट्स जसे पेन, पेन्सिल, रंग, ब्रश, ग्लू, कंपास बॉक्स इत्यादी बाजारात आणले. त्यांच्या उत्पादनांची खासियत म्हणजे भारतातच निर्मिती, पण आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता.

कॅम्लिनचा वॉटरप्रूफ ब्लॅक इंक तर इतका प्रसिद्ध झाला की भारतातील जवळपास सर्व आर्ट कॉलेजेस आणि आर्किटेक्चर स्टुडंट्स याच शाईचा वापर करू लागले. गुणवत्ता आणि सातत्य यावर त्यांनी कधीही तडजोड केली नाही. त्याचमुळे कॅम्लिनवर लोकांचा विश्वास निर्माण झाला.

२०१२ मध्ये दांडेकर यांनी त्यांच्या मेहनतीने उभ्या केलेल्या कॅम्लिन कंपनीचा काही हिस्सा जपानी कंपनी कोकुयोला विकला. कोकुयोने ५०.७४% हिस्सा घेतला आणि कंपनीचं नाव बदलून कोकुयो कॅम्लिन झालं.

हे टर्निंग पॉइंट असलं तरी दांडेकर यांचा उद्देश स्पष्ट होता, भारतीय स्टेशनरी मार्केटला आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणं.

आजही लाखो लोकांच्या हातात असणाऱ्या कॅम्लिनच्या प्रॉडक्ट्स मागे सुभाष दांडेकर यांची दूरदृष्टी, चिकाटी आणि क्वालिटीवरचा विश्वास आहे. त्यांनी केवळ एक ब्रँड नाही, तर भारतीयांसाठी आठवणींचं एक संचित तयार केलं. प्रत्येक विद्यार्थ्याच्या शालेय बॅगेत कॅम्लिनचं काही ना काही असणं, हीच त्यांच्या यशाची खरी ओळख आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### सर्वच लोकल गाड्या वातानुकूलित करण्याची घाई नको!

मुंब्रा या ठिकाणी झालेल्या अपघाताची दखल घेत राज्य सरकारने भाडेवाढ न करता सर्वच लोकलगाड्या वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली.

याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशीही बोलणे झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई ठाण्यातील रेल्वे मार्गावर सध्या काही प्रमाणात वातानुकूलित लोकल गाड्या धावत आहेत ज्या कधीही त्यांच्या नियोजित वेळेत रेल्वे स्थानकांवर येत नाहीत याचा अनुभव चाकरमानी प्रतिदिन घेत आहेत.

ट्रेनमधील वातानूकुलीन यंत्रांचे दारात गळणारे पाणी, गर्दीच्या वेळेत स्वयंचलित उघड बंद होणाऱ्या दरवाजांना लागणारा अधिकचा कालावधी यामुळे या गाड्यांच्या वेळापत्रकावर प्रतिदिन परिणाम होत असतो ज्यामुळे रोजच काही गाड्या रद्द कराव्या लागतात तर काही वेळा नेहमीच्या धावणाऱ्या लोकल गाड्यांवर त्याचा परिणाम होतो. आजमितीला वातानुकूलित रेल्वेगाड्यांचे तिकीट दर भरमसाठ असल्यामुळे या गाड्यांनी प्रवास करणाऱ्यांची संख्या तुलनेने अल्प असताना इतक्या समस्या येत आहेत तर भविष्यात नेहमीच्या तिकीट दरात सर्वच गाड्या वातानुकूलित केल्या तर लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता केवढी भीषण परिस्थिती उद्भवेल याची कल्पनाही करता येत नाही.

लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे, जे नक्कीच स्वागतार्ह आहे. या आवाहनाला जोपर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही आणि लोकल गाड्यांतील प्रवाशांचा भार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत सर्व गाड्या वातानुकूलित करण्याची घाई करू नये !

■ **सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई.**

# वारंवार लघवीला येणं हे कोणत्या आजाराचं लक्षण आहे?




मानवी शरीराला एकदा का व्याधी जडली तर ती सुटणं खूप कठीण होतं. अशा स्थितीत आयुष्यभर त्या व्याधीसह जगावं लागतं. त्यामुळे योग्यवेळीच आजारावर नियंत्रण मिळवणं गरजेचं आहे. शरीरातील काही बदल आपल्याला काही आजारांचे संकेत देत असतात.

वारंवार लघवीला येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तसं असेल तर थायरॉइडचं लक्षण असू शकतं. याबाबत डॉक्टरांचं काय म्हणणं आहे आणि असं का होतं ते समजून घेणं आवश्यक आहे.

मॅक्स हॉस्पिटलचे डॉक्टर रोहित कुमार यांनी सांगितलं की, जर तुम्हाला दिवसभर वारंवार लघवीला येत असेल आणि तितकीच तहानही लागत असेल तर हे मधुमेहाचे संकेत आहे. मधुमेह असल्यास शरीरातील ग्लूकोज व्यवस्थितरित्या प्रोसेस होत नाही. यामुळे किडनी अधिक प्रमाणात मूत्र तयार करते.

**युटीआय :** डॉ. रोहित कुमार यांच्या मते, वारंवार लघवीला येणं हे महिलांमध्ये सामान्य बाब आहे. वारंवार लघवीला येणं आणि मूत्रविसर्जन करताना जळजळ किंवा दुखापत होणं, तसेच लघवीला वास येणे हे युटीआयचे लक्षण असू शकतं. याचा योग्य वेळी उपचार केला नाही किडनीवर परिणाम होऊ शकतो.

**प्रोस्टेस्ट निगडीत समस्या**

प्रोस्टेट ही पुरुषांच्या प्रजनन संस्थेतील एक लहान ग्रंथि आहे. ही ग्रंथी मूत्राशयाच्या खाली आणि मूत्रमार्गाभोवती असते. तिचे मुख्य कार्य म्हणजे वीर्य द्रवात एक विशेष घटक तयार करते. तसेच शुक्राणूंना पोषण देते आणि त्यांची हालचाल सुलभ करतो. पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथी वाढल्याने मूत्रमार्गावर दबाव येतो आणि वारंवार लघवी होते. विशेषतः रात्री लघवीचं प्रमाण अधिक असते.

**ओव्हरएक्टिव्ह ब्लॅडर :** असा स्थितीत वारंवार लघवीला जाण्याची इच्छा होते. थोडं जरी वाटलं तरी तात्काळ टॉयलेटमध्ये जाणं भाग पडतं. लघवी रोखणं कठीण होतं. हे एक न्यूरोलॉजिकल कारणही असू शकतं.

**औषधांची अधिक मात्रा किंवा वारंवार पाणी पिणं**

काही औषधांच्या सेवनामुळे वारंवार लघवीला येऊ शकतं. तसेच उन्हाळ्यात पाणी पिण्याचं प्रमाण वाढतं. यामुळे वारंवार लघवीला होऊ शकतं.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### खरी मैत्री..!

तणाव भय चिंता भौ
व्यक्तिला करते हतबल
जिवाभावाचे मित्र जोडा
सामना करण्याचे मिळे बळ

हिम्मत ज्याची सुटली
त्याचे श्वासही सुटू शकतात
साहसाने करता सामना
चांगले दिवस ही येऊ शकतात

मैत्री असते अंतरीचे नाते
जाणत नाही नाते गोते
संकट समयी धावून येते
प्रामाणिकपणे जपा त्याते..

# ४९.१४ कोटी रुपये उभारण्यास मान्यता आयएफएल एंटरप्रायजेसचा राइट्स इश्यू १९ जून रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार

**अहमदाबाद, १२ जून :** कृषी वस्तूंच्या आयात, निर्यात आणि व्यापारासह कृषी वस्तूंच्या व्यवसायात गुंतलेल्या आयएफएल एंटरप्रायजेस लि. चा ४९.१४ कोटी रुपयांचा राइट्स इश्यू १९ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार आहे आणि ३० जूनपर्यंत खुला राहील.

राइट्स इश्यूची आकर्षक किंमत प्रति शेअर १ रुपये आहे, ज्यामुळे विद्यमान भागधारकांना कंपनीमध्ये त्यांची इक्विटी वाढवण्याची संधी मिळेल. संचालक मंडळाने त्यांच्या ९ जून २०२५ रोजी झालेल्या बैठकीत राइट्स इश्यूवर विचार करून त्याला मान्यता दिली.

तत्पूर्वी, कंपनीच्या संचालक मंडळाने ३० डिसेंबर २०२४ रोजी आणि ७ मार्च २०२५ रोजीच्या मसुदा पत्राने ५० कोटी (रुपये पन्नास कोटी) रुपयांपर्यंतच्या प्रस्तावित राइट इश्यूसाठी तत्वतः मान्यता मिळविण्यासाठी सादर केले आणि बीएसईकडून १९ मे २०२५ रोजीच्या पत्राद्वारे त्यास तत्वतः मान्यता मिळाली.

१३ जून २०२५ च्या रेकॉर्ड डेटनुसार इक्विटी शेअर्स धारण करणारे शेअरहोल्डर, प्रत्येक ९१ पूर्ण पेड-अप इक्विटी शेअर्ससाठी ६० राइट्स इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात राइट्स शेअर्ससाठी अर्ज करण्यास पात्र असतील. ऑन-मार्केट आरइजच्या त्यागाची अंतिम तारीख २४ जून २०२५ आहे.

या राइट्स इश्यूमध्ये प्रत्येकी १ रुपये दर्शनी मूल्याचे ४९,१४,७६,६२० पूर्ण पेड-अप इक्विटी शेअर्स आहेत, ज्यांचे एकूण मूल्य ४९.१४ कोटी रुपये आहे. इश्यूमधून मिळणारे उत्पन्न कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांना पाठिंबा देण्यासाठी वापरले जाईल.

नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक अभिषेक प्रतापकुमार ठक्कर यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या धोरणात्मक दिशेने ही भांडवली वाढ करण्यात आली आहे, ज्याचा उद्देश ऑपरेशनल कार्यक्षमता वाढवणे आणि सेवा क्षमतांचा विस्तार करणे हा आहे.

मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात, कंपनीने १२०.६० कोटी रुपयांचा महसूल कामकाजातून मिळवला, जो २०२३-२४ या आर्थिक वर्षात ८.२४ कोटी रुपये महसूलाच्या तुलनेत १३ पटीने जास्त आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ८४.५ लाख रुपयांच्या तुलनेत आर्थिक वर्ष २५ साठी निव्वळ नफा २.९९ कोटी रुपयांवर पोहोचला आहे, जो वार्षिक वाढीच्या २५४ टक्के आहे. आर्थिक वर्ष २५ च्या चौथ्या तिमाहीत कंपनीने ३.०४ कोटी रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा नोंदवला आहे. आर्थिक वर्ष २४ च्या चौथ्या तिमाहीत कामकाजामधून मिळणारा महसूल अनेक पटीने वाढून तो ७२.१३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये, कंपनीच्या संचालक मंडळाने इक्विटी शेअरहोल्डर्सकडे असलेल्या १:१५० (प्रत्येक १५० शेअर्ससाठी बोनस म्हणून १ इक्विटी शेअर) च्या प्रमाणात बोनस इश्यूला मान्यता दिली. २००९ मध्ये स्थापित, आयएफएल एंटरप्रायजेस लि. सध्या फळे, भाजीपाला, बियाणे, सेंद्रिय आणि हर्बल उत्पादने यासारख्या कृषी उत्पादनांची आयात, निर्यात तसेच कंत्राटी शेती आणि गोदाम यासारख्या कृषी उत्पादनांच्या व्यापारासह कृषी कमोडिटी व्यवसायात व्यवहार करते. कंपनी शेअर्स, स्टॉक आणि बाँड्ससारख्या आर्थिक साधनांचा व्यापार देखील करते.

## महाराष्ट्रात २० नवीन शाखांच्या माध्यमातून युग्रो कॅपिटलचे दुप्पट विस्तारीकरण

### राज्यभरात ४२ शाखांआधारे एमएसएमईंचे सक्षमीकरण आणि प्रादेशिक संपन्नतेत भर



**मुंबई, १२ जून :** एमएसएमई क्षेत्रासाठी कर्ज वितरणावर आपले लक्ष केंद्रित करणारी आघाडीची डेटाटेक एनबीएफसी कंपनी युग्रो कॅपिटलने महाराष्ट्रात २० हून अधिक नवीन शाखा उघडण्याची घोषणा केली आहे. वित्तीय समावेशनाला चालना देणे तसेच एमएसएमई क्षेत्रातील अखेरच्या घटकापर्यंत कर्ज वितरणाप्रती कंपनीची वचनबद्धता या घोषणेमुळे आणखी दृढ झाली आहे. या धोरणात्मक विस्तारामुळे युग्रो कॅपिटलच्या महाराष्ट्रातील शाखांची संख्या ४२ वर झेपावली आहे. तसेच युग्रोसाठी महाराष्ट्र हे सर्वाधिक शाखा असणारे राज्य ठरणार आहे.

अहमदनगर, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, संगमनेर, कल्याण, पनवेल, पिंपरी बारामती, भंडारा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, गोंदिया, खोपोली, कोल्हापूर, पांडरगवडा, पेण, रत्नागिरी, सांगली आणि वाघोली येथे युग्रोने नवीन शाखा उघडलेल्या आहेत. या भागातील एमएसएमई उद्योगांच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करण्यावर या शाखा भर देणार आहेत. वित्तसहाय्यापासून वंचित असलेल्या एमएसएमईंना परवडणारे कर्ज उपलब्ध करून देणे तसेच व्यवसाय वृध्दी साध्य करण्याचे यूग्रो कॅपिटलचे ध्येय या कृतीतून उलगडते.

शाखा विस्ताराबाबत बोलताना युग्रो कॅपिटलच्या सूक्ष्म उदयोग विभागाचे मुख्य व्यवसाय अधिकारी श्री जे. सथियायन म्हणाले, यूग्रो कॅपिटलसाठी महाराष्ट्र हा नेहमीच महत्वाचा विभाग राहिलेला आहे. तसेच आम्ही वाढीव शाखांतून अधिकाधिक भागात केलेला प्रवेश हा महाराष्ट्राच्या एमएसएमई क्षेत्राच्या क्षमतेवरील आमचा अटळ विश्वास दर्शवितो. प्रगत डेटा विश्लेषण, नाविन्यपूर्ण कर्जवितरणाचे प्रारुप आणि बाजारपेठतील उदयोन्मुख विभागावर आमचे वाढलेले लक्ष या घटकांचा लाभ घेत छोट्या व्यवसायांसाठी कर्जाची तफावत भरून काढण्याबरोबरच त्यांच्या विकासाच्या प्रवासात योगदान देण्याचे आमचे उद्दीष्ट आहे. आमच्या शाखा विस्तारामुळे अगदी दुर्गम भागातही आर्थिक समावेशन पोहोचेल. तसेच स्थानिक व्यवसाय अधिक सक्षम बनतील आणि प्रादेशिक विकासाला चालना देईल, हे सुनिश्चित करते.



## आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यातर्फे विशाखापट्टणममध्ये प्रगत कर्करोग उपचार ब्लॉकसाठीचे भूमिपूजन

**विशाखापट्टणम, १२ जून :** टाटा मेमोरियल सेंटरच्या सहकार्याने आयसीआयसीआय बँकेने आज आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील होमी भाभा कर्करोग रुग्णालय व संशोधन केंद्र येथे एका नव्या इमारतीच्या बांधकामास प्रारंभ केल्याचे जाहीर केले.

आयसीआयसीआय बँकेकडून ५५० कोटी रु. पेक्षा जास्त निधी देण्यात येत असून आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा सुमारे ३.९ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या या अत्याधुनिक सुविधा केंद्राचे बांधकाम केले जात आहे.

एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर चाइल्ड ॲण्ड ब्लड कॅन्सर ही आठ मजली नवीन इमारत दरवर्षी ३,००० रुग्णांना वैद्यकीय सेवा देऊ शकेल. सध्या होमी भाभा कर्करोग रुग्णालय व संशोधन केंद्र दरवर्षी ६,२०० रुग्णांना उपचार देत आहे.

पूर्व भारतामधील सर्वात मोठ्या विशेष कर्करोग उपचार केंद्रांपैकी एक म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या या इमारतीमध्ये २१५ पेक्षा जास्त खाटा असतील. आवश्यक मंजुरीनंतर, ही इमारत २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. आयसीआयसीआय बँकेची सीएसआर शाखा असलेल्या आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथच्या देखरेखीखाली याची अंमलबजावणी होईल. भूमिपूजनाचा कार्यक्रम आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीपकुमार सिन्हा यांच्या हस्ते आणि आयसीआयसीआय बँकेचे कार्यकारी संचालक श्री. संदीप बत्रा आणि मुंबई येथील टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

सिन्हा यांनी अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत एन. के. राव ऑडिटोरियमचे उद्घाटनही केले. या नवीन ऑडिटोरियमसाठी आयसीआयसीआय फाउंडेशनने टाटा मेमोरियल सेंटरला पायाभूत सुविधा व उपकरणांची मदत केली आहे.

आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष श्री प्रदीपकुमार सिन्हा म्हणाले: देशातील आरोग्यसेवा क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या आमच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत अशा कर्करोग उपचार मोहिमेत टाटा मेमोरियल सेंटरसोबत भागीदारी करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटत आहे. हा प्रकल्प गरजूंना उच्च-गुणवत्तेची वैद्यकीय सेवा देण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. हे सुविधा केंद्र बालक व रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठीचे पूर्व भारतातील सर्वात मोठया सुविधा केंद्रांपैकी एक असून आंध्र प्रदेश तसेच शेजारील राज्यांतील रुग्णांना कर्करोग उपचारासाठी मदतीचे ठरेल.

## स्कोडा ऑटो भारताच्या विकासासाठी सज्ज: २५ वर्षांच्या यशानंतर नवीन योजना सादर



**नागपूर, १२ जून :** वर्ष २०२५ जगभरातील स्कोडा ऑटोसाठी महत्त्वपूर्ण आहे, जेथे यंदा संपन्न वारसाची १३० वर्षे आणि भारतात २५ उत्साहवर्धक वर्षे साजरी केली जात आहे. ग्राहकांच्या जवळ पोहोचण्याच्या धोरणाला अधिक दृढ करत स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील बाजारपेठेमधील गतीला चालना देण्यासाठी प्रमुख ब्रँड, उत्पादन, नेटवर्क आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांची रूपरेषा आखली आहे.

याप्रसंगी मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, ''भारत युरोपबाहेर स्कोडा ऑटोसाठी सर्वात महत्त्वाची विकास बाजारपेठ आहे. आम्ही उद्देशपूर्ण क्षमता, सुस्पष्ट दृष्टिकोन आणि गतीशील अंमलबजावणीसह मजबूत, भविष्यासाठी सुसज्ज ब्रँड निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आमचे प्रॉडक्ट ऑफेन्सिव्ह धोरण ग्राहकांच्या सर्वसमावेशक गरजा आणि महत्त्वाकांक्षांशी सुसंगत आहे, जे आमच्या प्रगतीप्रती प्रवासाला गती देत आहे. आम्ही ग्राहकांच्या जवळ पोहोचत आहोत, धोरणात्मकरित्या आमचे नेटवर्क विस्तारित करत आहोत आणि दर्जा, सुरक्षितता व मूल्याप्रती आमचा वारसा अधिक दृढ करत आहोत. आमच्या सर्व व्यवसाय कार्यांमध्ये विकासाला गती देण्यासह २०२५ उत्तम वर्ष ठरेल, जेथे आम्ही मोठ्या प्रमाणात ब्रँडला प्रबळ करू आणि भारतात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहू.''

स्कोडा ऑटो इंडियाच्या प्रॉडक्ट ऑफेन्सिव्ह धोरणामध्ये 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'चा समावेश आहे, जे त्यांचा सेदान वारसा अधिक दृढ करत आहे. कायलॅक, कुशक व कोडियक प्रत्येक एसयूव्ही अस्पायरेशन आणि किमतीची पूर्तता करत असताना स्कोडा ऑटो इंडिया स्लाव्हिया आणि लवकरच लाँच करण्यात येणाऱ्या 'ग्लोबल आयकॉन'द्वारे संचालित त्यांचा सेदान वारसा अधिक दृढ देखील करेल.

स्कोडा ऑटो इंडियाने द्वितीय व तृतीय श्रेणीच्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याचा आपला दृष्टिकोन कायम ठेवला आहे. आज १६५ हून अधिक शहरांमध्ये उपस्थिती असण्यासह ब्रँडचे या वर्षामध्ये २०० हून अधिक शहरांमध्ये उपस्थिती निर्माण करण्याचे लक्ष्य आहे. कंपनीने २०२१ मध्ये १२० ग्राहक टचपॉइण्ट्सची संख्या आज २९० हून अधिक ग्राहक टचपॉइण्ट्सपर्यंत वाढवली आहे, जेथे २०२५ च्या अखेरपर्यंत ही आकडेवारी ३५० टचपॉइण्ट्सपर्यंत घेऊन जाण्याचा मनसुबा आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचा त्यांच्या प्रमाणित पूर्व-मालकीचा व्यवसाय सारख्या पूरक व्यवसायांना अधिक मजबूत करण्याचा स्पष्ट संकल्प आहे, ज्यामुळे त्यांच्या विकासाला अधिक गती मिळेल. सरकारी संस्था, आणि इतर ताफ्यांच्या गरजांची आधीच पूर्तता करत असले तरी ब्रँड या मार्गांमधून विकासाला अधिक गती देण्यासाठी नवीन क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करेल, तसेच कॉर्पोरेट आणि ग्रामीण माध्यमांमध्ये वाढ करेल.

## आल्पेनलिबेने भारतातील पहिले लिक्विड चॉको भरलेले पॉप केले लॉन्च !

**मुंबई, १२ जून :** आल्पेनलिबे इक्लेयर्स ही तिच्या समृद्ध, चोको सारखे लिक्विड ने भरलेल्या स्वादासाठी ओळखली जाते आणि अनेक वर्षांपासून ती ग्राहकांची आवडती राहिली आहे. या खास आणि लोकप्रिय चवेला पुढे नेत, आल्पेनलिबे आता घेऊन आली आहे एक नवे रूप, आल्पेनलिबे इक्लेयर्स पॉप, भारतातील पहिली लॉलीपॉप ज्यामध्ये आहे चोको सारख्या लिक्विड भरलेलं.

केवळ ५ मध्ये मिळणारी इक्लेयर्स पॉप एक खास स्वादानुभव देते, बाहेरून मऊ आणि चवदार कैरेमलचा थर आणि आतमध्ये गोडसर, वाहणारा चोको सारखा लिक्विड फिलिंग. ही लज्जतदार ट्रीट आता अधिक सोयीस्कर आणि सहज खाण्यासारख्या रूपात सादर करण्यात आली आहे, विशेषतः किशोरवयीन आणि तरुणांसाठी, जे कोणत्याही वेळी, कुठेही आपली गोड खाण्याची इच्छा पूर्ण करू इच्छितात.

परफेटी व्हॅन मेल इंडियाचे मार्केटिंग डायरेक्टर गुंजन खेतान म्हणतात, आल्पेनलिबे इक्लेयर्स पॉपच्या माध्यमातून आमचा उद्देश म्हणजे लोकांना आवडलेला अनुभव आता एका नव्या आणि अधिक सोयीस्कर रूपात देणे. इक्लेयर्सच्या चोको सारख्या फिलिंग ला ग्राहकांनी नेहमीच भरभरून प्रेम दिलं आहे आणि हा नवीन प्रॉडक्ट त्याच आनंददायक अनुभवाला पुढे नेतो. आजचे किशोरवयीन आणि तरुण वर्ग अधिक समृद्ध आणि रंगतदार ट्रीटच्या शोधात असतात, अगदी रोजच्या खाण्याच्या गोष्टींमध्येही आणि इक्लेयर्स पॉप हाच अनुभव देतो. हे काही वेगळं प्रयोगात्मक रूप नाही, तर त्यांनी आधीपासूनच ज्या चविला दाद दिली आहे, त्याचं एक नैसर्गिक पुढचं पाऊल आहे.

## अदानी एअरपोर्ट्सकडून पुढील टप्प्याच्या वाढीसाठी ७५० दशलक्ष डॉलर्सचा जागतिक वित्तपुरवठा सुनिश्चित

गोंदिया, १२ जून : भारतातील सर्वात मोठा खासगी विमानतळ संचालक (एअरपोर्ट ऑपरेटर) आणि अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचा उपघटक असलेल्या अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ने आंतरराष्ट्रीय बँकांच्या गटाकडून एक्सटर्नल कमर्शियल बोरोविंग्स (ईसीबी) च्या माध्यमातून ७५० दशलक्ष डॉलर्स उभारले आहेत. या व्यवहाराचे नेतृत्व फर्स्ट अबू धाबी बँक, बार्कलेज पीएलसी आणि स्टँडर्ड चार्टर्ड बँक यांनी केले. या निधीचा वापर विद्यमान कर्जाच्या पुनर्वित्तासाठी, पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी आणि सहा विमानतळांच्या (अहमदाबाद, लखनऊ, मंगलुरू, जयपूर, गुवाहाटी आणि तिरुअनंतपुरम) क्षमतेच्या वाढीसाठी केला जाणार आहे. तसेच, संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर नॉन-एरोनॉटिकल व्यवसाय जसे की रिटेल, एफ अँड बी (फूड अँड बेव्हरेज), ड्युटी फ्री आणि इतर सेवा यांचा विस्तारही यातून करण्यात येईल.

एएएचएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बंसल म्हणाले, जागतिक वित्तीय संस्थांनी दाखवलेला विश्वास हे भारताच्या विमानतळ पायाभूत सुविधांच्या दीर्घकालीन मूल्य आणि क्षमतेचं प्रतीक आहे. एएएचएलने आपल्या संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर टेक्नॉलॉजीचा वापर करत ग्राहकांना अनन्यसाधारण अनुभव देण्यासाठी शाश्वततेला आणि स्थानिक समाजाशी जुळवून घेण्याला प्राधान्य देत आपली वाटचाल करत आहे.

## आता थांबायचं नायचं वर्ल्ड डिजिटल प्रीमियर

**मुंबई, १२ जून :** शहरातील सर्वात दुर्लक्षित हातांनी आपलं नशीब नव्यानं लिहिण्यासाठी लेखणी उचलली तर काय होईल ? या जून महिन्यात झी५ या भाषा आणि स्थानिक प्रकारच्या कंटेंटला प्राधान्य देणाऱ्या प्लॅटफॉर्मद्वारे आता थांबायचं नाय या सिनेमाचं डिजिटल प्रीमियर जाहीर केलं आहे. झी५ ने मराठीसह भारतातील प्रमुख भाषांसाठी भाषिक योजना जाहीर केली असून त्या पार्श्वभूमीवर या सिनेमाचं प्रीमियर जाहीर करण्यात आलं आहे. आता थांबायचं नाय, या सिनेमात मुंबईतल्या स्वच्छता कामगारांना सलाम करण्यात आला असून या हृदयस्पर्शी सिनेमात शहर चालतं ठेवणाऱ्या, परंतु स्वतः पडद्याआड राहाणाऱ्या हिरोंची गोष्ट पाहायला मिळणार आहे. प्रादेशिक कंटेंटप्रती बांधील राहात झी५ सादर करत असलेला आता थांबायचं नाय हा एक जबरदस्त सिनेमा असून खऱ्या अर्थाने तुमची भाषा बोलणाऱ्या ॲपवर मराठी भाषा साजरी करणारा आहे.

दिग्दर्शक शिवराज वायचळ म्हणाले, सुरुवातीपासूनच आता थांबायचं नाय हा फक्त सिनेमा नाही, तर त्यापलीकडे जाणारी भावना, आदरांजली आणि प्रामाणिकपणे सांगण्यासारखी गोष्ट, विनोद आणि हृदयस्पर्शीपणाचा अनुभव असेल याची मला जाणीव होती. दिग्दर्शनाची पहिलीच वेळ असल्यामुळे माझ्यासाठी हा सिनेमा जास्त महत्त्वाचा होता. माझं स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी ध्यासासोबत आणखीही काहीतरी गरजेचं होतं आणि ते म्हणजे या सिनेमाच्या कथेवर माझ्याइतकाच विश्वास ठेवणारी एक दमदार टीम. टीमनं माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि त्यांची उर्जा यामुळे हा प्रवास आणखी अविस्मरणीय ठरला. थिएटरमध्ये मिळालेला प्रतिसाद माझ्या कल्पनेपलीकडचा होता. आणि आता देशभरातील प्रेक्षकांना झी५ वर हा सिनेमा पाहायला मिळणार असल्याचा मला आनंद वाटतो. मला विश्वास आहे, की हा सिनेमा त्यांना आशा देईल, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवेल आणि कुठेतरी त्यांनाही हातात पेन घेऊन नवा अध्याय सुरू करण्याची प्रेरणा देईल.


अभिनेते- दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर म्हणाले, आता थांबायचं नायची कथा वाचल्याक्षणी आपण या सिनेमात काम करायला हवं असं मला तीव्रतेनं वाटलं. ही कथा मला खूप आवडली. साधेपणातून प्रभाव पाडण्याची संधी देणाऱ्या भूमिका फार क्वचित वाट्याला येतात. या सिनेमाबद्दल मला सर्वात जास्त भावलेली गोष्ट म्हणजे मुंबईचे सफाई कर्मचारी या शहरातले पडद्यामागचे हिरो. सिनेमात त्यांचा संघर्ष आणि वृत्ती प्रामाणिकपणे, हलक्या-फुलक्या पद्धतीने आणि मनापासून दाखवण्यात आला आहे. थिएटरमध्ये हा सिनेमा पाहू न शकलेल्यांना आता झी५ वर तो पाहायला मिळणार आहे. हा सिनेमा कोणतीही गोष्ट नव्यानं सुरू करायला कधीच उशीर झालेला नसतो आणि अगदी शांतपणे करण्यात आलेली क्रांतीही आयुष्य बदलू शकते असाहा संदेश देणारा आहे.

## बायरकडून बिकोटा नावीन्यपूर्ण उपाययोजना बाजारात

**गोंदिया, १२ जून :** बायर या शेती आणि आरोग्यसेवा या जीवविज्ञान शाखांमधील एका आघाडीच्या कंपनीने भातपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना खोडकिडीचा सामना करण्यासाठी सक्षम करण्यासाठी बिकेटा या नवीन उत्पादनाची घोषणा केली आहे. या धोकादायक कीटकापासून उत्तम संरक्षण देण्यासाठी बिकोटामध्ये बायरच्या विशेष संशोधनाचा समावेश करण्यात आला आहे. बिकोटा जून २०२५ पासून पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा यासह प्रमुख भात उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल.

या अनावरणप्रसंगी बोलताना बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारताचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले, बायर आपल्या नवनवीन शोधांद्वारे शेतकऱ्यांचे जीवन सोपे करण्याचा प्रयत्न करत राहते. बिकोटाच्या माध्यमातून आम्ही केवळ भात उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाचे संरक्षण करणारी उपाययोजना देत नाही तर त्यांचा वेळ आणि मजुरीचा खर्चदेखील वाचवणे आणि त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न सुधारण्यास मदत करतो.

## शब्दकोडे क्रमांक २१३६



आडवे शब्द :-
१) खूप छान (ग्रा)
४) फार मोठे प्रास्ताविक
११) रत्न
१३) दिमाख,
१४) शरम
१५) सरिता
१६) रंग बदलणारा प्राणी
१८) बागवान
१९) कुंड्यांना लावण्याची रंगीत माती
२०) रांग
२१) हात
२२) नाजूक, कोवळा
२४) जैन साधू
२६) दया, करुणा
२७) तळे, सरोवर
२८) कडक व चिवट
२९) कमीशन, बट्टा, वटणावळ
३१) छोटी लढाई
३३) मयूर
३४) वही
३५) जननी
३७) चामखीळ
३९) गुरांचा घोळका
४०) संधी, वाव
४१) तसराळे
४३) मध्यम प्रमाण
४५) दुप्पट(इं)
४९) शेवटच्या श्वासांचा आवाज
५२) दिवा
५३) श्रीविष्णूचा आठवा अवतार
५४) बातमी
५६) ये-जा करणाऱ्यांची गर्दी
५७) फुलांचा राजा
५८) माजलेला
५९) ताकाला जिऱ्याची फोडणी देऊन केलेले पेय
६०) चूल, जादू, हातचलाखी
६२) भरभराट
६४) घोड्यावरून मारलेली चक्कर
६६) दोरा
७०) नवप्रवेशिकेला जास्त भाव, दर्जा मिळणे या अर्थीचा वाकप्रचार
७६) कोवळ्या दुधाचा पदार्थ
७७) विनयशील
७८) माहिती असलेला, जाणलेला

उभे शब्द :-
१) छोटासा
२) वजन, बोजा
३) यथाशास्त्र
५) झकास
६) परस्परातील लाथांनी होणारी मारामारी, आवेशयुक्त भांडण
७) झीज, मडके,
८) स्तुती
९) पराग
१०) लघळपणा करणारी
१२) पुरुष
१७) हातोहात, त्वरेने
१८) सामान, वस्तू
१९) कपडालत्ता
२१) चिलखत, आवरण
२३) नंतर
२४) जखम व्रण
२५) नगण्य किंमत
२७) अंधार
२८) नियमित वारी करणारा
३०) एक श्वासरोग
३२) न्यूनता, उणीव
३६) ज्वर
३८) चांदणी
४२) रामाचे एक नाव
४३) पावसाची झड
४४) *** आगा एक अभिनेत्री
४६) फार बलाढ्य, जोरावर असलेले नशीब
४७) इंद्राचे वाहन
४८) बिघडलेला
५०) घरात तयार केलेले
५१) चंद्राची कड
५२) मजबूत, भक्कम
५४) कारण, निमित्त
५५) नास्तिक तत्वज्ञ असलेला एक ऋषी
६०) गुणाकारच्या विरुद्ध
६१) अधिक महिना
६३) रमलविद्या जाणणारा
६५) कंबर, कंबरेचा सांधा
६७) अरण्य
६८) वचन, निश्चय, पण
६९) झाडतील पोकळी
७१) होडी ७२) आंबा
७३) लगेच
७४) पत्र (हिं)
७५) वृक्ष

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## रशिया दिना निमित्त रशियन विद्यापीठांनी भारतातील एमबीबीएस प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांसाठी केली गुणवत्ताआधारित शिष्यवृत्तींची घोषणा

**नागपूर, १२ जून :** राष्ट्रीय अस्मिता, प्रगती आणि एकत्मिता यांचे दर्शन घडविणारा रशिया दिन साजरा करण्यास रशियन जनता सज्ज झाली असताना रशियन सरकारच्या अनेक विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ताआधारित शिष्यवृत्ती जाहीर केली आहे.



या उपक्रमातून रशिया दिनाच्या निमित्ताने त्या देशातील स्पिरीट समोर येते आणि त्याचवेळी रशिया आणि भारत यांच्यातील दीर्घकालीन परस्परसंबंधही अधोरेखित होतात. या घोषणेमुळे भारतीय विद्यार्थ्यांना किफायतशीर, जागतिक स्तरावर मान्यता पावलेले आणि उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण प्राप्त होणार आहे. २०२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून अर्ज स्वीकारले जात आहेत. विद्यार्थ्यांनी गुणवत्ताआधारित शिष्यवृत्तीसाठी आणि आपल्या आवडीच्या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी त्वरा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा : इमेल apply@edurussia.in किंवा फोन व व्हॉटसॲप ९७६९७६१०९९

रशिया दिनाचे स्पिरीट किंवा चैतन्य हे केवळ त्या देशाची राष्ट्रीय कामगिरी अधोरेखित करण्यापुरते सीमित नाही. मात्र त्यात स्नेहपूर्ण संबंध आणि संधी यांचाही समावेश होतो. विद्यापीठांकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती या पात्र विद्यार्थ्यांना त्या देवू करत असलेल्या संधी आणि जागतीक दर्जाचे शिक्षण यांच्याप्रती असलेली रशियाची बांधिलकी यांचे अधोरेखन आहे, असे उद्गार एड्युरशियाचे अधिकृत प्रतिनिधी श्री मनोज पत्की यांनी काढले. एड्युरशिया ही रशियन विद्यापीठांसाठी भारतीय प्रवेशासाठीची अधिकृत संस्था आहे.


## आज का अंदाज

शुक्रवार १३ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २९० | ४५५ | ११५ | २२४ | ४९९ | १२२ | १२३ | १६० |
| ३८० | ३३८ | ४४९ | १७० | ६६० | ५०० | २६८ | ३४० |
| ४७० | २२० | ७०० | ३६९ | २२८ | ३५७ | ३६७ | २५० |
| १२ | ४२ | ७५ | ८५ | २४ | ५१ | ६० | ७० |
| १६ | ४६ | ७९ | ८९ | २१ | ५४ | ६९ | ७९ |
| १० | ४० | ७३ | ८३ | २८ | ५८ | ६३ | ७३ |

१३ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६४ | ९४ |
| २७ | ३७ | ६८ | ९८ |
| २० | ३० | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४



## कार्यालय नगर परिषद, बल्लारपूर

निविदा सुचना क्र.प्रशा/स्वच्छता.वि/नपब/९८५/२०२५ दिनांक :-१२/६/२०२५

### निविदा सुचना (तिसरी वेळ)

या सुचनेद्वारे खालील नमुद केलेल्या कामाकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये इच्छुक निविदा धारकाकडून प्रपत्र अ-२ (भावदर्शक) मध्ये मोहरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक निविदाधारकांनी आपले दर दिनांक २०/०६/२०२५ ला दुपारी ४.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावी लागेल. कोऱ्या दर पत्रासाठी स्वच्छता विभागातुन दिनांक १३/०६/२०२५ ते दिनांक २०/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत रकमेचा भरणा करुन (सुट्टीचे दिवस सोडून) प्राप्त करता येईल. दरपत्र (अ-२) शक्य झाल्यास त्याच दिवशी उपस्थित कंत्राटदार व पूरवठाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीच्या समक्ष दिनांक २३/६/२०२५ ला शक्य झाल्यास उघडण्यात येईल. कमी अथवा जास्त दराची निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता सर्वच निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्यअधिकारी यांच्याकडे सुरक्षित आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम (रु.) | दर प्रपत्राची किंमत (रु) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद बल्लारपूर अंतर्गत मोकाट जनावरे पकडने व त्यांना कांजी हाउस (गोशाला) मध्ये सोडने बाबत. | रु. ५०००/- | रु. ५००/- | आदेशप्राप्ती पासून एक वर्ष |

वरिल नमुद कामाचे अटी व शर्ती स्वच्छता विभागात कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध राहिल.

स्वा/-
प्रशासक तथा मुख्यअधिकारी
नगर परिषद बल्लारपूर

# बाळापूर, पातूर, बार्शीटाकळी तालुक्यात वादळासह पाऊस

## ३ गुरे ठार नदी, नाल्यांना पूर

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १२:

अकोला शहरासह बाळापूर, पातूर, बार्शीटाकळी तालुक्यात अर्धा तास अचानक आलेल्या वादळासह जोरदार पावसाने शेतातील कांदा आणि रब्बी ज्वारी, तीळ, लिंबू, आंबा पिकाचे नुकसान झाले. बाळापूर तालुक्यात तासभर जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. नदी, नाले दुथडी भरुन वाहून निघाले. बाळापूर येथे रस्त्यावर पाणी साचले होते. वाडेगाव येथे वादळी वाऱ्यासह पाऊस व सौम्य प्रमाणात गारा पडल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. साठवून ठेवलेला कांदा भिजला. पातूर तालुक्यात वादळी पावसात वीज अंगावर पडल्याने गोळेगाव शिवारात एक गाय, वादळामुळे गोठ्याचे छत कोसळल्याने त्याखाली दबून चोंडी येथे एक बैल तर शिर्ला येथे एक म्हैस अशी तीन गुरे दगावली.





बाळापूर शहर आणि तालुक्यात जोरदार पाऊस झाला. या पावसाने बाळापुरात रस्त्यांवर पाणीच पाणी झाले होते. बाळापुरातून वाहणाऱ्या नदीच्या पुलावरून पाणी वाहून निघाले. बा?ळापूर तालुक्यातील शेत शिवारात पाणी साचले होते.

शेतातील पिकांचे नुकसान झाले. या पावसामुळे काही अंशी नुकसान झाले असले तरी बाळापूर आणि पातूर तालुक्यात पावसामुळे शेतकरी सुखावला.

वादळी वाऱ्यासह गारा वाडेगाव येथे अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस व सौम्य प्रमाणात गार पडल्याने पिकांचे व तसेच साठवून ठेवलेल्या कांदा भिजल्याने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले. रब्बी हंगामातील पिके कांदा, पालक ज्वारी, तीळ, नींबू, आंबे आदी पिकांचे नुकसान झाले. राजेंद्र घाटोळ यांच्या दहा एकरातील कांदा शेतामधील गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेला होता. वाऱ्यामुळे गोडावूनवरील पत्रे उडून गेल्याने कांदा पाण्याने ओला झाला.

## जनावरांचे अपघात बचावासाठी जनजागृती मोहीम

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. १२:** रेल्वे रुळांवरील अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि जनावरांचे अपघात टाळण्यासाठी भुसावळ विभागात ४ जून रोजी अकोला, मूर्तिजापूर आणि मलकापूर येथे जनजागृती मोहिमांचे आयोजन करण्यात आले. या मोहिमांचे आयोजन रेल्वे प्रशासनाने रेल्वे सुरक्षा दलाच्या समन्वयाने केले. मोहिमेदरम्यान रेल्वे रुळांजवळ राहणाऱ्या रहिवाशांशी, पशुपालकांशी संवाद साधून त्यांना जनावरे रुळांवर सोडल्यास होणाऱ्या धोका आणि परिणामांची माहिती देण्यात आली. जनावरे रुळांवर येण्यामुळे होणाऱ्या अपघातांचे गंभीर परिणाम, प्रवासी सुरक्षितता, वेळापत्रकावर परिणाम आणि रेल्वे सेवेतील अडथळे याबाबत लोकांना जागरूक करण्यात आले. रेल्वे सुरक्षा दल अधिकाऱ्यांनी जनावरांना मोकळे सोडणे टाळावे, शेळ्या, गाय, म्हशी इत्यादी जनावरे रेल्वेमार्गापासून दूर ठेवावीत आणि अज्ञानतेमुळे होणाऱ्या धोक्यांबाबत जागरूक रहावे, असे आवाहन केले. जनजागृती मोहिमेदरम्यान जनावरांचे अपघात-संभाव्य क्षेत्रांबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली आणि विशेषतः रेल्वेगाड्या चालू असताना जनावरे रुळांपासून दूर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. जनावरांचे वाचवणे आणि रेल्वे वाहतुकीच्या सुरळीततेसाठी सामुदायिक जबाबदारी असल्यावर भर देण्यात आला. यासोबतच, अपघात रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून, जनावरांचे अपघात-संभाव्य ठिकाणी शिट्टी वाजवण्याच्या सूचना दर्शवणारी पाटी लावण्यात आली आहे.

# सीएम सभेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी सत्याग्रही स्थानबद्ध



## शेतकरी संघटनेतर्फे निषेध

■ महासागर प्रतिनिधी,
मूर्तिजापूर , दि.१२ :

अकोला येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाली. त्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्याप झालेली नसून, पूर्तता अद्याप झाली नसून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा देखील त्याच्यामध्ये समावेश आहे.

त्यांच्या या सभेमध्ये शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती बद्दल आवाज उठवू नये म्हणून शेतकरी संघटना व क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना मूर्तिजापूर पोलिसांनी घरी जाऊन अटक केल्याने ही शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करून त्यांना त्यांचा आवाज दाबण्याचा गंभीर प्रकार असून, याबाबत शासनाचा निषेध करण्यात येत आहे.

शेतकरी क्रांतिकारी शेतकरी संघटना आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सभेपूर्वी कर्जमुक्तीची घोषणा अन्यथा याबाबत आवाज उठवला जाईल, असा इशारा दिला होता. त्यामुळे थेट पोलिसांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना अटक केली. यामध्ये राहुल वानखडे, अरविंद तायडे, रियाजभाई सय्यद, संतोष रुद्रकार यांना शहर पोलिस स्टेशनला अटक केली. तर ग्रामीण पोलिसांकडून शुभम जवजाळ, रामदास भगत व प्रवीण खोत यांना अटक करण्यात आली. राज्य सरकार शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे,

अशी प्रतिक्रिया राहुल वानखडे व अरविंद तायडे यांनी दिली.

# प्रकल्पबाधितांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची पुन्हा तपासणी करा

## रिपाइंच्या आठवले गटाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १२:

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत देण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची पुन्हा तपासणी करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना सादर निवेदनात करण्यात आली. एकाच कुटुंबातील अनेकांनी प्रकल्प ग्रस्ताचे प्रमाणपत्र देवून शासनाची दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून बोगस प्रमाणपत्र रद्द करा, अशीही मागणी करण्यात आली.



जिल्ह्यातील अनेक प्रकल्प, योजना, उपक्रमांमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल, अशी आशा होती. यासाठी प्रकल्पग्रस्त व संघटनांनी प्रशासन व शासनाकडे पाठपुरावाही केला. प्रलंबित मागण्यांसाठी सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेने अनेकदा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. त्यानंतर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची प्रकल्प बाधित व्यक्तीसाठी विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिल्याने पदभरतीच्या प्रसिद्ध जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जानुसार १० मार्च ते १० मे या कालावधीत निर्गमित केलेल्या विविध प्रमाणपत्रांचा तपशील असलेली यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर सूचना फलक या सदराखाली प्रसिध्द करण्यात आली. दरम्यान आता प्रमाणपत्रावर आक्षेप घेण्यात आला आहे.

रिपाइंने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.याप्रसंगी प्रामुख्याने प्रामुख्याने बुद्धभूषण डी. गोपनारायण यांच्यासह प्रकाश मोतीराम सदांशिव, अजय हरिहर गवई, संघदीप अरूण शेगावकर इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिपाईतर्फे निवेदन जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना सादर करण्यात आले.

बोगस व नियमबाह्य प्रक्रियेचा आरोप ज्यांची शेती विद्यापीठात गेली नाही अशा बनावट प्रकल्पग्रस्तांना बोगस व नियमबाह्य पद्धतीने स्थायी करण्यात आले, असा आरोप रिपाइंने निवेदनात केला आहे.

निवेदनात कृषी शिक्षण व संशोधन परिषदेतर्फे गठित चौकशी समितीच्या पत्राचा संदर्भ देण्यात आला. विद्यापिठाच्या स्थापनेपासून आतापर्यंत कर्मचाऱ्यांच्या विविध भरती प्रक्रिया पार पडल्या. कार्यकारी परिषदेच्या माध्यमातून ठराव घेण्यात आले. अनेक प्रकल्पस्तांना स्थायी करण्यात आले, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

# संघाचा हिंदू साम्राज्य दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
दानापूर, दि. १२:

आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, मुघलांच्या जाचातून जनतेला मुक्त करण्यासाठी छत्रपती शिवरायांनी रायरेश्वराच्या मंदिरात शपथ घेऊन शालीवाहन शके १५९६ ज्येष्ठशुद्ध त्रयोदशी, ६ जून १६७४ ला हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. माता जिजाऊंची पुण्याई जगदंबेच्या कृपेने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवबा जन्माला आले, असे प्रतिपादन सदाशिव भारसाकळे यांनी केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दानापूर शाखेच्या वतीने नुकताच वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज व्यासपीठ येथे हिंदू साम्राज्य दिन उत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी सदाशिव भारसाकळे बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून तालुका संघचालक डॉ. माधव बनकर, सद्भाव मंच तालुका संयोजक, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी आश्रम मध्यवर्ती प्रतिनिधी माणिक इंगळे उपस्थित होते.

सर्वप्रथम संघाचा ध्वज लावून भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. संघाची प्रार्थना व गीत जय खोडे यांनी म्हटले, तर अमृतवचन वेदांत हागे याने म्हटले. सदाशिव भारसाकळे पुढे म्हणाले, आम्हाला येणाऱ्या काळात हिंदू साम्राज्य दिन उत्सव नियमित साजरा करावाच लागेल, तेव्हाच आमच्या मुलांना छत्रपती शिवाजी महाराज कळतील. त्यांचे कार्याविषयी माहिती होईल. ही आज काळाची गरज आहे आणि ते सुद्धा त्यातून आदर्श निर्माण करतील, असे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन मंडल कार्यवाह प्रकाश हागे, तर प्रास्ताविक दानापूर उपखंड कार्यवाह संजय हागे यांनी केले. उत्सवाला देवमण अघडते, बन्सीसिंह ठाकूर, गुरुदेव सेवा मंडळाचे श्रीकृष्ण भगत, वसंत टाले, बाळाभाऊ बावणे, संतोष वाघमारे, बाळकृष्ण घायल, गणेश दांदळे आदी उपस्थित होते.

सुसंस्कारित मुले जन्माला येण्यासाठी आम्हाला प्रभू श्रीराम कृष्ण यांच्या कथा भागवत, गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम महाराजांची अभंग गाथा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता आदी ग्रंथ मुलांना वाचायला लावावे लागतील. सनातन धर्म टिकला पाहिजे आणि राष्ट्र जर बलवान बनवायचे असेल तर देशातील प्रत्येक तरूण हा सुसंस्कारित असणे गरजेचे आहे. हेच संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांनी ओळखलं होते.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दानापूर शाखेच्या वतीने नुकताच वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज व्यासपीठ येथे हिंदू साम्राज्य दिन उत्सव आयोजित करण्यात आला होता**

म्हणूनच त्यांनी संघाच्या शाखेत हिंदू साम्राज्य दिन उत्सव साजरा करण्याची सुरुवात केली, अशी माहिती माणिकराव इंगळे यांनी दिली.

## हिरवा चारा निर्मितीसाठी 'हायड्रोपोनिक स्ट्रक्चर'

### कृषी विद्यापीठाकडून विकसित

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने जनावरांसाठी हिरवा चारा निर्माण करण्याच्या दृष्टीने विकसित केलेल्या अत्याधुनिक 'हायड्रोपोनिक स्ट्रक्चर' आणि इतर अभियांत्रिकी तंत्रज्ञानाच्या व्यापारीकरणासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाच्या कुलगुरू कार्यालयाच्या सभागृहात हा महत्त्वपूर्ण करार पार पडला.

हिरवा चारा हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनावरांना वर्षभर संतुलित आहार मिळावा यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले हायड्रोपोनिक स्ट्रक्चर मातीशिवाय, केवळ पाण्यात किंवा पोषक द्रवात हिरवा चारा तयार करण्यास सक्षम आहे. अवघ्या १०-१२ दिवसांत चारा उत्पादन घेतले जाऊ शकते. या सामंजस्य करार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. प्रमुख उपस्थितीत संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे, तसेच डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. महेंद्र देशमुख, डॉ. अशोक मस्के, डॉ. प्रमोद बकाने, डॉ. मृदुलता देशमुख, डॉ. अनिल कांबळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# पालखी मार्गाच्या दुर्दशेकडे रस्ते विकास महामंडळाचे दुर्लक्ष

## लोणार-मेहकरदरम्यान मोठ्या भेगा

■ महासागर प्रतिनिधी,

**लोणार , दि. १२:** शेगाव -पंढरपूर पालखी मार्गाला लोणार - मेहकर या २२ किलोमीटर अंतरात मोठमोठ्या भेगा व खड्डे पडले आहेत. मात्र, रस्ते विकास महामंडळाच्या मेहकर विभागाकडून दुरुस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे महामंडळ या मार्गाच्या दुरवस्थेची प्रतीक्षा करत आहे की काय, असा संतापजनक प्रश्न उपस्थित केला जात आहे. संत श्री गजानन महाराजांच्या भक्तांसाठी व नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने शेगाव -पंढरपूर पालखी मार्गाचे काम पूर्ण केले. परंतु, एका पंचवार्षिकाआधीच या संपूर्ण मार्गाची दुरावस्था झाली आहे. या मार्गावर लोणार - मेहकर या २२ किलोमीटर अंतराच्या आत ठिकठिकाणी मोठ्या भेगा व खड्डे पडले आहेत. मात्र, अपघात घडलेल्या किंवा तक्रारी झालेल्या ठिकाणीच दुरुस्ती करण्याचा प्रकार रस्ते विकास महामंडळाकडून चालवला जात आहे.



या पालखी मार्गाच्या मधोमध पडलेल्या खोल भेगांमध्ये दुचाकीचे टायर पूर्णपणे अडकते. त्यामुळे या मार्गावर अपघात घडत आहेत. मागील महिन्यात अशाच प्रकारे एका स्कूटीस्वाराचा अपघात होऊन तो गंभीर जखमी झाला.

याबाबत 'दिव्य मराठी''ने वृत्त प्रकाशित केल्यानंतर केवळ त्या ठिकाणचे काम तीन दिवसांत करण्यात आले. मात्र, इतर खड्डे अद्यापही कायमच आहेत. या प्रकारामुळे रस्ते विकास महामंडळ मोठ्या अपघाताची आणि जीवितहानी झाल्यानंतरच या मार्गाचे संपूर्ण काम पूर्ण करणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मागील वर्षीही अशीच स्थिती होती. श्री संत गजानन महाराजांची पालखी निघण्यापूर्वी सुलतानपूरजवळील सीता न्हाणी नदीच्या पुलावर मोठमोठे खड्डे पडले होते. त्यावेळीही 'दिव्य मराठी''चे वृत आणि भक्तांच्या मागणीनंतर तत्काळ काम करण्यात आले. मात्र, पुन्हा त्या पुलावर खड्डे पडले आहेत.

सद्य:स्थितीत या भागापासून अर्धा किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. परंतु, इतर ठिकाणी पडलेल्या खड्ड्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संपूर्ण पालखी मार्गाची नियोजनबद्ध आणि तांत्रिकदृष्ट्या दुरुस्ती करण्याची मागणी केली जात आहे.

मुख्यालयी राहण्याचे आदेश द्यावेत! रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी बहुधा अमरावती किंवा नागपूर येथील असल्यामुळे ते मेहकर मुख्यालयी उपस्थित राहत नाहीत.

यामुळे देखरेख व नियंत्रणात सातत्याचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे वरिष्ठांनी या अधिकाऱ्यांना मुख्यालयी उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# नंददीपला जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार जाहीर

## बेघर मनोरुग्णांच्या कार्याची दखल

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १२ :

छत्रपती सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा पुरस्कार यंदा नंददीप फाउंडेशनला जाहीर झाला आहे. रविवारी दि. १ जूनला समर्थवाडीस्थित नंददीप मनोरुग्ण निवारा केंद्रात प्रतिष्ठानचे सचिव संजय देशकर यांच्यासह प्रसन्न बारलिंगे यांनी भेट देत पुरस्कार जाहीर झाल्याचे पत्र संचालक संदीप शिंदे यांना सुपूर्द केले.



छत्रपती सेवा प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी इतिहास, धर्म व संस्कृती या क्षेत्रात व्रतस्थपणे कार्यरत असलेल्या महनीय व्यक्तींना जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार देऊन त्यांचे विद्वत पूजन केले जाते. १९८२ पासून पुरस्काराची परंपरा जपली जात आहे.

या वर्षीच्या ४३ व्या पुरस्कारासाठी विश्वस्त मंडळाने बेघर मनोरुग्णांचे पुनर्वसन करणाऱ्या संदीप व नंदिनी शिंदे यांच्या नंददीप फाउंडेशनची एकमताने निवड केली आहे. यापूर्वी भालजी पेंढारकर, शाहीर योगेश, अपर्णा रामतीर्थकर, रामचंद्र देखणे यांच्यासह भारतरत्न लता मंगेशकर यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

५१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून विजयादशमीच्या पर्वानंतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कारसोहळा पार पडणार आहे.

नंददीप फाऊंडेशन हे निराश्रित, मतिमंद, बेघर फिरणारे मनोरुग्ण, मुले यांना आश्रय देऊन त्यांच्यावर सेवाभावी डॉक्टरांकडून उपचार केले जातात. त्यांचे संगोपन करण्याचे काम ही संस्था निःस्वार्थपणे करते. याशिवाय रस्त्यावर होणारे अपघातग्रस्त यांना तत्काळ वैद्यकीय मदत , गरजुन्ना जेवण व पोलिसांच्या मदतीने बेवारस व्यक्तींचे अंत्यसंस्कार कार्यात संस्था पुढाकार घेऊन सामाजिक दायित्व निभावित आहे. त्यांच्या या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी नंदिनी शिंदे यांचेही मोठे योगदान आहे. यापूर्वी शिंदे यांना कोरोना योद्धा, तरुण तेजांकित पुरस्कार, रोटरी उत्कृष्टसेवा पुरस्कार, वीर राजे संभाजी पुरस्कार.

संत गाडगेबाबा सामाजिक पुरस्कार आदींनी सन्मानित केले गेले आहे.

# तंत्रनिकेतन प्रवेश संख्या ३० टक्यांनी वाढली

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १२ :

दहावीनंतर विद्यार्थ्यांसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यापैकी तंत्रनिकेतन हा सर्वात महत्वाचा पर्याय मानला जातो. यात आजपर्यंत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती. मात्र, आता यात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. सध्या प्रवेशासाठी नोंदणी सुरू असून यावर्षी ग्रामीण भागातून होणाऱ्या नोंदणीत ३० टक्के वाढ झाली आहे. जिल्ह्यात तंत्रनिकेतनच्या ८१० जागा आहेत.

दहावीचा निकाल १३ मे रोजी जाहिर झाला. त्यानंतर २० मे पासुन तंत्रनिकेतन प्रवेशासाठी नोंदणी प्रक्रीया सुरु झाली. जिल्ह्यात शासकीय आणि खासगी अशा तिन तंत्रनिकेतन महाविद्यालयात ८१० जागा१ उपलब्ध आहेत. त्यात बुधवारपर्यंत ८८४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती.

अद्याप १६ जून पर्यंत नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर १८ जून रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार असून, १९ ते २१ जून या कालावधीत विद्यार्थ्यांना आपली हरकत नोंदवण्याची संधी दिली जाणार आहे. अंतिम गुणवत्ता यादी २३ जून रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

प्रक्रिया वेगाने पूर्ण होणार २३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यावेळी विद्यार्थ्यांना सुविधा केंद्रामध्ये जाऊन संस्था आणि शाखा याचा विकल्प द्यायचे आहेत. यावर्षी कॅपचे चार राउंड होणार आहेत. यात ॲटोफ्रीजची सुविधा देण्यात आली आहे.

त्यामुळे लांबत जाणारी प्रक्रीया आता वेगाने पूर्ण होईल.

कागदपत्रांची पूर्तता गरजेची आजपर्यंत जिल्ह्यात ८८४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

मात्र, यापैकी काही विद्यार्थ्यांनीच आवश्यक कागदपत्रांसह सुविधा केंद्राकडून नोंदणी निश्चित केली. उर्वरित विद्यार्थ्यांनी अद्यापही कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे त्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागणार आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **GENDLAL SAHU /GAIDLAL SAHU.** NOW MY NEW NAME IS **GENALAL SAHU.**
**ADD :** RANAPRATAP NAGAR NAGPUR -22

MY OLD NAME WAS **ANKITA CHOUDHARI.** NOW MY NEW NAME IS **MAHEK MANOJKUMAR KESWANI.**
**ADD :** PLOT NO.14-I,HEMU KALANI COLONY, NEAR HANUMAN MANDIR, JARIPATKA, NAGPUR-440014

MY OLD NAME WAS **RAJENDRA BAIS / RAJENDRASIH BAIS.** NOW MY NEW NAME IS **RAJENDRASING BAIS.**
**ADD :** N.H.06, NEAR RESTARENT BAR SIRPUR PO. SHIRPUBAGH COLONY GONDIA

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **K6771706**. MY OLD NAME WAS **MAKARAND HADAP.** NOW MY NEW NAME IS **MAKRAND BHALCHANDRA HADAP.**
**ADD :** PLOT NO 30 VAISHALI APT RAMKRISHNA NAGAR KHAMLA NAGPUR 440025

MY OLD NAME WAS **CHAUHAN TUSHAR ANILSINGH.** NOW MY NEW NAME IS **TUSHARSINGH ANILSINGH CHAWHAN.**
**ADD :** HOUSE NO 1086 B/96 BANGADE PLOT SHITLA MATA MANDIR, SHANTI NAGAR, NAGPUR- 440002

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

भारतीय वंशाच्या प्रसिद्ध बायोटेक्नॉलॉजिस्ट आणि शास्त्रज्ञ डॉ. परविंदर कौर यांनी इतिहास रचला असून ऑस्ट्रेलियन संसदेत निवडून येणाऱ्या त्या पहिल्या शीख महिला ठरल्या आहेत. पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या विधान परिषदेचे (एमएलसी) सदस्य म्हणून अलिकडेच त्या निवडून आल्या आहेत. ही केवळ वैयक्तिक कामगिरी नाही तर नेतृत्व, समानता आणि समावेशनाच्या दिशेने केलेली मोठी प्रगती मानली जात आहे.



## ठसा उमटवणारी कामगिरी

डॉ. कौर यांनीही सोशल मीडियावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, हा फक्त माझा विजय नाही तर हे प्रतिनिधित्व आणि समावेशाच्या दिशेने टाकलेले एक सामूहिक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

डॉ. परविंदर कौर यांचा जन्म आणि शिक्षण भारतात झाले. पुढे पीएचडी स्कॉलर म्हणून त्या ऑस्ट्रेलियात गेल्या. तेथे त्यांनी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात मोठा ठसा उमटवला. त्यांनी १५ वर्षांहून अधिक काळ जीनोमिक्स (डीएनए आधारित संशोधन) मध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः लुप्तप्राय प्रजातींच्या संवर्धनातील त्यांचे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. डॉ. कौर यांनी एका नाविन्यपूर्ण डीएनए लॅबचे नेतृत्व केले आहे. हा प्रकल्प विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जैवविविधता संवर्धनाला चालना देण्यासाठी काम करतो. विज्ञान समाजाच्या सेवेत आणणे हे सर्वात महत्त्वाचे काम असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

डॉ. कौर यांनी आपल्या राजकारणातील प्रवेशाचे वर्णन 'नवीन करिअर' म्हणून केले नाही, तर ते एक 'कॉलिंग' म्हणून केले आहे. म्हणजेच हा करिअर बदल नाही तर या सुंदर देशाची सेवा करण्याची संधी आहे, असे त्यांचे मत आहे. यासपाने आपण विज्ञान, समुदाय आणि अनुभवाची शक्ती संसदेत आणत आहोत, असे मत त्या व्यक्त करतात.

मानिनी

लेबर सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात डॉ. कौर संसदेत आल्या. लेबर पार्टीच्या तिकिटावर त्यांना १३ वे स्थान मिळाले. त्यांचा प्रवास संपूर्ण राज्याला फायदा देणाऱ्या आणि कायमचा वारसा निर्माण करणाऱ्या कामापर्यंत सुरूच राहील. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये महात्मा गांधींचे नावही उद्धृत केले. स्वतःला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वतः हरवून जाणे असा आहे, असे त्या म्हणतात.

डॉ. कौर यांचे योगदान केवळ संशोधन प्रयोगशाळांपुरते मर्यादित नाही. त्या विज्ञान संवाद समर्थक आणि लिंग समानता सल्लागारही म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी 'एक्स प्लांटा प्रायव्हेट लिमिटेड' नामक एका बायोटेक स्टार्टअपची स्थापना केली आहे. ही संस्था नैसर्गिक आरोग्य उपाय विकसित करते. त्यांच्या कामगिरीमध्ये ऑस्ट्रेलियन अकादमी ऑफ सायन्सेसने दखल घेतली असून 'सायन्स अँड इनोव्हेशन अवॉर्ड' (२०१३), मायक्रोसॉफ्टचा 'एआय फॉर अर्थ अवॉर्ड' (२०१९-२०), 'वेस्टर्न ऑस्ट्रेलिया महिला हॉल ऑफ फेम' (२०२३) आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. कौर यांची प्रेरणादायी कहाणी भारतीय समुदायाच्या हृदयाला स्पर्श करणारी आहे.



## नियोजन चोख ठेवा

वर्षाविहाराचा आनंद काही वेगळाच असतो. तुम्हीही मित्रमैत्रिणी वा कुटुंबासह पावसाळ्यात भटकंती करण्याचा बेत आखत असाल. मात्र हे मजेदार पण तितकेच आव्हानात्मक काम आहे. म्हणूनच पूर्वनियोजनाकडे जातीने लक्ष द्या. गट सहलींमध्ये बजेट आणि योजना समन्वयाची समस्या असते. ती दूर करण्यासाठी खालील ट्रॅव्हलिंग टिप्स नक्की फॉलो करा.

❋ ग्रुप ट्रिपमधील सर्वात मोठे आव्हान प्रत्येकाच्या आवडी-निवडींचा समतोल साधणे हे असते. काही लोकांना साहस आवडते, त्यांना नवीन पदार्थ चाखायचे असतात तर काहींचा एक्सप्लोर करण्यापेक्षा आराम करण्यावर भर असतो. म्हणूनच स्थळ, उपक्रम आणि बजेट ठरवताना यावर सर्वांचे मत घेणे महत्त्वाचे आहे. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यानुसार एक लवचिक योजना आखा. असे केल्यास शेवटच्या क्षणी एखादी नवीन गोष्ट जोडायची झाली तरी कोणालाही अडचण येणार नाही.

❋ बरेच लोक एकत्र असतात तेव्हा पैशांबाबत गोंधळ होणे सामान्य आहे. काही लोकांना जास्त पैसे खर्च करायचे असतात तर काहींना कमी बजेटमध्ये मॅनेज करायचे असते. हा असमोल लक्षात घेऊन आधी सर्वांना विचारा आणि नंतरच हॉटेल, वाहतूक, जेवण आणि उपक्रमांसाठी अंदाजे बजेट सेट करा. सहलीत मजा करा पण नेहमी बजेट लक्षात ठेवा, जेणेकरून नंतर कोणत्याही गोष्टीवरून मतभेद होणार नाहीत.

❋ ग्रुप ट्रिप असताना शेवटच्या क्षणी बुकिंगवर अवलंबून राहू नका. बऱ्याचदा शेवटच्या क्षणी मोठ्या ग्रुपसाठी हॉटेलच्या खोल्या बुक करता येत नाहीत. म्हणून हॉटेल्स आणि वाहतूक व्यवस्था इत्यादी आगाऊ बुक करण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला नंतर काळजी करावी लागणार नाही.

❋ ग्रुप ट्रिपमध्ये एका व्यक्तीला सर्वकाही व्यवस्थापित करणे कठीण होऊ शकते. म्हणून काम वाटून घ्या. उदाहरणार्थ, एखादीचे काम हॉटेल बुक करणे असेल, एखादीने ट्रेनची तिकिटे किंवा कार बुक करण्याकडे लक्ष द्यावे तर एखादीने दररोजचा मेन्यू ठरवावा. यामुळे तुमच्यात समन्वय राहील आणि प्रवासात आराम करू शकाल.

भटकंती

❋ ग्रुप ट्रिपमध्ये सुरक्षितता आणि संवादाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत एकमेकांशी बोलणे, संपर्क साधणे सोपे होईल याची खात्री करा. प्रत्येकाने एकमेकांचे फोन नंबर आणि हॉटेलचा पत्ता सेव्ह केलेला असावा. याशिवाय कुठेही बाहेर जाल तेव्हा सर्वजण एकत्र येतील अशी बैठकीची जागा निश्चित करा. महत्त्वाचे म्हणजे काही आपत्कालीन रोख रक्कम बरोबर ठेवा. गरज पडली तर त्याची मोठी मदत होऊ शकते.

## वारंवार चहाची तल्लफ येते?

वेळेच्या आधी आणि अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात अगदी धूमधडाक्यात आगमन करुन यंदा पावसाने दमदार हजेरी लावली आणि सगळ्यांचीच भंबेरी उडवून दिली. आता पुढचे चार महिने पावसात चिंब होण्याचे आहेत. तेव्हा या वातावरणात तजेला, स्फूर्ती देणारा चहा तर हवाच. पावसाळ्यात चहाची वारंवार तल्लफ येते. मात्र जास्त चहा पिणे आरोग्यास हानी पोहोचवू शकते हे आधीच लक्षात घ्या. चहा पिल्याने मूड ताजा होत असला आणि त्याचे तात्पुरते काही फायदे असले तरी तोटेदेखील बरेच आहेत. विशेषतः तुम्ही चुकीच्या वेळी चहा प्यायला तर ते निश्चितच धोकादायक ठरु शकते. म्हणूनच चहा पिण्याची योग्य आणि चुकीची वेळ लक्षात घ्यायला हवी. आज याविषयी जाणून घेऊ या.

❋ चहा कधीही रिकाम्या पोटी पिऊ नये, कारण यामुळे कॉर्टिसॉल असते. रिकाम्या पोटी चहा घेतल्यास छातीत जळजळ वाढते आणि कालांतराने अल्सरदेखील होऊ शकतो.



आहारशास्त्र

❋ रात्री झोपण्यापूर्वी तीन ते चार तास आधी चहा अजिबात पिऊ नये. यामुळे तुमची झोप बिघडू शकते आणि चिंता तसेच निद्रानाशाच्या समस्या वाढू शकतात.

❋ तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असेल तर जास्त चहा पिणे अत्यंत हानिकारक ठरू शकते. चहाचे स्वरूप आम्लयुक्त असल्यामुळे छातीत जळजळ वाढते.

❋ जेवणापूर्वी किंवा नंतर चहा पिणे टाळावे कारण चहामुळे पचनसंस्थेची पोषक तत्वे शोषण्याची क्षमता कमी होऊ शकते.

आता तुम्ही विचार करत असाल की, चहा पिण्याच्या सर्व वेळा चुकीच्या असतील तर योग्य वेळ कोणती? मैत्रिणींनो, तुम्ही उठल्यानंतर एक-दोन तासांनी चहा पिऊ शकता. शक्यतो दुपारी १२ वाजण्यापूर्वी चहा घ्या. विशेष म्हणजे नाश्त्यात काजू आणि पौष्टिक बिया खाल्ल्यानंतरच चहा प्या. कधीकधी रात्री तुम्ही चहा पिऊ शकता. तथापि, हे फक्त रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्यांसाठी सूचवले जाते. अन्यथा कोणताही आहारतज्ज्ञ रात्री चहा पिण्याचा सल्ला देत नाही.



## व्यवसाय करा, यशस्वी व्हा

अनेकींना नोकरीच्या चक्रात अडकायचं नसतं. कौटुंबिक जबाबदारी किंवा इतर काही कारणांमुळे त्यांना नोकरीच्या वेळा सांभाळता येत नाहीत. अशा वेळी घरीच एखादा व्यवसाय करण्याचा विचार केला जातो. तुम्ही गुणवत्तेच्या बळावर पुढे जाऊ शकता. एखाद्या कौशल्याच्या आधारे चांगले उत्पन्न मिळवू शकता. नवी कौशल्यं आत्मसात करू शकता.

स्कील डेव्हलपमेंट

❋ नृत्य कौशल्य असणाऱ्या महिला घरात नृत्याचे वर्ग सुरू करू शकतात. सध्या शास्त्रीयच नाही तर वेस्टर्न डान्सलाही प्रचंड मागणी आहे. तुम्ही उत्तम नृत्यांगना असाल तर डान्स क्लास सुरू करू शकता. सध्या झुंबा डान्सचीही क्रेझ आहे. हा नृत्यप्रकार शिकून तुम्ही झुंबा डान्स क्लास सुरू करू शकता.

❋ तुमच्या हाताला चांगली चव असेल तर केटरिंगचा व्यवसाय सुरू करता येईल. टिफिन सेंटरचा पर्यायही तुमच्याकडे आहे. विविध खाद्यपदार्थ बनवून त्यांची विक्री करता येईल.

❋ सध्या फिटनेसबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. योगा, मेडिटेशन करण्याकडे लोकांचा कल आहे. योगाचं प्रशिक्षण घेऊन तुम्ही योग क्लास सुरू करा. मेडिटेशनची तंत्रही शिकवता येतील.

❋ घरच्या घरी शिकवणी वर्ग घेता येतील. अगदी पहिलीपासून दहावी, बारावीच्या मुलांचे शिकवणी वर्ग तुम्ही घेऊ शकता.

## खजुराची चविष्ट बर्फी

मिठाई खायची असल्यास दुकानात जाण्याची गरज नाही. घरीच तुम्ही छान छान पदार्थ करु शकता. चला तर, आज आक्रोड-खजुराची चविष्ट बर्फी बनवून बघा.

**साहित्य :** अर्धा कप आक्रोड, एक कप खजूर, चमचाभर तूप इत्यादी.

**कृती :** प्रथम खजुरातल्या बिया काढून छोटे तुकडे करा. आक्रोडाचेही छोटे तुकडे करून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात तूप घाला. तूप वितळल्यावर त्यात आक्रोडचे तुकडे परतून घ्या. आता परतलेले तुकडे बाजूला ठेवा. याच कढईत खजुराचे तुकडे घालून परता. दोन ते तीन मिनिटात खजूर


रसगंधा

वितळू लागेल. खजूर वितळायला सुरुवात झाली की त्यात आक्रोडाचे तुकडे घाला. हे मिश्रण सतत हलवत रहा. साधारण पाच मिनिटांनी खजूर आणि आक्रोड एकजीव होतील. त्यानंतर गॅस बंद करा. एका ताटाला थोडं तूप लावून त्यात आक्रोड खजुराचं मिश्रण घाला. हे मिश्रण थंड झाल्यावर चौकोनी किंवा आयताकृती वड्या कापून घ्या. चविष्ट मिठाईचा आस्वाद घ्या.



## वापरावे कोणते सनस्क्रीन?

सध्या बाजारात अनेक प्रकारचे सनस्क्रीन विकले जात आहेत. अशा परिस्थितीत कोणते सनस्क्रीन चांगले हे ठरवणं आणि खरेदी करणे कठीण ठरते. सनस्क्रीन स्टिक, सनस्क्रीन स्प्रे आणि सनस्क्रीन जेल यामधून कशाची निवड करावी हे समजत नाही. म्हणूनच आज याविषयी सविस्तर जाणून घेऊ या.



❋ **सनस्क्रीन स्टिक-** हे सनक्रीन कडक स्वरूपात येते आणि ते थेट त्वचेवर लावले जाते. ते लिप बाम किंवा डिओडोरंट स्टिकसारखे दिसते. फायद्यांबद्दल बोलायचे झाले तर ते लावणे खूप सोपे आहे. विशेषतः डोळे, नाक किंवा कानाखाली ते सहज लावता येते. मुख्य म्हणजे लावल्यानंतर ते पसरत नाही आणि चिकटही वाटत नाही. ते सहजपणे बॅगेत ठेवता येते आणि प्रवास करताना पुन्हा-पुन्हा लावणे देखील सोपे आहे. तसेच त्वचा संवेदनशील असेल किंवा तुम्हाला क्रीम किंवा लोशनचा त्रास होत असेल तर सनस्क्रीन स्टिकहा एक चांगला पर्याय असू शकतो.

❋ **सनस्क्रीन स्प्रे-** हे एका एरोसोल कॅनमध्ये येते आणि त्वचेवर फवारले जाते. हा सनस्क्रीन वापरण्याचा सर्वात सोपा आणि जलद पर्याय आहे. खास वैशिष्ट्य म्हणजे ते मागच्या किंवा पायांसारख्या कठीण भागांवर देखील सहजपणे लावता येते. यातही चिकटपणाची समस्या नसते.

❋ **सनस्क्रीन जेल-** हे हलक्या, जलाधारित फॉर्म्युलामध्ये येत असल्यामुळे त्वचेवर सहज पसरते तसेच लवकर शोषले जाते. याशिवाय ते हलके असते. चिकट नसल्यामुळे चेहरा तेलकट होत नाही. तसेच याच्या वापराने चेहऱ्यावर मुरूम किंवा ॲलर्जीचा त्रासही जाणवत नाही. हे सनस्क्रीन त्वचेवरील छिद्रे बंद करत नाही. सनस्क्रीन जेल शरीराच्या केसाळ भागांवर सहज लावता येते. कोणताही सनस्क्रीन निवडताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते नियमितपणे आणि योग्य प्रमाणात लावणे. कमीत कमी

स्कीन केअर

एसपीएफ ३० आणि ब्रॉड-स्पेक्ट्रम असणारे (यूव्ही आणि यूव्हीबी या दोन्हीपासून संरक्षण करणारे) सनस्क्रीन निवडावे. ते दर दोन-तीन तासांनी लावायला विसरू नये.

## आधी शिक्षणाकडे लक्ष दे

१८ वर्षांची तरुणी असून सध्या बारावीत शिकते आहे. मी अभ्यासात हुशार आहे. प्रशासकीय अधिकारी बनावं, अशी माझ्या पालकांची इच्छा आहे. मलाही उत्तम करिअर घडवायचं आहे. भविष्यात पालकांना माझं लग्न आयएएस अधिकाऱ्याशी लावून द्यायचं आहे. त्यांनी अनेकदा याचं सुतोवाच केलं आहे. याच कारणामुळे पालक मला इतर मुलांशी बोलू देत नाहीत. ते माझ्या करिअरकडे खूप गांभीर्याने बघतात. मात्र गेल्या तीन वर्षांपासून मी एका मुलाच्या प्रेमात पडले आहे. तो इंजिनिअर असून लवकरच उत्तम पगाराची नोकरी मिळेल याबाबत मला अजिबात शंका नाही. पण माझ्या पालकांना श्रीमंत नाही तर प्रतिष्ठित जावई हवा आहे. त्यामुळे ते आमच्या लग्नाला परवानगी देणार नाहीत, असं मला वाटतं. पालकांची बाजूही योग्य आहे. अशा परिस्थितीत मी काय करू?


– मैत्रिणी, तू अजून लहान आहेस. सद्य परिस्थितीत तू करिअरकडे लक्ष देणं गरजेचं आहे. एवढ्या लहान वयात भविष्याचा निर्णय घेणं खरं तर योग्य नाही. तू बारावीत आहेस. त्यामुळे तू अभ्यासालाच प्राधान्य द्यायला हवं. दुसरीकडे तुझ्या प्रियकरानेही नुकतीच इंजिनिअरींगची पदवी मिळवली आहे. त्यामुळे त्यानेही पुढच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करायला हवं. आयुष्यात बस्तान बसवण्याचे हे दिवस आहेत. तुला आयएएस अधिकारी बनवण्याचं पालकांचं स्वप्न आहे. त्यामुळे आत्ता त्यांच्यापुढे तुमच्या लग्नाचा किंवा नात्याचा विषय काढणं योग्य ठरणार नाही. तुम्हा दोघांनी करिअरवर लक्ष केंद्रित करावं हेच त्यांचं मत असेल. त्यामुळे थोडा धीर धर. अभ्यासावर लक्ष केंद्रित कर. मधल्या काळात प्रियकराच्या संपर्कात रहा. त्याला परिस्थितीची कल्पना दे. आयुष्यातली ध्येय साध्य करा. मगच लग्नाचा विषय काढा.

काय करू?



हेअर केअर

### केस वाढतील पटकन



काळेभोर, लांब केस खूप छान दिसतात. लग्न किंवा दुसऱ्या एखाद्या समारंभासाठी केस वाढवावेसे वाटतात. पण बराच वेळ लागतो. मात्र केस लवकर वाढण्यासाठी काही उपाय करता येतील. केस वेळोवेळी ट्रिम करून घ्या. केस ट्रिम केल्याने फाटे फुटलेल्या केसांचं प्रमाण कमी होतं आणि केस वाढायला मदत होते. केसांना प्रथिनांची गरज असते. यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करा. केसांवर विविध उत्पादनांचा मारा करू नका. नैसर्गिक पद्धतीने केस वाढू द्या.

स्मार्ट टिप्स

### गॅसची बचत करा



स्वयंपाकाचा गॅस लवकर संपत असेल किंवा त्याचा वापर अधिक प्रमाणात होत असेल तर या टिप्स फॉलो करा. यामुळे गॅस फार वाया जाणार नाही. कोणताही पदार्थ बनवण्याआधी सगळी तयारी करून ठेवा. भाज्या, भात कूकरमध्ये शिजवा. भांड्यावर झाकण ठेवल्याने अन्न लवकर शिजतं आणि गॅसही कमी वापरला जातो. त्यामुळे अन्नपदार्थ शिजवताना भांडं झाकून ठेवा. फार मोठ्या भांड्यांचा किंवा कढईचा वापर करू नका. पदार्थाच्या प्रमाणानुसार भांड्यांचा वापर करा. थंड पदार्थ गरम व्हायला वेळ लागत असल्याने फ्रीजमधल्या भाज्या, दूध साधारण तासभर आधी बाहेर काढून ठेवा. अशा प्रकारे तुमचा गॅसची बचत होईल.

स्मार्ट टिप्स

### असा टिकवा परफ्युमचा सुगंध



परफ्युमचा सुगंध सगळीकडे दरवळायला हवा. मात्र परफ्युम स्प्रे करताना होणाऱ्या चुकांमुळे हा सुगंध फार वेळ टिकत नाही. म्हणूनच परफ्युम कधीही चोळून लावू नये. ते फवारा. त्यातही परफ्युम अंगावर फवारणं गरजेचं आहे. कपड्यांवरचं परफ्युम फार काळ टिकून रहात नाही. कोरड्या त्वचेवर परफ्युम फार काळ टिकत नाही. त्यामुळे त्वचेवर ऑईल फ्री मॉईश्चरायझर लावून मगच परफ्युम स्प्रे करा.

# भाजप आमदारांच्या गाड्या रोखणे सुरू

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १२ :

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन सूरू करणारे माजी आमदार बच्चू कडू यांचे मोठ्या प्रमाणात समर्थन होवू लागले आहे. विविध माध्यमातून संताप व्यक्त केल्या जात आहे.

भाजप विरोधक व सामाजिक कार्यकर्ते पण कडू यांचे समर्थन करीत राज्य सरकारला पेचात पकडत असल्याचे चित्र आहे. अमरावतीशी वर्धेपेक्षा अधिक जवळीक साधणारा तालुका म्हणून परिचित आर्वी तालुक्यातून आंदोलनास धार चढू लागली आहे.

प्रहार सामाजिक संघटनेचे बाळा जगताप यांनी कडू समर्थनार्थ आक्रमक भूमिका घेणे सूरू केले आहे. बुधवारी त्यांनी आपल्या समर्थकांसोबत आर्वी तहसीलदार कार्यालयात आता कपडेच शिल्लक राहले असे म्हणत ते पण ठेवून घ्या, अशी भूमिका घेतली. त्यामुळे प्रशासनात खळबळ उडाली. आज जगताप परत आक्रमक झाले. त्यांनी रस्ता रोको सूरू केले.



आज अमरावती आर्वी रस्त्यावर जगताप व त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्त्यावर लोटांगण घातले. आर्वीतून येणारे भाजप आमदार दादाराव केचे यांची गाडी अडविण्यात आली. रस्त्यावर आंदोलक दिसताच केचे यांनी गाडी थांबवण्यात आली. यावेळी केचे गाडीतून उतरल्यावर जगताप यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रश्न विचारला.

विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपने शेतकऱ्यांवर असलेले कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते. तसेच सोयाबीन पिकास प्रती क्विंटल भाव देणार असल्याची हमी दिली होती. आता सत्तेवर आलात. मात्र त्यावर चकार शब्द बोलत नाही. हे कां, असा सवाल जगताप यांनी केला. त्यावर आमदार दादाराव केचे यांनी ही बाब मान्य केली. या बाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून लक्ष वेधतो, असे उत्तर दिले.

तसेच मी विधान परिषदेच्या सभागृहात शेतकऱ्यांचा प्रश्न नक्की मांडतो, असेही कबूल केले. त्यानंतरच आमदार केचे यांची गाडी पुढे निघाली. मात्र या घटनेने काही काळ वाहतूक ठप्प पडली होती.

**बच्चू कडू समर्थक आक्रमक**
**वाहतूक ठप्प**

प्रहारचे बाळा जगताप व सुधीर जाचक, अंकुश गोटेफोडे, छोटू चव्हाण, गोलू वाघ, विक्रम भगत व अन्य शेतकरी या रस्ता रोको आंदोलनात सहभागी झाले होते. बेमुदत अन्नत्याग करीत आंदोलन छेडणारे बच्चू कडू यांनी विविध मागण्या केल्या आहेत. कर्जमाफी सोबतच दिव्यांग व विधवा महिलांना ६००० रुपये मानधन, हमीभावावर २० टक्के अनुदान, तरुणांच्या हाताला काम व शेतमालाला दाम, शेतकऱ्यांप्रमाणेच शेतमजूरास आर्थिक मदत मिळावी, ग्रामीण भागातसुद्धा घरकुल बांधण्यास ५ लाख रुपयाचे अनुदान मिळावे व अन्य एकूण १७ मागण्या आहेत.

# मन हेलावून टाकणारी घटना

■ महासागर प्रतिनिधी / नागपूर/मुंबई, दि. १२ :

अहमदाबाद येथील विमानतळावर झालेल्या विमान अपघातावर देशभरातील नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळल्याची घटना मन हेलावून टाकणारी असल्याची भावना या सर्व नेत्यांनी व्यक्त केली आहे.

अहमदाबाद-लंडन विमान भीषण अपघात अत्यंत हृदयद्रावक, वेदनादायक आहे. अपघातात अनेकांनी आपल्या घरातील कर्ते आणि जीवलग गमावले आहेत. काळाने घातलेली ही झडप अनेक कुटुंबियांसाठी शब्दांच्या पलिकडची आणि हृदय पिळवटून टाकणारी आहे. या सगळ्यांच्या दुःखात आम्ही सर्व महाराष्ट्राची जनता सहभागी आहे. या कठीण प्रसंगात महाराष्ट्रातील नागरिक, आमच्या सर्व यंत्रणा गुजरातमधील शासन-प्रशासनासोबत ठामपणे उभे आहोत. या आपत्तीच्या काळात अपघातग्रस्त परिसरासह, प्रवाशी आणि जखमींसाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेत सक्रीय सहभाग देण्यात येत आहे.

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आज दुपारी गुजरातमध्ये घडलेला भीषण विमान अपघात अत्यंत वेदनादायक आणि मन हेलावून टाकणारा आहे. या अपघाताच्या दुर्घटनास्थळावरून जे दृश्य समोर येत आहे, ते पाहून काळजाचं पाणी होतं. या अपघातात विमानातील दोन महाराष्ट्रीय कर्मचाऱ्यांचा सुद्धा मृत्यू झाला आहे. जीव गमावलेल्या सर्व प्रवाशांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. या कठीण प्रसंगी आम्ही सगळे गुजरात शासनासोबत असून महाराष्ट्र सरकार आवश्यक ती सर्व मदत करेल.

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अहमदाबाद विमान अपघातात प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांचा झालेला मृत्यू धक्कादायक, क्लेशदायक आणि दुर्दैवी घटना आहे. या विमान अपघातामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देश आज दुःखी असून मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात प्रत्येक महाराष्ट्रवासी सहभागी आहे. अपघाताचं निश्चित कारण अद्याप कळलं नसलं तरी चौकशीअंती ते स्पष्ट होईल. परंतु अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पावलं उचलण्याची गरज आहे.

■ उपमुख्यमंत्री अजित पवार

गुजरातच्या अहमदाबाद येथे एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळल्याची घटना मन हेलावून टाकणारी आहे. या दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली आहे. अपघातग्रस्त जखमी प्रवाशांवर उपचार करणाऱ्या आणि घटनास्थळी मदतकार्यासाठी काम करणाऱ्या यंत्रणांना बळ मिळो आणि जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करतो.

■ शरद पवार

अहमदाबाद जवळ एअर इंडिया फ्लाइटच्या अपघाताची बातमी अतिशय धक्कादायक व दुःखद आहे. या विमानात २४२ नागरिक प्रवास करीत होते. त्यामध्ये २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्स होते. सर्व संबंधित यंत्रणांनी बचाव कार्य सुरू केले असून, तपास सुरू आहे. या अपघातातील सर्व प्रवाशांच्या सुरक्षेची मी आई जगदंबेकडे कामना करतो.

■ चंद्रशेखर बावनकुळे

अहमदाबाद येथील विमान अपघाताबद्दल ऐकून धक्का बसला, या घटनेमुळे मला व्यक्तीशः अत्याधिक दुःख झाले. या दुर्घटनेत बचावलेल्यांच्या व विमानातील सर्वांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी मी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

■ आदित्य ठाकरे

# सकाळी उलट्या, उठण्यासाठीही त्रास...

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १२ :

प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी अन्न त्याग आंदोलन सुरू केले आहे. गेल्या पाच दिवसांपासून बच्चू कडू यांचं हे आंदोलन सुरू आहे. या पाच दिवसात बच्चू कडू यांनी अन्नाचा कणही घेतला नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती अत्यंत खालावली आहे.

आज सकाळीच त्यांना उलट्या झाल्या. उठून बसण्यासाठीही त्रास होत आहे. त्यामुळे बच्चू कडू यांच्या राज्यभरातील कार्यकर्त्यांची चिंता वाढली आहे. बच्चू कडू यांचे कार्यकर्ते उपोषणस्थळी येत आहेत.

बच्चू कडू यांच्या अन्न त्याग आंदोलनाचा आत पाचवा दिवस आहे. पाच दिवसात बच्चू कडू यांनी अन्नाचा कणही घेतला नसल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. पाच दिवसापासून पोटात अन्नाचा कणही नसल्याने त्यांचे वजन चार किलोने घटलं आहे.

दरम्यान, बच्चू कडू यांची भेट घेण्यासाठी अमरावतीत राज्यभरातून नेते येत आहेत.



माजी मंत्री महादेव जानकर यांनीही बच्चू कडू यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी हे उपोषण स्थळी पोहोचले आहेत.

दोन्ही नेत्यांमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा सुरू झाली आहे. तर, बच्चू कडू यांची प्रकृती खालावल्याने त्यांची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय पथक घटनास्थळी दाखल झालं आहे.

## सूरजागड लोह खाणीसाठी
## सव्वा लाख झाडे तोडण्यास मंजुरी

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १२ :

जिल्ह्यातील सूरजागड लोह खनिज खाणीसाठी पर्यावरण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडला ९०० हेक्टर जंगल क्षेत्रातील १.२३ लाख झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली आहे.

कंपनीच्या खाण उत्खनन क्षमतेत वाढ करण्यासाठी दोन महिन्यांपूर्वी जनसुनावणी घेण्यात आली होती. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ज्ञ मूल्यांकन समितीने उत्खनन क्षमता १० दशलक्ष टनांवरून २६ दशलक्ष टनांपर्यंत वाढवण्यास मान्यता दिली आहे.

सूरजागड टेकडीवर गेल्या तीन वर्षांपासून लोहखनिज उत्खननाचे काम सुरू आहे. राज्य सरकारने लॉयड्स मेटल्स कंपनीला ३४८ हेक्टर परिसरात खाणकाम करण्याचे कंत्राट दिले आहे.

वनहक्क कायद्यानुसार आदिवासींच्या जमिनीवरील हक्क आणि पारंपरिक वनाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका प्रलंबित असतानाच ही मान्यता देण्यात आली आहे.

## वाघाच्या हल्ल्यात तरुण शेतकरी ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :



बोर व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत शेतशिवारात वाघाने केलेल्या हल्ल्यात तरुण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली. आशिष अवथळे (वय ३२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. तो मेटहिरजी येथील रहिवासी होता. मुख्य म्हणजे गेल्या वर्षीच त्याचे लग्न झाले होते.

बोर व्याघ्रप्रकल्पात बुधवारी घडलेल्या घटनेने पुन्हा एकदा मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बोर व्याघ्र प्रकल्पातील गरमसूर लगत असलेल्या मेटहिरजी शेतशिवारात बुधवारी सायंकाळी वाघाने शेतकऱ्यावर अचानक हल्ला केला. यात तरुण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थासह वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आशिष अवथळे हा शेतकरी गुरांना चारा देऊन गावी परतत होता. हिंगणी वन्यजीव अभयारण्यातील उमरविहिरी या वनक्षेत्रात घडली, ज्यामुळे खळबळ उडाली. मृत आशिष हा गुरे चराईचे काम करत होता. परतताना बोर व्याघ्रप्रकल्पाच्या हिंगणी वनपरिक्षेत्रातील उमरविहिरी बीटच्या कंपार्टमेंट क्रमांक ४१ मध्ये झुडपात लपलेल्या वाघाने अचानक त्याच्यावर हल्ला केला. अवघ्या काही क्षणातच त्याचा मृत्यू झाला.

घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. माहिती मिळताच, हिंगणी वनपरिक्षेत्रातील वरिष्ठ वन्यजीव अधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. घटनेचा पंचनामा तयार केल्यानंतर, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून वाघ परिसरात मुक्तपणे फिरत आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा हल्ला वाघिणीने केला होता. सुरक्षेच्या कारणास्तव, वनविभागाने परिसरात ट्रॅप कॅमेरे बसवले. परिसरातील शेजारील गावांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## : लोक सेवार्थ :

ठाणे, मुंबई येथील नशा मुक्ती केंद्र

न्यू लाईफ केअर फाउंडेशन हे ठाणे, मुंबई येथील सर्वोत्तम नशा मुक्ती केंद्रांपैकी एक आहे जे व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन कार्यक्रम देते.

हे केंद्र किफायतशीर अल्पकालीन आणि दीर्घकालीन निवासी पुनर्वसन कार्यक्रम ऑफर करतो जे व्यसनाधीन व्यक्तीने वापरलेल्या पदार्थानुसार तयार केले जातात जे आशा, आरोग्य आणि तुमचे नातेसंबंध पुनर्संचयित करण्यास मदत करतात.




लोकजागर

अल्कोहोल किंवा इतर कोणत्याही ड्रग्जचे व्यसन हे देशातील सर्वात मोठ्या आरोग्य समस्यांच्या श्रेणीत येते.आयुष्याच्या कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर मद्यपानाच्या सवयींवर अंकुश ठेवण्यासाठी अनेक लोक संघर्ष करतात. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने २०१३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार, जगभरात २४६ दशलक्ष लोक (२० पैकी १) जे १६ ते ६५ वयोगटातील आहेत, ते बेकायदेशीर औषधांच्या अतिरेकी वापरामुळे त्रस्त आहेत.

या संख्येपैकी, सुमारे २७ दशलक्ष लोक ड्रग्जच्या वापराने त्रस्त आहेत जिथे १० पैकी १ मुलाला मद्यपानाच्या समस्या असलेल्या पालकांसोबत राहण्यास भाग पाडले जाते.व्यक्तीला दारूचे किंवा कोणत्याही प्रकारच्या ड्रग्जचे व्यसन असो, ते काही काळासाठी त्यांचे आयुष्य गमावू शकते. परिस्थिती कितीही वाईट वाटली तरी, चांगली बातमी अशी आहे की थोड्याशा प्रयत्नाने ही भर प्रभावीपणे बरी होऊ शकते आणि आयुष्यभर व्यवस्थापित केली जाऊ शकते. त्यासाठी फक्त चांगल्या उपचारांची आवश्यकता आहे!

हे लक्षात घेऊन, आम्ही न्यू लाईफ केअर फाउंडेशन, मुंबईतील एक आघाडीचे शीर्ष नाशा मुक्ती केंद्र, मानसिक आरोग्य संस्थेने (महाराष्ट्र, भारत) परवाना दिलेले ड्रग्ज व्यसनी आणि अल्कोहोल व्यसनासाठी मानसोपचार नर्सिंग होम, पुनर्वसन आणि डिटॉक्सिफिकेशन सेंटर येथे रुग्णांवर त्यांच्या व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि पुनर्वसन कार्यक्रमांद्वारे उपचार करण्यासाठी एक समग्र दृष्टिकोन अवलंबतो. संस्था व्यक्ती आणि कुटुंबांना व्यसनमुक्ती मिळविण्यात मदत करण्यासाठी वचनबद्ध आहे म्हणजेच संपूर्ण नशा मुक्ती.करिता संस्था सातत्याने कार्यरत आहे. या नशामुक्ती केंद्रामध्ये व्यसनी व्यक्तीवर उपचार केले जातात आणि त्यांच्या अस्तित्वाची कदर देखील केली जाते. या केंद्रात आलेल्या प्रत्येक नशाधीन व्यक्तीवर वैयक्तिक लक्ष आणि वैयक्तिकृत उपचार कार्यक्रम हाती घेतले जातात. नवीन रुग्णांसाठी मोफत समुपदेशन आणि सल्लामसलत देखील केली जाते. संस्था नाशाधीन व्यक्तींच्या केवळ पुनर्वसनाची काळजी घेत नाही तर त्यांच्या पुनर्एकीकरणावर देखील काम करते. व्यसनमुक्ती उपचारांसाठी अत्यंत व्यावसायिक दृष्टिकोन देखील संस्था ठेवते. ■

## : शून्यातून विश्व :
## शिक्षण सेवक
## डॉ. दशरथ



१९८० साली अक्कलकोट येथे दशरथ भोसले शिकायला होते. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील मुन्नर. त्यांची आई सुभद्रा दिवसभर कष्ट करायची. काम आटपून उशिरा झोपल्यानंतर एक-दोन तास झोपली की, पुन्हा रात्री दोन-अडीच वाजता ती उठायची. दशरथ यांच्यासाठी भाकरी बनवायची.

दररोज मुन्नरहून अक्कलकोटसाठी पहाटे ४ वाजता एकच एसटी यायची. सुभद्राबाई त्या एसटीमध्ये भाकरी ड्रायव्हरच्या सिटखाली ठेवायच्या, तर ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या लेकराला उपवास घडू नये, म्हणून तिची धडपड.

एकेदिवशी अशीच भाकरी पाठवली. त्या भाकरीसोबत मीठ टाकून उकडलेले एक वांगे होते. ते पाहून दशरथ यांना रडू कोसळले. आईने घरातले शेवटचे उरलेले एक वांगे दशरथ यांना भाकरीसोबत पाठवले होते. याचा अर्थ आईला आज कोरडी भाकरी खावी लागेल. त्याचवेळी दशरथ यांनी ठरवले की, ही परिस्थिती पालटण्यासाठी आपण शिकायचे.

आज तेच दशरथ पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतात. पुण्यात त्यांच्या एक-दोन नव्हे, तर आठ प्रख्यात शाळा आहेत आणि तीन महाविद्यालये आहेत. सुभद्रास नर्सरी भोसले पब्लिक इंटरनॅशनल स्कूल, पुणे अर्थात एसएनबीपी हे पुण्याच्या शैक्षणिक वर्तुळातले आघाडीचे नाव. या शिक्षणसंस्थेत तब्बल १ हजार, ५०० शैक्षणिक कर्मचारी कार्यरत आहेत.

जवळजवळ तीन लाख विद्यार्थी त्यांच्या शिक्षणसंस्थेतून शिकून बाहेर पडले, तर सध्या २५ हजार विद्यार्थी त्यांच्या शिक्षणसंस्थेत विद्यार्जन करीत आहेत. त्यांच्या संस्थेचे एक आंतरराष्ट्रीय स्तराचे हॉकीचे मैदानही आहे.

ते गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहकार्य करतात. गरीब कुटुंबांनी सक्षम व्हावे, यासाठी ते मदत करतात. कोरडी भाकरी भिजलेल्या आसवांसोबत खाणारे दशरथ आज एमएससी, एमफिल आणि पीएचडी मिळवून डॉ. दशरथ भोसले म्हणून पुण्यामध्ये नावलौकिक मिळवून आहेत.

त्यांनी खासगी शिकवणी सुरू केली. दशरथ यांनी नर्सरी काढण्याचा विचार केला. नेमका तेव्हाच महाराष्ट्र सरकारने स्वयंसेवी संस्थांना शिक्षणासाठी अटीशर्तीसह भूखंड देण्याची जाहिरात काढली. दशरथ यांनी त्यासाठी अर्ज केला. तीन वर्षे पुणे ते मुंबई फाईलचा ते पाठपुरावा करीत राहिले. पण, काम काही होत नव्हते.

मंत्रालयात नेहमीच दिसणाऱ्या एका माणसाने दशरथ यांना सांगितले की, अमूक एक मंत्री आहेत, त्यांना ७५ हजार रुपये दिलेस, तर तुझ्या शाळेसाठी जागा तत्काळ मिळेल. उद्या पहाटे ४.३० वाजता भेटतील. पैसे घेऊन ये. पैसे दिल्याशिवाय काम होत नाही.

दशरथ पुण्याला परतले. त्याच संध्याकाळी कर्ज काढले आणि कसेबसे मुंबईला पोहोचले. तो माणूस तिथे भेटला. साहेबांना पैसे देऊन येतो, तू इथे मंत्रालयाच्या गेटजवळ थांब म्हणाला. दशरथ तिथे पहाटेपासून ते संध्याकाळपर्यंत उभे राहिले. तो काही आलाच नाही. सगळीकडे चौकशी केल्यावर कळले की, तो भामटा होता. अनेकांना त्याने लुटले होते.

कर्ज आणि फसवणूक यांमुळे त्यांना कधी नव्हे, ते असहाय्य वाटले. परंतु समाजातील सज्जनशक्तीने त्यांना साथ दिली. शेवटी शाळेसाठीची ती जागा त्यांना मिळाली. आज त्या एका शाळेपासून ११ शैक्षणिक वास्तू निर्माण झाल्या. आईची माया, प्रेम, प्रेरणा याची जाण असलेल्या दशरथ यांनी आईच्या नावे एक मंदिर बांधले.

ते म्हणतात की, मी यापुढेही सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटा सोप्या व्हाव्यात, यासाठी काम करीत राहणार. डॉ. दशरथ यांचे आयुष्य म्हणजे शून्यातून विश्व निर्माण करू इच्छिणाऱ्यांसाठी खरोखरीच एक प्रेरणेचा स्रोत आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मद्यधुंद एर्टिगा चालकाच धिंगाणा

## अनेक जखमी, ऑटोचालक गंभीर, चालक फरार





■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १२ :

मुर्तीजापुर शहरातील मुख्य रस्त्यावर नाका नं. ७ जवळ आज गुरुवार १२ जून रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास भीषण अपघाताने थरकाप उडवला.

भरधाव आणि मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एर्टिगा कार (एमएच ३० बीएल ७८२०) चालकाने प्रथम रस्त्यावरून पायी जाणाऱ्या इसमाला उडवले आणि त्यानंतर सवारी घेऊन जाणाऱ्या अँपे ऑटोला थेट धडक दिली. या धडकेत ऑटोमधील सात ते आठ प्रवासी गंभीर जखमी झाले, तर काही किरकोळ जखमी आहेत. विशेष म्हणजे ऑटो चालकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असून त्याच्यावर अकोल्यात उपचार सुरू आहेत.

या अपघातात जखमी झालेले काही जण खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. घटनास्थळी तातडीने शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे, पो.कॉ. नंदकुमार टीकार, ज्ञानेश्वर आडे, ट्राफिक पोलीस पंढरीनाथ पोळे यांनी धाव घेत वाहतूक नियंत्रणात आणली व १०८ तसेच खासगी रुग्णवाहिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल केले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एर्टिगाचा चालक मद्यधुंद अवस्थेत निष्काळजीपणे वाहन चालवताना थेट भररस्त्यावर कहर करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अपघात घडल्यानंतर संबंधित चालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. सदर घटनेचा पंचनामा सुरू असून गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया चालू आहे. पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या भीषण अपघातामुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. मद्यधुंद वाहनचालकांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## मनसेच्या भूमिकेची प्रतिक्षा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

आम्ही आमच्याकडून मराठी माणसांची युती व्हावी हा आमचा प्रयत्न सुरू आहे. यात आमची अपेक्षा होती की राज ठाकरे यासाठी प्रतिसाद देतील. पण आज फडणवीस-राज ठाकरे भेटीत काय बोलणं झाले काय तपशील आहे हे अजून आम्हाला माहिती नाही, त्यामुळे त्यावर बोलणं योग्य नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची भेटीवर बोलताना अनिल परब यांनी म्हटले आहे.

ते पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या हितासाठी मराठी माणसांच्या मनातील ठाकरे बंधू एकत्र यावे, यासाठी मी बाकीचे सर्व विषय बाजूला ठेवायला तयार आहे हे उद्धव ठाकरेंनी सांगितले आहे. मनसेने आपली भूमिका स्पष्ट केली तर आम्हाला आमची भूमिका ठरवावी लागेल. आमच्या युतीच्या भूमिकेवर आम्ही आजही ठाम असल्याचे ते म्हणाले.

# महाराष्ट्रात १२ हजार मतदान केंद्रांवर अनियमितता

## काँग्रेस नेते नाना पटोले यांचा आरोप : राष्ट्रपतींकडे केली सरकार बरखास्तीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये अनियमितता झाली असल्याचा आरोप काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी केला होता. त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी वृत्तपत्रातील या सबंधित लेखाला भाजपने देखील प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, त्यानंतर आता काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना याबाबत चौकशी करण्याची मागणी करणारे पत्र लिहिले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या संभाव्य गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी आणि सध्याचे सरकार बरखास्त करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची मागणी पत्राद्वारे महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना केली असल्याची माहिती पटोले यांनी आपल्या पोस्टमध्ये दिली आहे.

भारतीय संविधानात नमूद केलेल्या लोकशाही मूल्यांचे, निवडणुकीचे पावित्र्य आणि सामान्य नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी मी तुम्हाला हे पत्र मोठ्या चिंतेने आणि अपेक्षेने लिहित आहे.

जर निवडणुकीत हेराफेरी झाली असेल तर ती केवळ प्रशासकीय चूक नाही तर संविधानाच्या भावनेवर आणि सामान्य मतदाराच्या हक्कांवर हल्ला आहे. ही गंभीर चिंतेची बाब आहे आणि याची निष्पक्ष, पारदर्शक आणि स्वतंत्र चौकशी करणे ही काळाची गरज आहे.

निवडणुकीतील अनियमिततेची उच्चस्तरीय न्यायिक किंवा विशेष चौकशी समितीकडून चौकशीचे आदेश द्यावे, चौकशी पूर्ण होईपर्यंत, सध्याचे महाराष्ट्र सरकार बरखास्त करा आणि राज्यात पुन्हा निष्पक्ष विधानसभा निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी विनंती पटोले यांनी या पत्राच्या माध्यमातून केली आहे.

### ऑपरेशन सिंदूर म्हणजे कम्प्युटर गेम

भारताच्या वतीने राबवण्यात आलेले 'ऑपरेशन सिंदूर' म्हणजे 'कम्प्युटर गेम' असल्याचे वादग्रस्त वक्तव्य काँग्रेसचे नेते आमदार नाना पटोले यांनी केले आहे.

**भाजपाचे प्रत्युत्तर**



त्यांच्या या विधानावर आता भारतीय जनता पक्षाने देखील टीका केली आहे. नाना पटोले यांचे मन आणि मेंदू भ्रष्ट झाला असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

नाना पटोले यांच्या वक्तव्यानंतर भारतीय जनता पक्ष चांगलाच आक्रमक झाला आहे. 'काँग्रेस का हात पाकिस्तान के साथ' हे पुन्हा एकदा सिद्ध झाले असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून नाना पटोले यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. या देशद्रोही मानसिकतेला देश कधीच माफ करणार नाही, या मानसिकतेचा आम्ही निषेध करत असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

महासागर
नागपूर वृत्तसागर
शुक्रवार, दि. १३, जून २०२५

# पिकनिकला आलेल्या बालकांचा पाण्यात बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १२ :
नागपूर येथील मनिष नगर निवासी स्वप्निल प्रकाश देशमुख(३७) यांनी १२जून ला कोंढाळी पोलीस स्टेशन मधे पोहचून तक्रार नोंदवली की स्वप्निल प्रकाश देशमुख यांचे मोठे भाऊ अमित प्रकाश देशमुख हे आपल्या पत्नी दोन मुले मोठा मुलगा मोणित व लहान मुलगा नैतिक अमित देशमुख व अन्य नातेवाईक यांचे सह नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील बाजार गाव लगतच्या फनफुड व्हिलेज वाटर पार्क येथे ११जून रोजी पिकनिक ला गेले होते . वाटरपार्क मधे पिकनिक दरम्यान पाण्यात खेळतांना नैतिकचा वाटर पार्क मधील पाण्यात पाय घसरून पडला. यादरम्यान एका मुलाने नैतिकता वाटरपार्क मधिल एका मुलाने बाहेर काढले. नैतिक कसलीही हलचल करत नसल्याने नैतिक चे वडिल अमित देशमुख यांनी लगेच वाडी येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर नैतिकचा मृत्यु झाल्याचे सांगितले. तक्रारदार स्वप्निल प्रकाश देशमुख यांनी परत सांगितले कि नैतिकचा फण फुड व्हीलेज मधिल वाटर पार्कचे पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. अशी तक्रार मृत बालक नैतिक अमित देशमुख (७वर्ष आठ महिने) यांचे काका स्वप्निल प्रकाश देशमुख यांनी १२जून रोजी कोंढाळी पोलिस स्टेशन मध्ये येऊन नोंदविली आहे. सध्या स्थितीत याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून शव विच्छेदनानंतर पुढील तपास कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी व स्टाफ करत आहे.

# भारतीय जनता पक्षाचे ११ वर्ष गरीब कल्याणासाठी : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
भारतीय जनता पक्षाचे २०१४ ते २०२५ या कार्यकाळात भारतीय जनता पक्षाच्या सरकारने अनेक ठोस निर्णय घेवून भारतातील सर्व राज्यांत सर्वच क्षेत्रात यशस्वी रीत्या काम करत आहे.

त्या अनुषंगाने नागपूर येथे केंद्रिय रस्ते परिवहन आणि राजमार्ग,मंत्री, नितीन गडकरी, यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन सेंट्रल पॉइंट हॉटेल येथे करण्यात आले होते. त्यावेळी भारत सरकारने जनकल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना माहिती आणि त्यांचं आता पर्यंत किती लोकांना झाला यासंबधी पत्रपरिषदेत दिली.




भारताच्या अमृत पिढीला सशक्त बनवणे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे भारताचे शिक्षणक्षेत्र आंतरराष्ट्रीय दजार्चे झाले,२०१४ ते २०२४ दरम्यानः १५ एम्स, १,०९,१६३ वैद्यकीय प्रवेशासंदभार्तील जागा, ७ आयआयटी, ८ आयआयएम आणि ४२० विद्यापीठांची निर्मिती ,खेलो इंडिया अंतर्गत १,०४८ केंद्रांमार्फत तळागाळातील क्रीडा प्रतिभेचा विकास सर्वांसाठी परवडणारी व सुलभ आरोग्यसेवा आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ५५ कोटींपेक्षा 3 अधिक नागरिकांना ५ लाखांचे वार्षिक मोफत उपचार, ज्यामध्ये ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश आहे.मिशन इंद्रधनुष अंतर्गत, ५.४ कोटी बालक आणि १.३ कोटी गरोदर महिलांचे १२ आजारांपासून संरक्षणासाठी लसीकरण राष्ट्र आणि राष्ट्रीय सुरक्षेला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत नियंत्रणरेषे पलीकडील ९ दहशतवादी तळ नष्ट, सैनिकी आत्मनिर्भरतेचे उदाहरण आहे.कलम ३७० आणि ३५अ हटवून जम्मू-काश्मीरचा संविधानिक व्यवस्थेत आणि राष्ट्रीय एकात्मतेत पूर्णपणे समावेश आहे.

२०२६ मार्चपर्यंत नक्षलवाद समाप्त करण्याचे लक्ष्य; हजारो नक्षलवाद्यांचे समर्पण, अनेक कमांडर निष्प्रभव्यवसाय करणे झाले सुलभ भारताने ईज ऑफ डूइंग बिझनेस निदेशांकात २०१४ मध्ये १४२ व्या स्थानावरून २०१९ मध्ये ६३ व्या स्थानावर झेप घेतली,व्यवसाय सुलभ करण्यासाठी १,५०० पेक्षा जास्त जुने कायदे रद्द केले,

कार्यरत विमानतळांची संख्या २०१४ मधील ७४ वरून २०२५ मध्ये १६० झाली ,(उडान) योजनेअंतर्गत ८६ नवीन विमानतळे आणि ८८ गंतव्य स्थानके जोडली गेली,१३६ जागतिक दर्जाच्या वंदे भारत ट्रेन आता कार्यरत ,दिल्ली-मेरठ रॅपिड रेल्वे, चिनाबवरील जगातील सर्वोच्च रेल्वे पूल, डोंगरात सर्वाधिक लांब रेल्वे बोगदा, पंबन पूल यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प भारताला नवी गती देत आहेत.भारताचे तंत्रज्ञान युग भारताने एका मिशनमध्ये १०४ उपग्रह आणि पहिले खासगी रॉकेट विक्रम-एस लॉन्च करून एक नवीन विक्रम केला आहे,थेट लाभ ( डीबीटी) हस्तांतरणाद्वारे ४४ लाख कोटी वितरित; जनतेची होणारी फसवणूक टाळून ३.४८ लाख कोटीची बचत झाली आहे.

२२ महिन्यांत ९९.६% जिल्ह्यांमध्ये 5 G सेवा पोहोचली; २.१४ लाख ग्रामपंचायती ब्रॉडबँडने जोडल्या गेल्या, इंटरनेट कनेक्शन २८५% वाढले; २०१४ मधील २५.५ कोटींवरून जून २०२४ पर्यंत ९७ कोटींपेक्षा जास्त कनेक्शन झाले.भारताने कोपा २१ लक्ष्य पूर्ण केले, ज्यात ४०% ऊर्जा गैर-फॉसिल इंधन स्त्रोतांपासून मिळते. २०१४ मध्ये सुरू झालेल्या नमामि गंगे कार्यक्रमाअंतर्गत ४९४ प्रकल्पांसाठी ४०,४८१ कोटी मंजूर; ३१५ प्रकल्प पूर्ण, एम ई-बस सेवा योजनेअंतर्गत १४ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ७,२९३ इलेक्ट्रिक बसेस मंजूर केल्या आहेत. अशी माहिती पत्रकार परिषदेत केंद्रिय रस्ते परिवहन आणि राजमार्ग, मंत्री, नितीन गडकरी, आणी भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# अहमदाबाद विमान अपघात
## नागपुरातील तीन जण ठार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
गुरूवारी अहमदाबाद विमानतळावर झालेल्या विमान अपघातात विमानातील सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स ठार झाले आहेत. त्यात नागपुरातील एका कुटुंबातील तीन जणांचा समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार शहरातील व्यापारी मनीष कामदार यांची मुलगी, सासू आणि नात यांचा मृत्यू झाला आहे. यात कुशयशा कामदार, रुद्र मोढा और रक्षा मोढा यांचा समावेश आहे. यशा यांचे लग्न अहमदाबाद येथील मोढा कुटुंबात चार वर्षापूर्वी झाली. हे कुटुंब मूळचे अहमदाबाद आहे. परंतु नंतर ते लंडन येथे स्थायी झाले. ही माहिती मिळताच कामदार कुटुंबीय तातडीने अहमदाबाकडे रवाना झाले.

अहमदाबाद ते लंडन या विमानाला गुरूवारी अपघात झाला आणि सुमारे २४२ प्रवासी ठार झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर काही मिनिटात हा अपघात झाला. त्यामुळे हे विमानतळ बंद करण्यात आले आहे. त्याचा फटका नागपूर विमातळारून उडणाऱ्या विमानांना देखील बसला आहे. अपघातानंतर अहमदाबाद विमानतळावर धुराचे मोठे लोट दिसत आहेत. विमानाने उड्डाण केल्याच्या काही मिनिटांतच ते कोसळले. विमानाने आज दुपारी १.१७ वाजता उड्डाण केले होते. विमानतळाकडे जाणारे अनेक रस्ते बंद करण्यात आले आहेत.अग्निशमन दल आणि वैद्यकीय पथके बचाव कायार्साठी विमानतळावर दाखल झाली असून, आपत्कालीन सेवा सुरू करण्यात आली आहे. कोसळलेल्या विमानात किमान २४२ प्रवासी होते. भारतातील मोठ्या विमान दुर्घटनेपैकी ही घटना आहे.

या घटनंतर विमानतळ बंद करण्यात आले आहे. त्यामुळे गुरुवारी रात्री ९.२५ वाजता नागपूर येथून अहमदाबादला जाणारे विमान रद्द करण्यात आले आहे. तसेच अहमदाबादहून नागपूरला सायंकाळी ६ वाजून ५५ मिनिटांनी निघणारे विमान देखील रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे नागपूरला येणारे आणि अहमदाबादला नागपूरहून जाणारे प्रवाशांची गैरसोय झाली. नागपूर येथून अहमदाबादसाठी सकाळी ८.३५ वाजता आणि रात्री ९.२५ वाजता विमान आहे. तर नागपूरसाठी अहमदाबाद येथून पहाटे ५.५० वाजता आणि सायंकाळी ६.५५ वाजता विमान आहे.

भारतात १९६२ पासून विमान अपघातांची नोंद आहे. भारतात हवाई अपघातांचे ७ जुलै, १९६२ रोजी आलिटालिया विमानाचे अपघात झाले होते. त्यात ९४ प्रवासी ठार झाले. त्यावेळी भारतातील सर्वात घातक हवाई अपघात ठरला. १ जानेवारी, १९७८ एयर इंडिया विमान सांताक्रूज विमानतळ, मुंबईवरून उड्डाण घेतल्यानंतर काही काळात अरबी समुद्रात कोसळले. त्यात २१३ लोक ठार झाले. २१ जून, १९८२ इंडियन एयरलाइन्स विमान भोपाळ विमानतळावर उतरवण्याच्या प्रयत्नात कोसळले.

# मुख्यमंत्री चषक यु-१५राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा पहिल्यांदाच नागपुरात

## मानकापूर स्टेडियमवर २० आणि २२ जूनला रंगणार कुस्तीचा थरार




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
भारतीय कुस्ती महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व नागपूर शहर कुस्तीगीर संघ यांच्या सहकायार्ने आयोजित नागपूर शहरात मुख्यमंत्री चषक ०-१५ राष्ट्रीय कुस्ती स्पधेर्चे आयोजन करण्यात येत आहे.२० आणि २२ जून २०२५ या कालावधीमध्ये विभागीय क्रीडा संकूल मानकापूर येथील इनडोअर स्टेडियममध्ये ही स्पर्धा पार पडेल.विशेष म्हणजे नागपुरात पहिल्यांदाच राष्ट्रीय मुख्यमंत्री चषक यु-१५ राष्ट्रीय कुस्ती स्पधेर्चे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या उद्घाटनाला भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय कुमार सिंह यांची विशेष उपस्थिती असेल, २० जून रोजी खेळाडूंची रिपोर्टींग व यानंतर २१ जून रोजी सायं. ६ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल. यानंतर स्पधेर्चा उद्घाटनीय सामना खेळविला जाईल. २२ जून रोजी सायंकाळी ७ वाजता बक्षीस समारंभ पार पडेल. तसेच मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार, क्रीडा मंत्री. दत्तात्रय भरणे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे स्पधेर्ला भेट देतील.

मुख्यमंत्री चषक ०-१५ राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा फ्रीस्टाईल कुस्ती ३८, ४१, ४४, ४८, ५२, ५७, ६२, ६८, ७५व ८५ किलो या वजन गटात्त, ग्रीकोरोमन कुस्ती ३८, ४४, ४८, ५२, ५७, ६२, ६८, ७५ व ८५ किलो या वजनगटात तसेच १५ वर्षाखालील मुलींची स्पर्धा ३३, ३६, ३९, ४२, ४६ ५०, ५४, ५८, ६२व ६६ किलो या वजनगटात होणार आहे. भारतीय कुस्ती महासंघाशी संलग्न असलेल्या २५ राज्य असोसिएशनचे फ्रीस्टाईल, प्रिकोरोमन व महिला विभाग अशा ३ प्रकारामध्ये साधारण ७५० कुस्तीगीर, ७० ते ७५ कुस्ती मार्गदर्शक व ७५ संघ व्यवस्थापक या स्पर्धेत सहभागी होत आहेत. स्पधेर्तील विजेता संघ ५ ते १३ जुलै दरम्यान किरकिस्तान येथे होणा-या आशियाई स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करेल. राष्ट्रीय कुस्तीचा थरार अनुभवण्याकरिता सर्व कुस्तीपटू व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे पत्रकार परिषदेत आव्हान करण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेला महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, नागपूर शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष व मुख्यमंत्री चषक यु -१५ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन समिती अध्यक्ष आमदार संदीप जोशी, सचिव डॉ.पीयूष आंबुलकर, कार्याध्यक्ष संजय तिरथकर, उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे, सहसचिव संदीप खरे, रामा यंगट, रमेश खाडे, पदाधिकारी अविनाश लोखंडे, विनोद कन्हेरे, सतीश वडे आदी उपस्थित होते.

# चारचाकीच्या धडकेत २ तरुण जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
भंडारा रोडवर चारचाकी वाहनाच्या चालकाने दुचाकीस्वार दोन तरुणांना जबर धडक दिली. दोघेही वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अरविंदकुमार भैयालाल सोनकर (35) आणि मनोजकुमार निशाद (33) दोन्ही रा. पारडी अशी जखमींची नावे आहेत. या प्रकरणी पोलिसांनी अरविंदच्या तक्रारीवरून आरोपी चारचाकी वाहन चालक द्वारका शिशुपाल शाहू (38)विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. बुधवारी सकाळी 8 वाजताच्या सुमारास अरविंद आणि मनोज हे दोघेही एमएच-49/बीवाय-5204 क्रमांकाच्या मोटारसायकलवर काही कामाने भंडारा रोडकडे जात होते. कापसी परिसरात बोलेरो वाहन क्र. एमएच-49/डी-3729 चा चालक द्वारका याने त्याचे वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून अरविंदच्या मोटारसायकलला जबर धडक दिली. अरविंदच्या कंबरेला तर मनोजच्या डोक्याला दुखापत असल्याने त्यांना उपाचरार्थ रुग्णालयात भरती करण्यात आले.

# चिमुकल्याचा टँकमध्ये बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
घरामागील सेप्टिक टँकमध्ये बुडून एका 3 वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही दुदैर्वी घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. भौमिक ब्रिजेश बिसेन (3) रा. समतानगर, नारी रोड असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. ब्रिजेश समतानगरच्या गुडलक सोसायटीमध्ये कुटुंबासह राहतात. सकाळी 9 वाजताच्या सुमारास भौमिक घरीच खेळत होता. घरातील सर्वजण आप-आपल्या कामात व्यस्त होते. खेळता-खेळता भौमिक घराच्या मागच्या भागात गेला. तेथे सेप्टिक टँक उघडेच होते. टँकमध्ये वाकून पाहताना भौमिकचा तोल गेला आणि तो आत पडला. काही वेळातच बुडाल्याने त्याचा करूण अंत झाला. बराच वेळ पासून भौमिक दिसत नसल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. भौमिक टँकमध्ये बेशुद्धावस्थेत आढळला. तत्काळ त्याला बाहेर काढून उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# ग्रामीण तालुक्यांत होणार ८७३४५६ पुस्तकांचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
जिल्ह्यातील 13 ग्रामीण तालुक्यातील एक ते आठवीच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी संख्येच्या मागणीनुसार 873456 पुस्तके शाळेच्या पहिल्या दिवशी वाटप करण्यात येतील. यावर्षी एकात्मिक पुस्तकांऐवजी पूर्वीप्रमाणेच प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तके वाटप करण्यात येतील.




पाठ्यपुस्तके शाळा स्तरावर पोहोचवून देण्याचे शासनाचे निर्देश असून तालुक्यापासून शाळांपर्यंत वाहतुकीचा खर्च गटशिक्षणाधिकारी यांच्या खात्यात जमा होणार आहे. नव्याने सुरू होणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रात शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती शासनातर्फे दिले जाणारे पाठ्यपुस्तके समारंभपूर्वक देण्यात येणार आहे. या सत्रात पहिला वर्ग सी. बी.एस.ई. पॅटर्न प्रमाणे असणार आहे. इयत्ता दुसरी ते आठवी पर्यंत पूवीर्चाच पाठ्यक्रम असणार आहे.

मागील वर्षी मिळालेल्या एकात्मिक पाठ्य पुस्तकांऐवजी पूर्वीप्रमाणेच प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक मिळणार आहे. नागपूर जिल्ह्यात 13 ग्रामीण तालुक्यात एकूण 873456 पुस्तकांचे वाटप होणार आहे. आतापर्यंत 872160 पुस्तकांच्या पुरवठा झाला असून 1296 पुस्तकांचा पुरवठा होणे बाकी आहे.

# १२ तोळे सोन्यावर डल्ला

**नागपूर :** अज्ञात आरोपींनी अजनी रेल्वे क्वॉर्टर परिसरात घरफोडी करून 12 तोळे सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी सतीश बैजूलाल शेंद्रे (46) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सतीश एका खासगी कंपनीत कामाला आहेत. त्यांची पत्नी श्वेता रेल्वेत नोकरीला आहे. गत शनिवारी सतीश घराला कुलूप लावून कुटुंबासह राजनांदगाव येथे बहिणीच्या घरी कार्यक्रमासाठी गेले होते. कपाटातील सोन्याची चेन, अंगठी, कंगन, ब्रासलेट असे एकूण 12 तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले. शेंद्रे कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले.

# राष्ट्रवादीचे एकत्रीकरण शक्य नाही : रोहित पवार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार ही फक्त चर्चाच होती, हे परवाच्या मेळाव्याचे स्पष्ट झाले आहे. यापुढे लोकांना विश्वासात घेऊन संघर्ष करावा लागेल. कुटुंब एका बाजूला आणि राजकारण एका बाजूला असतं. पुरोगामी विचाराचा वसा घेऊन शरद पवार यांच्या सोबत आम्ही आहो. विचार तोच असला तरी आता स्टाईल बदलावी लागणार आहे, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते रोहित पवार यांनी येथे माध्यमांशी बोलताना मांडली.



प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भावनिक होऊन राजीनामा देण्याची भावना व्यक्त केली आहे. परंतु त्यांनी देखील राजीनामा दिलेला नाही. निर्णय घेणारे ते स्वतः तसेच सुप्रिया सुळे आहेत. येता काळात जयंत पाटील यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतल्यास, जयंत पाटील देशाच्या राजकारणात गेल्यास प्रदेशाध्यक्ष म्हणून एखाद्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीचे नाव घेतले जावे. पार्टीसाठी दहा ते पंधरा वर्षापासून प्रामाणिकपणे काम करणाऱ्याला पक्षाध्यक्ष करण्यात यावे. असे केल्यास सत्ता परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही, असे रोहित पवार म्हणाले. नवा प्रदेशाध्यक्ष युवा आणि सामान्य कुटुंबातील असला पाहिजे. तसेच धोरणात्मक निर्णय घेणारा आणि धावपळ करू शकणारे हवे, प्रसंगी रस्त्यावर उतरणारा कार्यकर्ता असला पाहिजे. आताच नाव सांगितलं तर शेपूट वाढत जाते. निर्णय घेताना बऱ्याच अडचणी येतात. पण वरिष्ठ नेत्यांसह सगळ्यांना ते नाव माहित आहे.

# सदर उड्डाणपूल : ३४ कोटींचा प्रस्ताव मंजूर

## नितीन गडकरी यांनी दिली पत्रकार परिषदेत माहिती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :
सदरची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सदर उड्डाणपूल बांधण्यात आला होता. परंतु वाहतुकीची समस्या अनेक पटींनी वाढली आहे. त्याचा फटका पादचाऱ्यांना सहन करावा लागत आहे. राष्ट्रीय महामार्ग जाम झाला आहे. त्यामुळे कामठीकडे जाणाऱ्या लोकांना मार्ग समजत नाही. पुल आणि पुलाखाली वाहतूक कोंडी येथे दररोज एक सामान्य गोष्ट बनली आहे. या समस्येवर, मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात आज झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पुन्हा एकदा मान्य केले की सदर उड्डाणपुलाच्या डिझाइनमध्ये चूक झाली होती. परंतु आता ३४ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे, जो मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. लवकरच ही चूक दुरुस्त केली जाईल. ज्यामुळे येथील वाहतूक समस्या सोडवली जाईल.

२०२२ मध्ये सामाजिक कार्यकर्ते आणि योग चिकित्सक डॉ. प्रवीण डबली यांनी ऑनलाइन विनंती करून ही समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती, त्यानंतर पत्रकार परिषदेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही त्याची दखल घेतली आणि या पुलाच्या डिझाइनमध्ये चूक असल्याचे मान्य केले. ते दुरुस्त केले जाईल. परंतु आतापर्यंत यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे ये-जा करणाऱ्यांना त्रास होत होता. अखेर प्रशासनाने आपली चूक दुरुस्त करून येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉ. प्रवीण डबली म्हणाले की, सदर उड्डाणपूल एलआयसी चौकात उतरवण्याबाबत प्रशासनाकडे आधीच मागणी करण्यात आली आहे. भोपाळ, कलमेश्वर, छिंदवाडाकडे जाणारी बहुतेक वाहतूक सध्या सदर उड्डाणपूलावरून जाते, त्यामुळे सदर, छावणी, मंगळवारी इत्यादी ठिकाणांची वाहतूक समस्या सुटलेली नाही. परंतु उड्डाणपुलाच्या चुकीच्या डिझाइनमुळे सदरमध्ये वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. प्रवीण डबली म्हणाले की, एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौकापर्यंत बांधलेल्या उड्डाणपुलामुळे जबलपूर, छत्तीसगड, उत्तर प्रदेशकडे जाणाऱ्या बसेस आणि रामटेक, मानसर इत्यादी भागात जाणाऱ्या वाहनांना त्रासातून दिलासा मिळाला. परंतु सदर उड्डाणपुलामुळे कामठी रोड उड्डाणपुलावर चढण्याचा मार्गही बंद झाला आहे. तो सुधारून ही समस्याही सोडवली जाईल. जर सदर उड्डाणपुलात सुधारणा झाली तर केवळ राष्ट्रीय महामार्गच खुला होणार नाही, तर एलआयसी चौक उड्डाणपुलावर चढण्याचा मार्गही खुला होईल.

कामठी रोडला जाणाऱ्या सर्व बसेसना सदरमार्गे मंगळवारी पुलावरून जावे लागते हे कळेल. त्याचप्रमाणे इतर लोकांनाही या मार्गाने प्रवास करावा लागतो. त्यामुळे सदरमध्ये पुन्हा वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या एलआयसी चौकात पोहोचायचे असेल तर लिबर्टी टॉकीजमार्गे रिझर्व्ह बँकेकडून यू-टर्न घेऊन एलआयसी चौकात पोहोचावे लागते. त्यानंतर किंग्जवेला जाता येते.

जर सदर उड्डाणपूल सुधारला तर कोराडी रोड आणि गिट्टी खाना चौकातून पुलावरून येणारे लोक थेट एलआयसी चौकात उतरतील.



# दवलामेटीतील पाणीटंचाईला महिलांचा आक्रोश

## गढूळ वास येणाऱ्या पाण्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष
## ग्रामपंचायतवर महिलांचा मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १२ : दवलामेटी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक ५ मध्ये मागील १० ते १५ दिवसांपासून नळाला पाणी येत नसल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. काही दिवसांपासून जे पाणी येत आहे ते देखील गढूळ असून त्याला घाणेरडा वास येत आहे. या पाणीटंचाईमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाचे दुर्लक्ष समोर येत आहे. पाणी ही जीवनाची मूलभूत गरज असून पाण्याविना संपूर्ण परिसरातील रहिवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच यांना फोनवरून समस्या सांगूनही कोणताही ठोस उपाय करण्यात आलेला नव्हता. अखेर या समस्येला वाचा फोडण्यासाठी वार्ड क्र. ५ मधील महिलांनी थेट ग्रामपंचायतीवर मोर्चा नेला. वनिता महेंद्र कऱ्हाडे यांनी महिलांच्या वतीने लेखी अर्ज सादर केला. अर्जावर ६२ महिलांच्या सह्या घेऊन त्या सरपंचांच्या भेटीस गेल्या. त्यांच्या सोबत प्रमुख राजेश्री सरवे, सुनिता लोखंडे, अनुसया खोब्रागडे, कुमुद राऊत, कमलेश रंगारी, प्रमोद खोब्रागडे, विनोद जावरकर, स्वाती राऊत यांचा समावेश होता. महिलांनी सरळ शब्दांत आपली व्यथा सरपंच गजानन रामेकर यांच्या सोबत मांडली.

सरपंच गजानन रामेकर यांनी तत्काळ वेणा प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. यानंतर केवळ एका तासातच हेमंत सुरती व त्यांचे वरिष्ठ अधिकारी ग्रामपंचायतीत दाखल झाले व त्यांनी तातडीने पाणीपुरवठा करणाऱ्या भागाची पाहणी केली. अधिकार्यांनी नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या असून लवकरच समस्येचे निराकरण करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

## प्रभाग क्रमांक ३ मध्ये नालीचे काम अपूर्ण

### नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

**भिवापूर :** हरातील प्रभाग क्रमांक ३ मधील कोष्टीपुरा परिसरात भिवापूर नगरपंचायत वतिने नालीचे बांधकाम करण्यासाठी दीड महिन्या पुर्वी खोदकाम करून ठेवले होते. सध्या हे काम बंद असल्याने लगत असलेला मातीचा मलबा उचल्याव्यात आला नसल्याने ये –जा करणाऱ्या नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. खोदकाम केलेल्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता परिसरातील नागरिकांनी आज १२ जून गुरुवार ला दुपारी प्रतिनिधीशी परिसरातील महिला शोभा सोनकुसरे, सुमन वासुदेव खवास, निर्मला रामकृष्ण पराते यांनी ही मांडली असून नगरपंचायत प्रशासनाने लवकर ही समस्या दूर करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. असून याबाबत नगरपंचायत बांधकाम अभियंता मयुर अनारसे याबाबत विचारणा केली असून नालीमध्ये सिमेन्ट पाईप टाकण्यात येवून मातीचा मलबा लवकरच उचलण्यात येइल.

# ग्रामपंचायत मध्ये दोन दिवस काम बंद आंदोलन

## जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना काम बंद आंदोलनाचे निवेदन



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १२ : नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायतमध्ये शुक्रवार १३ जुन व शनिवार १४ जुन रोजी काम बंद आंदोलन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी यूनियनच्या जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने होणार आहे. यांची माहिती निवेदनाद्वारे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांना विभागीय महिला उपाध्यक्ष सुनिता मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच नागपूर जिल्हा सहसचिव मंगेश भोतमांगे यांच्या मार्गदर्शनात

गुरुवार १२ जुन रोजी देण्यात आली.

यावेळी नागपूर तालुका अध्यक्ष देवाभाऊ ताजणे, नागपूर तालुका सचिव नागेश चांदेकर, तालुका सहसचिव आशिष टाकरखेडे, नागपूर तालुका सदस्य गौतम तभाने आणि प्रवीण चरडे उपस्थित होते.

# माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी केले भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक , दि. १२ :
शौर्य व प्रेरणाचे प्रतीक धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त देवलापार व रामटेक येथील कार्यालयात माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी अभिवादन केले.

दिनांक ९ जून २०२५ ला देवलापार व रामटेक येथील कार्यालयात आदिवासी हक्कांसाठी लढणारे, समाजासाठी अखंड संघर्ष करणारे भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी उपस्थित राहून बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

बिरसा मुंडा यांच्या विचारांनी अनेकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली आहे यावेळी त्यांच्या बलिदानाचे महत्त्व आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी माजी मंत्री राजेंद्र मुळक, माजी जिल्हा परिषद सदस्या शांताताई कुमरे,रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती लक्ष्मण उमाळे, माजी नगरसेवक तथा काँग्रेस चे शहर अध्यक्ष दामोधर धोपटे, नाशिर शेख सह आदी प्रामुख्याने उपस्थीत होते.

# योगीराज रुग्णालय मधे गुडघे बदलण्याची शस्त्रक्रिया



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक , दि. १२ :
योगीराज चॅरिटेबल हॉस्पिटल रामटेक येथे पहिल्यांदाच टोटल गुडघे बदलण्याची शस्त्रक्रिया (टीकेआर) शस्त्रक्रिया करण्यात आली.

योगीराज रुग्णालय रामटेक ने ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. पहिल्यांदाच, टोटल गुडघे बदलण्याची शस्त्रक्रिया रुग्णालयात यशस्वीरित्या करण्यात आली.

ही शस्त्रक्रिया ऑर्थो डॉ. मयूर नन्नावरे यांच्या मार्गदर्सनखाली डॉ. अली (अ?नेस्थेसिया तज्ञ) आणि एमडी मेडिसिन डॉ. शुभम आकरे आणि संपूर्ण वैद्यकीय आणि तांत्रिक टीमच्या संयुक्त प्रयत्नांनी ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

रुग्णाच्या प्रकृतीत सकारात्मक सुधारणा झाली आहे. या कामगिरीबद्दल योगीराज रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले जात आहे.

योगीराज रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने सांगितले की, भविष्यात स्थानिक नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरवता याव्यात यासाठी रामटेकमध्येही अशाच प्रकारच्या जटिल आणि आधुनिक शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करून दिल्या जातील.

# बेसा येथे १४ जूनला पर्यावरण सप्ताह

## नामवंत पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांची उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी,
वाड़ी, दि. १२ : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण व निसर्ग संस्था यांच्या वतीने मंत्रा सेलिब्रेशन, बेसा येथे शनिवार १४ जून रोजी पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे उपस्थित राहणार आहेत. तर उद्घाटन बेसा-पिपळा नगरपंचायतचे प्रशासक भारत नंदनवार यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाला ग्रीन व्हिजन फाउंडेशनचे पर्यावरण अभ्यासक व तज्ज्ञ कौस्तुभ चटर्जी आणि ब्लाइंड रिलीफ सोसायटीचे अध्यक्ष मकरंद पांढरीपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ङजगाला प्लास्टिकमुक्त करूयाङ्क या जागतिक घोषवाक्याशी सुसंगत विषयांवर, तसेच ग्लोबल वॉर्मिंग यासारख्या गंभीर समस्यांवर ते उपस्थितांना विचारमंथनात्मक मार्गदर्शन करतील. कार्यक्रमात माजी जि.प. सदस्य वैशाली भोयर अजय बोढारे, मेघाताई गुलशन मानकर, ग्रामायण प्रतिष्ठानचे सचिव संजय सराफ, तसेच कम्युनिटी कॉलेजच्या संचालिका डॉ. राधा उपस्थित राहणार आहे.

या वेळी सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर येथून तयार केलेली आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ, करवंद आदी फळझाडांची रोपे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

तसेच बेसा-पिपळा नगरपंचायतमधील सर्व स्वच्छता दूतांचा सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष मधुकर सुरवाडे, सचिव राजेंद्र राजुरकर, उपाध्यक्ष राजेश सोनटक्के, कोषाध्यक्ष तथा पिपळाचे माजी सरपंच नरेश भोयर, सहसचिव भैयाजी रेवतकर व पर्यावरण व निसर्ग संस्थेचे विश्वस्त कार्यरत आहेत.

# आनंद सोसायटी कॅम्पस बेसा येथे वृक्षारोपण

## बेसापिपळा नगरपंचायतीचे प्रशासक भरत नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण संवर्धनावर भर



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १२ :
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नगर पंचायत बेसा-पिपळा अंतर्गत येणाऱ्या परिसरातील आनंद सोसायटी आणि घनकचरा प्रकल्प परिसरात मुख्याधिकारी भरत नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्रशासकीय अधिकारी मोहित राजनकर, स्वच्छता विभाग प्रमुख पूजा जाधव, शहर समन्वयक मंगेश माहुलकर, स्वच्छता निरीक्षक नितीन इमले, महिला कामगार राजूरकर, गडपायले, कर्मचारी सुभाष बानैत, श्रावण कड्डू, सचिन संदेकर, स्वप्नील पाटील, स्वप्नील दोडके, दिवांशी लोणारे आणि इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी हिरवळीची शपथ घेतली आणि पर्यावरण संवर्धनासाठी लोकांना प्रेरित केले. बेसा नगर पंचायतीचे प्रशासक भरत नंदनवार म्हणाले की, बेसा नगर पंचायत स्थापन होऊन २ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात बेसा पिपला नगर पंचायत क्षेत्रातील विकासकामांसोबतच अतिक्रमणे काढून रस्ते रुंदीकरण करण्यात आले आहेत, प्रमुख चौकांवर वाहतूक सिग्नल बसवण्यात आले आहेत आणि इतर विकास कामे करण्यात आली आहेत. बेसाच्या मुख्य रस्त्यावरून हनुमान मंदिर नवीन ठिकाणी हलवण्यात आले आणि तेथे विकास कामे करण्यात आली. बेसा मार्गावरून हनुमान मंदिर हलवल्याने हालचाल सोपी झाली आहे, असे ते म्हणाले. विकासकामांचा वेग आता थांबणार नाही, काम सुरूच आहे, असे ते म्हणाले. यासोबतच प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छता मोहिमा राबवून परिसरात वृक्षारोपणही केले जात आहे. रस्त्याभोवती शेकडो झाडे आणि रोपे लावली जात आहेत आणि त्यांची काळजीही घेतली जात आहे.

### लोकांना जागरूक केले

नवस पंचायत आणि नगर पंचायत क्षेत्रातील वनस्पती वृक्षारोपण केले. वृक्षारोपणाद्वारे वायू प्रदूषण कमी करण्यावर आणि पर्यावरण संतुलन राखण्यावर भर देण्यात येत आहे. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व आणि वृक्षारोपणाची आवश्यकता याबद्दल जागरूक करण्यात आले. असे कार्यक्रम समाजात पर्यावरण जागरूकता वाढवतात आणि लोकांना पर्यावरण संरक्षणात सक्रिय भूमिका बजावण्यास प्रेरित करतात असे सांगण्यात आले. प्रशासक नंदनवार म्हणाले की, वृक्षारोपण ही एक महत्त्वाची कृती आहे जी आपले पर्यावरण हिरवे आणि स्वच्छ बनविण्यास मदत करते. त्याचे अनेक फायदे आहेत. विकासकाम, पर्यावरण आणि आर्थिक क्षमतेच्या बाबतीत बेसा पिपला नगर पंचायत राज्यातील पहिली नगर पंचायत बनविण्याच्या दृष्टीने काम केले जात आहे.

यामध्ये सरकार, प्रशासन आणि नगर पंचायतीचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिकही सहकार्य करत आहेत.

# 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत आरपीएफ बैतूलने मोबाईल फोन जप्त



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :
'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत ००.०० ते ०८.०० तासांच्या शिफ्टमध्ये आरपीएफ पोस्ट बैतूलचे प्रधान आरक्षक एस.के. पटेल, पीएलटी टीमचे प्रधान आरक्षक कुलवंत व प्रधान आरक्षक वाय.एस. चंदेल तसेच जीआरपी बैतूलचे प्रधान आरक्षक राजेंद्र त्रिपाठी आणि पोलीस शिपाई दिलीप नरवरे यांनी बैतूल रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफफॉर्म क्रमांक १ वर संयुक्त गस्त घातली होती.

गस्त दरम्यान, सामान्य प्रतीक्षालयाजवळ एका व्यक्तीने संशयास्पद हालचाल करत पलायन करण्याचा प्रयत्न केला. सदर व्यक्तीस त्वरित थांबवून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याच्याकडे एक सिल्व्हर रंगाचा रियलमी मोबाईल आढळून आला. मोबाईल अनलॉक करून दाखवण्यास किंवा मालकी दर्शविण्यास सांगितले असता, तो समाधानकारक माहिती देऊ शकला नाही. मोबाईलमध्ये उपलब्ध इमर्जन्सी नंबरच्या आधारे खऱ्या मालकाचा शोध घेण्यात आला. त्यांनी सांगितले की, हा मोबाईल २९.०५.२०२५ रोजी जुनरदेव ते राणी कमलापती प्रवासादरम्यान चोरीस गेला होता. सदर प्रकरणाची नोंद जीआरपी राणी कमलापती येथे झिरो एफआयआर क्रमांक ०१६९/२५, बीएनएस कलम ३०५(क) अंतर्गत करण्यात आली होती आणि त्यानंतर ते प्रकरण जीआरपी आमला येथे गुन्हा क्रमांक ९४/२०२५ म्हणून नोंदविण्यात आले. सदर आरोपीस मोबाईलसह पुढील कायदेशीर कारवाईसाठी जीआरपी बैतूलच्या ताब्यात देण्यात आले. प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, ते सतर्क राहावेत व कुठलीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित कळवावी. मदतीसाठी रेल्वेचा २४७ हेल्पलाईन क्रमांक १३९ वर संपर्क साधावा.

# मोहदी धोत्रा येथे गोखे यांच्या निरोप

■ महासागर प्रतिनिधी,
नरखेड , दि. १२ :
नरखेड तालुक्यातील मोहदी धोत्रा ग्रामपंचायत येथे ( दि.१०) ला तीन वर्षांपासून कार्यरत असलेले सचिव विनोद गोखे यांचा निरोप समारंभ कार्यक्रम ग्रामपंचायत च्या वतीने घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरपंच राजेंद्र नाखले, उपसरपंच मारोती कोकोडे, पत्रकार राजेंद्र बागडे, सौ,धूमाळे सचिव, सीमाताई ठाकरे ग्रा. प. सदस्या, निलिमा धुर्वे सदस्या, लक्ष्मणजी सर्रयाम सदस्य, दिपा अनिल गौरखेडे ग्रा.पं. सदस्या आदी उपस्थित होते. सचिव विनोद गोखे यांनी तीन वर्ष निस्वार्थपणे या गावात सेवा केली. त्यांच्या या कामाबद्दल त्यांचे गावकऱ्यांनी तोंड भरून कौतुक केले.


**जाहीरनामा**

कोर्ट विद्यमान श्री रमेश कोळपे तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२५
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी विजय रामचंद्र दुरुगकर रा. के.के. नगर शीतलवाडी रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वत: नामे विजय रामचद्र दुरुगकर याचा जन्म दिनांक १६.०५.१९६९ रोजी मोजा अंबाळा वार्ड रामटेक, ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक १९.०५.२०२५ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे विजय रामचंद्र दुरुगकर यांचा जन्म दिनांक १६.०५.१९६९ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद विजय रामचंद्र दुरुगकर यांचा जन्म दिनाक १६.०५.१९६९ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २७/०६/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वत: उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १०/०६/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्वा/-
(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक

स्थळ :- रामटेक
दिनांक :- १०/०६/२०२५



**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कागठी, जि. नागपुर

एम जेसी नं ४२/२०२५
पे ता ०७/०७/२०२५
पोसेस न ६६३/२०२५ (१२/०६/२०२५)

Applicants : Mrs. Kanak W/o Sunil Lalwani, (Ku. Archana D/o Chandralal Nankani) Aged 41 years, Occu. Nil
R/o Near Sindhi Bhavan, Kati Oli, Kamptee, Tahsil- Kamptee, District- Nagpur., Pin-441002
---- V/S ----
Non applicant: NIL

मयत: – Late Smt. Padma W/o Chandralal Nankani मयत दि २३/१०/२०२४,at R/o Kati Oli, Kamptee, Tahsil- Kamptee, District- Nagpur., Pin-441002 व Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani, मयत दि ०७/१०/२०२४,

सदरहु अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Padma W/o Chandralal Nankani मयत दि २३/१०/२०२४. at R/o Kati Oli, Kamptee, Tahsil- Kamptee, District- Nagpur., Pin-441002 व Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani, मयत दि. ०७/१०/२०२४ यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे त्या अर्जाच्या सुनवाणींची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. ०७/०७/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की. जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Smt. Padma W/o Chandralal Nankani मयत दि २३/१०/२०२४, at R/o Kati Oli, Kamptee, Tahsil- Kamptee, District- Nagpur., Pin-441002 व Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani मयत दि ०७/१०/२०२४ यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कागठी, जि. नागपुर

एम जेसी नं ४१/२०२५
पे ता ०७/०७/२०२५
पोसेस न ६६१/२०२५ (१२/०६/२०२५)

Applicants : Mrs. Kanak W/o Sunil Lalwani, Aged 41 years, Occu. Nil R/o Near Sindhi Bhavan, Kati Oli, Kamptee, Tahsil- Kampree, District- Nagpur., Pin-441002
---- V/S ----
Non applicant: NIL

मयत: – Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani, मयत दि ०७/१०/२०२४

सदरहु अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani, मयत दि ०७/१०/२००४, at R/o Kati Oli, Kamptee, Tahsil- Kamptee, District- Nagpur., Pin-441002 Late Smt. Padma W/o Chandralal Nankani, मयत दि.२३/१०/२०२४ यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. ०७/०७/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shri Chandralal S/o Shobharajmal Nankani, मयत दि ०७/१०/२०२४, at R/o Kati Oli, Kamptee, Tahsil-Kamptee, District- Nagpur., Pin-441002 व Late Smt. Padma W/o Chandralal Nankani, मयत दि २३/१०/२०२४ यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



**जाहिरनामा**

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५
प्र.क्र. १३/प्रस्तु-३/तह. नाग (शहर)/कावि/२३०/२०२५
दिनांक : १६/०५/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क .०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. अर्जदार श्री/श्रीमती सैय्यद नियाज अली सैयद रज्ञाक, वय ७१ वर्षे, राह बंदे नवाज नगर, बांजरा से आउट, उप्पलवाडी नागपूर, यांचा अर्ज दिनांक २३/०४/२०२५

ज्याअर्थी अर्जदार सैय्यद नियाज अली सैयद रज्ञाक, वय ७१ वर्षे, राह. बंदे नवाज नगर, बांजरा ले आउट, उप्पलवाडी नागपूर, यांनी मुलाच्या जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहु सैयद रियाज अली सैयद नियाज अली यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९८२ रोजी डागा हॉस्पीटल नागपूर, येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता

# बच्चू कडूंच्या 'अन्नत्याग' आंदोलनाचे मौद्यात पडसाद

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १२ :

कष्टकरी शेतकरी शेतात राब राब राबून एका दाण्याचे शंभर दाणे करतो आणि त्याच्या या पिकविलेल्या दाण्याचे भाव सरकार जर पाडत असेल आणि तरीही आपण शांत बसत असेल तर काही अर्थ नाही. कुठेतरी या सरकारविरोधात आपण पेटून उठलं पाहिजे, असा प्रहार माजी राज्यमंत्री तथा प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सत्तेवर असलेल्या भाजप सरकारवर करून महाराष्ट्रातील तमाम शेतकरी जनतेला, शेतमजुरांना, दिव्यांगाना या आंदोलनात सहभागी होऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बच्चू कडूच्या या आंदोलनाला साथ द्या, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले व हे आंदोलन शेतकरी-शेतमजूर जगला पाहिजे, यासाठी असल्याची भूमिका बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलनातून मांडली.

शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी, दिव्यांगांना दर महिन्याला सहा हजार रुपये मानधन देण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसह अन्य मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने गुरूवारपासून (ता. १२ तालुक्यातील मौदा उपविभागीय अधिकारी, व तहसिल दत्तात्रय निंबाळकर यांना जिल्हाप्रमुख नागपूर रमेश कारेमोरे , यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन देण्यात आले.



८ जूनपासून माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजुरांच्या व दिव्यांगांच्या रास्त मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली. दुपारी गाडगेबाबा यांच्या समाधीला अभिवादन करून थेट बैलबंडीने बच्चू कडू गुरुकुंज मोझरी येथील नियोजित आंदोलन स्थळी दाखल झाले. त्याचे पडसाद आज मौदा येथे पडल्याने त्याचे त्यांच्यासोबत हजारो कार्यकर्ते देखील दुचाकी रॅलीने आंदोलन स्थळी दाखल झाले.

गुरुकुंज मोझरी येथे बैलबंडीने दाखल होताच बच्चू कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीला अभिवादन केले व त्यानंतर आंदोलनाच्या मंडपात राष्ट्रध्वज तिरंगा फडकवून व त्याचे पूजन करून अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली. यावेळी बच्चू कडू यांनी जाहीर सभेतून कार्यकर्त्यांशी संवाद साधून आंदोलनामागची भूमिका मांडली. त्यामध्ये त्यांनी निवडणूक काळात भाजपने सत्तेवर येण्यासाठी शेतकरी जनतेला कर्जमाफी देऊ, शेतमालाला भाव देऊ, असे अनेक आश्वासने दिली होतीः मात्र सत्तेवर येताच या सर्व आश्वासनांचा या भाजप सरकारला विसर पडला.

सत्तेवर येण्यासाठी लाडकी बहीण योजना आणली जाते आणि नंतर माज्या शेतकऱ्याने पिकविलेल्या शेतमालाचे भाव पाडल्या जाते, याचे आपण खऱ्या अर्थाने संशोधन करण्याची गरज असल्याचे बच्चू कडू यांनी जाहीरसभेतून सांगितले. काल तुरीले ७ हजार ३०० रुपये भाव राहतो व आज मात्र ६ हजार ३०० रुपये भाव मिळतो, दिव्यांग लोकांचे पगार ६-६ महिने होत नाही. आमच्या शेतमजुरांची मजुरी केवळ १० टक्क्यांनी वाढते, तर आमदारांचे पगार मात्र ९५० टक्क्यांनी वाढते, माझा शेतकरी रोज पाय घसरून मरतो तरी तो विषय समोर येत नाही, शेतकऱ्यांच्या तुरीचे भाव पडते, सोयाबीनचे भाव पडते, दुधाचे भाव पडते, कर्जमाफी सारखा विषय अजूनही बाजूलाच आहे, ही सर्व सरकारची विचित्र अवस्था हाणून पाडण्यासाठी समस्त जनतेने, शेतकरी, शेतमजुरांनी जागे व्हावे आणि या आंदोलनाला ताकद देऊन पेटून उठावे, असे आवाहन बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलनातून केले. याप्रसंगी प्रमुख उपस्थित रमेश कारेमोरे जिल्हाप्रमुख नागपूर , राहुल बावणे प्रहार मौदा तालुकाप्रमुख, दिनेश ठोंबरे, विनोद लेंडे, टिकेश्वर सपाटे, ईश्वर सावरकर, सुनील कडू, राधेश्याम भोस्कर, गौरीशंकर कारेमोरे, राहुल कुंभारे , सुरज डहाके, शैलेश पाठक, जितू नागोसे, प्रशांत कुंडकर आदी उपस्थित होते.

# बोगस शिक्षक भरती घोटाळयात चौकशी संथ गतीने कां?

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १२ :

बोगस शिक्षक घोटाळा हा " न भुतो न भविष्यती" असा महाभयंकर घोटाळा झाला असून यात संबधीत विभागाचे काही अधिकारी तसेच संचालक व घोटाळ्यात समाविष्ट काही लोकांना अटक देखील झाली आहे. या प्रकारामुळे मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली असून या घोटाळ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष लाभार्थ्यांचे धाबे दणाणले आहे. याबाबत अनेक खुलासे अपेक्षित असून यात अनेक लोकांचा समावेश असू शकतो. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर आणि तालुका स्तरावर सुद्धा हे रॅकेट पसरले असण्याची शक्यता नाकारता येत नाही तालुक्यातील ज्या दलालांमार्फत बोगस शिक्षक भरती करण्यात आली.

त्यांची चौकशी झाल्यास अनेक गोष्टींचा उलगडा होऊ शकतो. या घोटाळ्याची निष्पक्षपणे चौकशी करीता शिक्षणविभागातील तज्ञांची मदत घेतल्यास अनेक पैलूंवर प्रकाश पडू शकतो. शिक्षकांची भरती करताना अनेक खोटी कागदपत्रे तयार करण्यात येवून नियोजित पद्धतीने हा घोटाळा करण्यात आला



तात्काळ चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी

असून शिक्षण विभागातील अधिकारी, संस्थाचालक व दलाल यांचा असण्याची दाट शक्यता आहे. महाराष्ट्र राज्यात २ मे २०१२ पासून शिक्षक पदभरतीवर बंदी असताना विशेष बाब म्हणून बोगस पद्धतीने शासनस्तरावरून मान्यता आणुन नियुक्त्या करण्यात आल्या. तसेच शासन निर्णय शिक्षक पात्रता परिक्षा टीईटी ऑगस्ट २०१३ पासुन निर्गमित असताना त्यापूर्वी डी.एड. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून पदविका घेतलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना फसवून मागिल तारखेत नियुक्ती दाखवून शासनाची दिशाभूल केली आहे. त्यामूळे या घोटाळ्याची योग्यरीत्या चौकशी व्हावी व सुशिक्षित बेरोजगार शिक्षकांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट या पक्षाची मागणी आहे. याप्रकरणी सखोल चौकशी व्हावी म्हणून माजी गृहमंत्री अनिल देशमुख, पोलिस आयुक्त नागपूर, शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष पोलीस तपास पथकाचे प्रमुख पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. २ नागपुर , तसेच संचालक पोलीस आयुक्त सदर विभाग नागपूर यांना देण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष गणेश चन्ने, अनुप खराडे, गणेश सावरकर, अजय लाडसे, नरेंद्र राऊत, हर्षद बन्सोड, भाऊराव कारोकर, डॉ. अनिल ठाकरे, मनोज देशमुख, निशिकांत नागमोते इत्यादी उपस्थित होते.

## महाविद्यालयीन प्राध्यापकांना जुनी पेन्शन लागू करण्याच्या मागणीसाठी

# आमदार अडबाले यांची मंत्रालयात भेट

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १२ :

राज्यातील १०० टक्के अनुदानित पदावर कार्यरत, एक नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरातीनुसार पात्र असलेल्या महाविद्यालयीन प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी आमदार सुधाकर अडबाले यांनी मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अवर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी यांची भेट घेतली.



या भेटीत आमदार सुधाकर अडबाले यांनी दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयाचा उल्लेख करून, इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे या प्राध्यापकांनाही जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी केली. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय तात्काळ निर्गमित करावा, अशी विनंती त्यांनी निवेदनाद्वारे केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे सदस्य प्रकाश गायकवाड उपस्थित होते. प्राध्यापकांच्या न्याय्य हक्कासाठी ही भेट महत्वपूर्ण ठरत असून, शासनाच्या पुढील निर्णयाकडे प्राध्यापक वर्गाचे लक्ष लागले आहे.

## भावाच्या पत्नीचाच विनयभंग

**नागपूर** : एका व्यक्तीने आपल्या सख्ख्या भावाच्या पत्नीसोबतच गैरवर्तन करीत विनयभंग केला. ही संतापदायक घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी 39 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून 55 वर्षीय भासऱ्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. आरोपी आणि पीडित अंबाझरी ठाण्यांतर्गत एकाच इमारतीत राहतात. गत ८ जून रोजी पीडिता कचरा फेकण्यासाठी गेली होती. परत येताना इमारतीच्या जिन्यावर भासऱ्याने तिला अडवले. मी जसे सांगतो तसे तू कर, तू जे म्हणशील मी तुला दे देईन, असे म्हणत अश्लील चाळे करू लागला. पीडितेने विरोध केला असता आरोपी भासऱ्याने तिला धमकावले. याबाबत वाच्यता केल्यास मारण्याची धमकी दिली. या प्रकरामुळे पीडिता चांगलीच घाबरली होती. तिने पती आणि कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली.

# रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ते महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रण्यासचा भोंगळ कारभार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

नारा वस्तीत गंगोत्री लॉन च्या लगत ६० फुट रुंदी रस्ता असून तिथल्या जनतेने माजी नगरसेवक, उत्तर नागपूर आमदार नितीन राऊत यांना पत्र, निवेदने दिली, परंतु यांच्या कडे प्रशासन आणि खुद नितीन राऊत सुद्धा लक्ष देत नाहीत, आता सामान्य जनतेने कोणाकडे कडे धाव घायची उत्तर नागपुर चे आमदार नितीन राऊत यांना भेटल्यानंतर त्यांनी ४ऑगस्ट २०२४ रोजी पत्र दिल नागपूर सुधार प्रण्यास कार्यालयास देण्याकरिता.. परंतु आता दीड वर्ष होतं आहे. त्यांनी काम केलं नाही वारंवार विचारपूस करण्यात आली तर सांगतात आमच्या कडे फंड नाही.

पत्र दिल, ते तर पत्र सर्वांना देतात परंतु फंड का नाही देत? मग आम्ही कोणाला सांगावं... ह्याच कामा करिता का आम्ही आमदार निवडून देतो का! असा प्रश्न महानगरपालिका यांना सांगितल्यावर ते म्हणतात आमचे कार्यक्षेतात येतं नाही...

मग मागील ४ वर्षांपासून नगरसेवक चे चुनाव झाले नाही. आणि प्रशासन या कडे दुर्लक्ष करीत नाही. सामान्य जनतेने काय कराव यांचे भोंगड कारभार जनतेला समजलेलं आहे.

# शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याच्या मागणीचे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. १२ :

विधानसभा निवडणूकीत सर्व शेतकऱ्याचे कर्ज माफ करू असे आश्वासन महायुती सरकारच्या वतीने देण्यात आले होते. राज्यात सत्ता स्थापना होवून ७ महिन्याचा कालावधी लोटला असून शेतकऱ्यांना आपले कर्जे बँकेत भरावे असे सांगितले जात आहे. सध्या शेतकरी वर्ग चांगलाच अडचणीत सापडल्यामुळे याबाबत राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष ( शरदचंद्र पवार) यांच्या वतीने विविध मागण्या बाबत आज दि. १२ जुन ला दुपारी २ वाजता भिवापूर तहसिलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले.



निवेदन देतांना राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी अध्यक्ष सुधीर मोहड, शहर अध्यक्ष राजेश भोयर, किशोर चौधरी, मधुकर कारमोरे, मनोहर बांते, देवेंद्र देशमुख, रमेश भोयर, गणपत सायरे, गजानन आंभोरे व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४९ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. गुरूवार (ता.१२) रोजी शोध पथकाने ४९ प्रकरणांची नोंद करून ४९,५००/- रुपयाचा दंड वसूल केला.



हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० /- दंड) या अंतर्गत ३२ प्रकरणांची नोंद करून १२,८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.१००/-) या अंतर्गत ०३ प्रकरणांची नोंद करून ३००/- रूपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ०८ प्रकरणांची नोंद करून ३,२००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल सिनेमाहॉल,मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्त्यावर कचरा टाकणे (रू.२,०००/-) या अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून २,०००/- रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ०८ प्रकरणांची नोंद करून १९,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता,फुटपाथ, मोकळी जागाअशा ठिकाणी बांधकामाचा मलबा/ टाकावू कचरा टाकणे/ साठवणे अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून रू.१,०००/- रूपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २१ प्रकरणांची नोंद करून ४,२००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 7 प्रकरणांची नोंद करून ७,००० /- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या मे. देवदर्शन-2 यांनी बांधकामाचा कचरा रस्त्यालगत टाकल्या प्रकरणी रु. १०,०००/- रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच मे.नेस्ट स्कुल यांनी विनापरवानगी विदयुत खांबावर फलक लावल्याबददल रू.५,000/- आला.

# ४.६४ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर** : लग्न समारंभासाठी जाणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. चोरांनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 4 लाख 64 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी अश्विन दादाराव उमरे (37) रा. संजयनगर, पांढराबोडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

रविवारी सायंकाळी अश्विन घराला कुलूप लावून कुटुंबासह नातेवाईकाकडे लग्न समारंभासाठी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 4 लाख आणि सोन्याचे दागिने असा एकूण 4.64 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

# वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या १० आरोपीतांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. १२ :

दिनांक १२/०६/२०२५ रोजी श्रअनिल म्हस्के, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन खापा हद्दीतील मौजा टेंभुरडोह ता. सावनेर येथील टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे अवैधरित्या वेश्याव्यवसाय सुरू आहे. अशी माहीती मिळताच अनिल मस्के यांनी पोलीस निरीक्षक विशाल गिरी, प्रभारी अधिकारी खापा यांच्या नेतृत्वात एक पथक तयार करून त्यांना मौजा टेंभुरडोह ता. सावनेर टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे रवाना होण्याबाबत आदेश दिले. सदर पथकाने टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे धाड टाकली असता आरोपी क्रं १ ) रिसॉर्ट मालक नामे विशाल मधुकर इंगोले, वय ३९ वर्षे, रा पोलीस स्टेशन धंतोली च्या मागे, नागपुर हा मिळुन आला.

रिसॉर्टच्या खोल्यांची तपासणी केली असता ८ पिडीत महीला मिळुन आल्या. पिडीत महीलांची विचारपुस केली असता आरोपी कं २) एक महीला आरोपी हीच्या सांगण्यावरून आरोपी क्र. ३) नामे अमित संताराम अपरेजा, रा. रेचल अपार्टमेंट, कमाल चौक, इंदोरा, नागपुर आरोपी क्र. ४) संजय आनंदराव धापोडकर, रा. बिनाकीनगर, नागपुर आणि आरोपी क्र. ५) सचिन साहेबराव पाटील रा. संजय गांधी नगर, नागपुर हे त्यांच्या कडील चारचाकीने नमुद रिसॉर्ट मध्ये पिडीतांना आणुन, त्यांच्याकडुन देहव्यापार करवुन घेतात व त्याबदल्यात त्यांना पैसे देतात अशी माहीती पिडीत महीलांनी दिली. पोलीसांना रिसॉर्टच्या तपासणी दरम्यान आरोपी कं ६) मनिष कैलास देशमुख, वय ४१ वर्षे, रा. महाकालीनगर, प्लॉट नं ४०, मानेवाडा, नागपुर आरोपी कं ७) नितीन रमेश कोकरडे, वय ३७ वर्षे, रा वार्ड क्र. ३७ वर्षे, रा. वार्ड क्र ४ मोहाडे ले आउट वाडी, नागपुर आरोपी कं ८ ) . दिलीप धर्मराज शाहु, वय ३४ वर्षे, रा वार्ड क २३,आंबेडकर नगर वाडी नागपुर आरोपी कं ९) विनोद लहानुजी मोहजे, वय ४९ वर्षे,रा वार्ड नं. ५ कंट्रोल वाडी, नागपुर आरोपी क्रं १०) किसन मनिराम येसने, वय ३० वर्षे,रा वार्ड क्र २३ आंबेडकर नगर वाडी, नागपुर हे मिळुन आले त्यांना रिसॉर्ट मध्ये कोणत्या कारणास्तव आले या बाबत विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. तसेच पिडीत महीलांनी आरोपी क ६ ते १० हे ग्राहक असल्याबाबत माहीती दिली. नमुद घटनास्थळावरून पोलीसांनी पिडीतांना रिसॉर्ट वर आणण्यासाठी वापरलेली एक फोर्ड कंपनीची चारचाकी वाहन क्रमांक एम. एच. ४९ बी.के. ४१४१ किंमती ३०,००,०००/-,रोख रक्कम १५,०००/- रुपए, आणि इतर साहित्य असा एकुण ३०,१५,०००/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद एकुण आरोपी क्रं १ ते १० यांच्याविरूध्द कलम ३,४,५,६,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सह कलम १४३ भा. न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करून ८ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलीसांनी नमुद रिसॉर्ट मालक आरोपी नामे विशाल मधुकर इंगोले, आरोपी नामे अमित संताराम अपरेजा,आरोपी नामे संजय आनंदराव धापोडकर, आणि आरोपी नामे सचिन साहेबराव पाटील अशा ४ आरोपीतांना अटक केली आहे.

# प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे स्थानकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रवास अधिक सुखकर करण्यासाठी, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात उप स्टेशन अधीक्षक, रेल्वे सुरक्षा बल आणि तिकीट तपासणी कर्मचारी यांची संयुक्त तपासणी टीम तयार करण्यात आली आहे.

ही समन्वित कारवाई प्रमुख स्थानकांवर राबवण्यात येत आहे. ही टीम प्लॅटफॉर्म, प्रतीक्षागृह व प्रवाशांच्या इतर भागांमध्ये दिवसातून अनेक वेळा तपासणी करते, ज्यामुळे अधिकृत प्रवाशांची उपस्थिती सुनिश्चित करता येते आणि असामाजिक तत्वांना रोखता येते. तपासणी दरम्यान बिनतिकीट प्रवास, अनधिकृत व्यक्तींची उपस्थिती किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास रेल्वे नियमांनुसार त्वरीत कारवाई केली जाते.



यामध्ये अनधिकृत व्यक्तींना स्थानकाबाहेर काढणे, दंड लावणे आणि आवश्यक असल्यास स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधणे यांचा समावेश होतो. या उपक्रमामुळे रेल्वे स्थानकांवरील सुरक्षिततेत लक्षणीय वाढ झाली असून, प्रवाशांनी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना आवाहन करते की त्यांनी तपासणीदरम्यान सहकार्य करावे व कोणतीही संशयास्पद गोष्ट दिसल्यास त्वरित माहिती द्यावी. मदतीसाठी अथवा तक्रारीसाठी प्रवासी 24७7 रेल्वे हेल्पलाईन क्रमांक 139 वर संपर्क साधू शकतात.

# चित्रकलेमुळे माणसाच्या भौतिक, वैचारिक क्षमतेचा विकास होतो : संगीता मांढरे

## केडी आर्ट व ग्राफिक्सच्या वतीने चित्रकला प्रदर्शनीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १२ :

चित्रकलेमुळे माणसाच्या भौतिक आणि वैचारिक क्षमतांचा विकास होतो असे प्रतिपादन पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या पोलीस निरीक्षक संगीता मांढरे यांनी केले. के.डी. आर्ट अँड ग्राफिक्सच्या वतीने नागपुरातील जवाहरलाल दर्डा आर्ट गॅलरीत आयोजित तीन दिवसीय व्हॅनिशिंग व्हॉइस या चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.



प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात व्यंगचित्रकार संजय मोरे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी मोरे म्हणाले चित्रकलेची साधना व त्याचा सराव सातत्याने सुरू असला पाहिजे. आपल्या चित्राविषयी बोलता यायला पाहिजे. मोरे यांनी कृणाल धनजोडे यांचे हुबेहूब व्यंगचित्र साकारून उपस्थितांची दाद मिळवली. आयोजक कृणाल धनजोडे यांच्या मार्गदर्शनात के.डी. आर्ट अँड ग्राफिक्स च्या विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांच्या माध्यमातून प्राण्यांच्या भाव भावना प्रतिपादित केल्या. शिल्प चित्रकार हर्ष चिकणे यांनी शिल्पकलेचे व निशांत चिरुटकर यांनी जलरंगाचे प्रात्यक्षिक तर अभिषेक कोसरे यांनी मातीच्या वास्तववादी शिल्पाचे प्रात्यक्षिक सादर केले.

प्रदर्शनी मध्ये सहभागी कलाकारांना प्रख्यात चित्रकार आणि रांगोळी आर्टिस्ट प्रकाश बेतावार यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. तीन दिवसीय चित्रकला प्रदर्शनी मध्ये कलाकारांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण सुद्धा केले.

सिद्धेश वंजारी यांनी श्रीराम चरित्राचं केलेलं गायन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना केडी आर्ट व ग्राफिक्स च्या वतीनेपारितोषिक वितरण करण्यात आले. विविध कलाकृतींची कलाप्रेमींनी प्रदर्शनीतून खरेदी सुद्धा केली. अनेक विदेशी पर्यटकांनी प्रदर्शनी मध्ये हजेरी लावली.

कृणाल धनजोडे द्वारा नागपूर शहरातील 200 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना आजतागायत प्रशिक्षण देण्यात आले आहे. आज पर्यंत अनेकदा केडी आर्ट व ग्राफिक्सच्या माध्यमातून कला प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. कृणाल धनजोडे द्वारा विविध चित्रकला प्रकार, एलिमेंट्री व इंटरमिजिएट तसेच सीईटी चे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. प्रदर्शनीच्या यशस्वीतेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांनी सदर उपक्रमाची प्रशंसा केली

# मोबाईल स्नॅचर गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

रामदासपेठ परिसरात एका वृद्धाचा मोबाईल हिसकावून पळालेल्या दोन मोबाईल स्नॅचर्सना पोलिसांनी अटक केली. चौकशीत आरोपींकडून आणखी एक गुन्हा उघडकीस आला. जुनैद खान अख्तर खान (19) रा. सिंधीबन झोपडपट्टी, मोठा ताजबाग आणि शेख शाहबाज शेख फारूख (22) रा. आझाद कॉलनी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी सुधाकर मोरे (80) रा. धरमपेठ हे गत 22 मेच्या सकाळी 6.30 वाजताच्या सुमारास घरून मॉर्निंग वॉक करण्यासाठी निघाले होते. रामदासपेठ परिसरात दुचाकीस्वार आरोपींनी त्यांचा मोबाईल हिसकावून पळ काढला. त्यांच्या तक्रारीवरून सीताबर्डी पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर आरोपींचा सुगावा लागला. पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिस कोठडी घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी ठाण्यांतर्गतच आणखी एक मोबाईल पळविल्याची माहिती दिली. पोलिसांनी आरोपींकडून दोन्ही मोबाईल फोन जप्त केले.

# देवरांजन बहुउद्देशीय संस्थेचा तेरावा वर्धापन दिन संपन्न

## शिवचरित्र नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे कार्य उत्तम : श्रीमंत राजे मुधोजी भोसले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. मानवी मनापासून तर पर्यावरण जपण्यापर्यंत छत्रपतींनी घालून दिलेला आदर्श आजही मार्गदर्शक ठरतो. शिवरायांच्या आठवणींना नृत्यनाट्याच्या माध्यमातून उजाळा देत नव्या पिढीवर त्याद्वारे संस्कार घडविण्याचे कार्य करणाऱ्या नागपुरातील समस्त कलाकारांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे, असे प्रतिपादन श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनी काल येथे केले.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित देवरंजन बहुउद्देशीय संस्थेचा तेरावा वर्धापन दिन आणि उन्हाळी संस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अ.भा. मराठी नाट्य परिषद मध्यवर्तीचे उपाध्यक्ष डॉ. नरेश गडेकर, सुप्रसिद्ध चित्रपट कलावंत देवेंद्र दोडके, देवेंद्र लुटे, आसावरी तिडके, इनसाइडर मीडिया अँड एंटरटेनमेंटचे संस्थापक हनी खट्टर, मधुलिका रेकॉर्डिंग स्टुडिओचे संचालक चारुदत्त जिचकार यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना अ.भा. मराठी नाट्य परिषद मध्यवर्तीचे उपाध्यक्ष नरेश गडेकर यांनी देव रंजन संस्थेच्या कायार्चा गौरव केला नवीन कलाकार घडविण्यासाठी या संस्थेने अधिक प्रयत्न करावे यासाठी आपल्या भाषणातून त्यांनी शुभेच्छा दिल्या.

देवरंजन बहुउद्देशीय संस्थेद्वारा विविध ठिकाणी रयतेचा राजा आणि शिवबाचा छावा या दोन नृत्य नाटिकांचे सादरीकरणाच्या माध्यमातून अनुक्रमे छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील उत्तुंग प्रसंग प्रदर्शित करण्यात आले. त्याचे श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांनी तोंड भरून कौतुक केले.



प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. जान्हवी घुले हिच्या गणेश वंदनेने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर शिबिरार्थींनी विविध नृत्य, प्रहसन आणि गीते सादर केलीत.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या बालनाट्य स्पर्धेत रौप्य पदक पटकाविणारा देवरंजन संस्थेचा कलाकार व्यंकटेश माकडे, नागपूरचे सुप्रसिद्ध रंगभूषाकार बाबा खीरेकर, मालिका आणि नाट्य कलावंत अविनाश वेखंडे, दामिनी क्रिएशनचे संचालक संदीप दयार्पूरकर, एन प्लस स्टुडिओच्या जान्हवी आणि अनुष्का, डिजिटल धंदाचे लोकेश राव आदींचा सन्मानचिन्ह देऊन पाहुण्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रवीण देशकर यांनी तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. रवींद्र भुसारी यांनी केले.

छत्रपतींच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून देवरंजन बहुउद्देशीय संस्थेद्वारा निर्मित 'रयतेचा राजा' आणि 'शिवबाचा छावा' या नृत्य नाटिकेचे विशेष प्रयोग या कार्यक्रम दरम्यान सादर करण्यात आले. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रमुख भूमिका नृत्य नाटिकेचे लेखक, दिग्दर्शक आणि नृत्यदिग्दर्शक चिन्मय देशकर याने वठविल्या. बाल शिवराय राम राठी, जिजाऊ समाप्ती देशकर, शिवाजी महाराज प्रीतम भागवतकर, येसूबाई पूनम काटोले, ताराराणी मृणालिनी देशकर, शाहीर आणि कविकलश राजेश चवडे, अफजल खान आणि औरंगजेब प्रा. अजय वेखंडे या कलाकारांनी नाटकात विशेष रंग भरला. याशिवाय पूनम काटोले, शिवांग राऊत, शौर्य ठाकरे, प्रियांक जामुनपाने, कुलदीप तायवाडे, देवांशू डोरले, दीपक सुपलकर, किमया ननयी इत्यादी ७० हून अधिक कलाकारांचा कार्यक्रमात समावेश होता.

# पिली मारबत चौकात रेशन धान्याच्या काळाबाजाराचा पर्दाफाश

## ४० क्विंटल तांदूळ जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

शहरात गरिबांसाठी असलेल्या रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांविरोधात पाचपावली पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे 40 क्विंटल तांदूळ जप्त केला. या प्रकरणात अकबर खान नावाच्या इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. धान्य वितरण मंडळ क्रमांक 5, इतवारीचे अधिकारी वैभव खैरकर यांना गुप्त माहिती मिळाली की, पिली मारबत चौकाजवळील एका टिनशेडमध्ये रेशन तांदूळ साठवला जात आहे. या माहितीच्या आधारे बुधवारी त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह अचानक धाड टाकली. टिन शेडमध्ये तपासणी केली असता तेथे 'टिपू किराणा' व 'न्यू स्टार स्टील फर्निचर' दुकानाजवळ 127 पोत्यांमध्ये साठवलेला तांदूळ सापडला.

तपासादरम्यान सागर जयस्वाल या चालकाला घटनास्थळीच पकडण्यात आले. तो विविध घरांमधून 20 रुपये किलो दराने तांदूळ खरेदी करून अकबर खानला 22 रुपये किलो दराने विकत असल्याची कबुली दिली. धान्य वितरण मंडळाचे अधिकारी खैरकर यांनी पाचपावली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, भारतीय आवश्यक वस्तू कायदाच्या कलम 3, 7 अंतर्गत अकबर खानविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. वृत्त लिहिपर्यंत पोलिसांनी अकबर खानला ताब्यात घेतले होते आणि त्याचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू होते. हा तांदूळ सरकारी योजनांसाठी वितरित केला जाणारा असल्याने, त्याच्या काळाबाजारामुळे गरजू लोकांचे मोठे नुकसान झाले आहे. पाचपावली पोलिस अधिक तपास करत असून, यात आणखी आरोपी सहभागी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मोहन नगर परिसरातील शक्ती नाल्याची मनपा आयुक्तांनी केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी गुरुवारी (ता.12) मोहन नगर परिसरातील शक्ती नालासफाईच्या कामाची तसेच त्यावरील अतिक्रमणाची पाहणी केली. शक्ती नाल्यातील पाणी पावसाळ्यात विनाअडथळा वाहून जाईल, याची व्यवस्था करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी उपायुक्त राजेश भगत, मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त हरीष राऊत, मंगळवारी झोनचे कार्यकारी अभियंता सुनील उईके, मुख्यालयातील झोनल अधिकारी लोकेश बासनवार, उपअभियंता राजेश वानखेडे, कनिष्ठ अभियंता गणेश वाळवे, मंगळवारी झोनल अधिकारीप्रमोद आत्राम, झोनचे मुख्य स्वच्छता अधिकारी भूषण गजभिये, माजी नगरसेवक संजय बुरेवार यांच्यासह परिसरातील इतर नागरिक उपस्थित होते.



सदर, मोहनगर पोस्ट ऑफिस आणि रेल्वे स्टेशन दरम्यान शक्ती नाला आहे.

मनपातर्फे पावसाळ्यापूर्व कामाध्ये नाल्यातील ७ टिप्पर गाळ काढून नाला स्वच्छ करण्यात आला आहे. काही भागात नाला समतल नाही. नाल्यातील पाण्याचा प्रवाह एकाच ठिकाणी थांबत असल्याने पावसाळ्यात नागरिकांना प्रचंड त्रास होतो.

यासंदर्भात नागरिकांनी मनपा आयुक्तांची भेट घेऊन या भागाची पाहणी करण्याची विनंती केली होती. त्यानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी गुरुवारी मोहननगर परिसरातील शक्ती नाल्याची पाहणी केली.

यावेळी त्यांनी जेसीबी, पोकलॅण्ड आणि गरज भासल्यास अतिरिक्त मनुष्यबळाची मदत घेऊन नाला सफाई करण्याचे निर्देश दिले.

याशिवाय नाल्यातील पात्रातील ठिकाण समतल करण्याचे, नाल्यावरील तुटलेली भिंत दुरुस्त करण्याचे निर्देश मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला त्यांनी दिले. तसेच नाल्यावरील जुने शौचालय काढण्याचे निर्देश अतिक्रमण विभागाला दिले. रेल्वे रुळाखालून जाणाऱ्या नाल्याची योग्य दुरुस्ती करण्याचे तसेच मोहननगर परिसरातील अतिक्रमण विरोधात कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी दिले.

# बीएमडब्ल्यूचा मालक कुटुंबासह फरार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

मोटारसायकलस्वाराला धडक मारून पळालेल्या बीएमडब्ल्यू कारचा चालक कुटुंबासह गायब झाला असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. अवंतीकुमार कोठारी रा. दारोडकर चौक, सीए रोड असे कार मालकाचे नाव आहे.

गत शनिवारी रात्री 3 वाजताच्या सुमारास कार क्र. एचपी-89/ए-1592 च्या चालकाने चिंचभवन चौकात दुचाकीस्वार योगेश तुळशीराम बोपचे (29) रा. जगदीशनगर, गिट्टीखदान आणि त्याचे नातेवाईक भोजेंद्र खोब्रागडे (55) रा. बालाघाट यांना धडक दिली होती. यात दोघेही गंभीर जखमी झाले आणि त्यांना उपचारार्थ एम्स रुग्णालयात भरती करण्यात आले. रविवारी सायंकाळी योगेशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर कार चालकाने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र काही अंतरावर जाताच कारचा टायर फाटला. त्यामुळे आरोपी चालक कार तेथेच सोडून फरार झाला होता. पोलिसांनी कारच्या नोंदणी क्रमांकावरून मालकाचा शोध लावला. ही कार हिमाचल प्रदेशातील एका व्यक्तीच्या नावाने नोंदणीबद्ध होती. मात्र त्यांनी कार मुंबईचा ऑटो डीलर शाहरूख ताहिर खान याला विकली होती. पोलिसांनी शाहरूखशी संपर्क केला असता त्याने काही दिवसांपूर्वीच एका ऑटो डीलरच्या माध्यमातून ती कार नागपूरच्या अवंतीकुमार कोठारीला विकल्याची माहिती मिळाली. कोठारी हा सुद्धा ऑटोडीलर असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिस जेव्हा कोठारीच्या घरी पोहोचले, तेव्हा माहिती मिळाली की, तीन-चार दिवसांपूर्वीच तो घराला कुलूप लावून कुटुंबासह गायब झाला. पोलिसांना कारमध्ये चालकाचा मोबाईल फोन मिळाला होता, जो पोलिसांनी जप्त केला आहे. योगेश मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. त्याला दोन मुले आहेत. 5 वर्षांचा चिराग पहिल्या वर्गात शिकतो, तर दुसरा मुलगा कियान आता केवळ 5 महिन्यांचा आहे. योगेशच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे.

# धुरखेडा येथे सरपंच व ग्रामसेवकाचा मनमानी कारभार

## सरपंच बायको तर नवरा करतो ढवळाढवळ

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १२ :

धुरखेडा येथील सरपंच यांनी उपसरपंच व सदस्यांना विश्वासात न घेता आपल्याच मर्जीने कारभार चालवत असल्याचा आरोप उपसरपंच पवन पेंदाम यांनी केला.

निकीता भोंगळे सरपंच पदावर असताना पती पंकज भोंगळे प्रत्येक कामामध्ये ढवळाढवळ करीत ग्रामपंचायत मध्ये संगणक हाताळण्याचे काम करत असतात. ग्रामपंचायतीच्या सामान्य फंडात 11 लाख रुपये असताना सरपंच आणि ग्रामसेवकांनी रस्त्याच्या कामात आठ लाख खर्च केले. उपसरपंच पवन पेंदाम व सदस्य यांचा विरोध असताना सरपंच व सचिवांनी मनमानी ठराव काढून गरज नसताना गावात सिमेंटीकरण कामाचे कुठलाही ठराव ग्रामपंचायत मध्ये सादर न करता आठ दिवसात काम पूर्ण करून ठेकेदाराचे बिल पास करण्यात आले. अजून पर्यंत धुरखेडा ग्रामपंचायत मध्ये वार्षिक अंदाजपत्रक सादर केल्या नसल्याचा आरोप उपसरपंच पवन पेंदाम यांनी केला आहेत.




# अखिल भारतीय अग्रवाल परिचय मेळाव्याला देशभरातून प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणारा अखिल भारतीय अग्रवाल एकता क्लब पहिल्यांदाच वधू-वर परिचय मेळाव्याच्या आयोजन करीत आहे. या कार्यक्रमासाठी अपेक्षेपेक्षा जास्त 400 युवक युवतींची देशभरातून नोंदणी झाली आहे. नागपूर शिवाय अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हैदराबाद, याशिवाय देशातील विभिन्न भागातून युवक युवती सहभागी होणार आहे. अशी माहिती अखिल भारतीय अग्रवाल एकता क्लबचे अध्यक्ष गिरीश लीलाडिया व चेअरमन प्रकाश अग्रवाल यांनी पत्र परिषदेत दिली.

# रमाईचा रौप्य महोत्सवी प्रयोग

**नागपूर :** राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय धरमपेठ नागपूर आयोजित प्रभाकर दुपारे लिखित आणि शंकर शंखपाळे दिग्दर्शित रमाई या एकपात्री नाटकाचा रौप्य महोत्सवी प्रयोग 13 जून रोजी सायंकाळी ६:३० वाजता. केंद्रीयमंत्री रस्ते वाहतूक परिवहन व महामार्ग नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत सायंटिफिक सभागृहात आठ रस्ता चौक लक्ष्मी नगर येथे सादर होणार आहे.

प्राचार्य राम शेवाळकर प्रतिष्ठान नागपूर निर्मित रमाई या एकपात्री नाटकाचे प्रयोग महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी सादर झाले आहे. रौप्य महोत्सवी प्रयोग सादर होण्याचा नागपूरच्या नाट्य इतिहासात ही अभूतपूर्व घटना आहे. कलावंत आणि तंत्रज्ञांचा सत्कार नितीन गडकरी साहेबांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# ऑनलाईन वसतीगृह अर्ज प्रक्रिया सुरू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, शासकीय निवासी शाळा चालविली जातात. शैक्षणिक सत्र 2025-26 वसतीगृह ऑनलाईन प्रवेश प्रकिया 11 जून पासून सुरु झाली आहे. वसतीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता https//hmas.mahait.og या पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मागासवर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान, समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे तसेच, त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था, क्रमिक पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य इत्याही सोयी सुविधा पुरविण्यात येते. सामाजिक न्याय विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाच्या अधिनस्त नागपूर जिल्ह्यात शहरी भागात मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण 14 वसतीगृहे तसेच तालुका स्तरावर मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण 11 असे एकूण 25 शासकीय वसतीगृह नागपूर जिल्ह्यात कार्यान्वित आहेत.

# एमटीडीसीच्या वुमन लाउंजचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील एमटीडीसी, हॉटेल येथील वुमन्स लाउंजचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव(पर्यटन) अतुल पाटने (भा.प्र.से.) आणि एमटीडीसी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी एमटीडीसीचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश कांबळे, अधिकारी सुनिल येताळकर, वास्तुविशारद अशफाक अहमद, मुस्कान बेग, सहाय्यक पर्यटक निवास व्यवस्थापक, वैशाली भांडारकर, पर्यटक व महामंडळातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

हे वुमन्स लाउंज पर्यटक निवासात वास्तव्यास आलेल्या पर्यटक महिलाकरीता उपलब्ध राहणार असून यात आरामदायी मसाज चेअर, म्युझिक सिस्टम, स्मार्ट टीव्ही, एसी, योगा मॅट, करावोके आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. येथे मेहंदी, गरबा, झुम्बा, योगा, करावोके ई. चे वर्ग घेता येतील. याशिवाय, एक्झिबिशन हॉल व बँक्वेट हॉलदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# मनपा आयुक्तांनी घेतला जागतिक योग दिन कार्यक्रमाच्या तयारींचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

जागतिक योग दिनाचे औचित्यसाधून नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शनिवार २१ जून रोजी सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रमाची तयारी, स्वरूप आणि विविध संस्थांच्या सूचना जाणून घेण्याच्या दृष्टीने सोमवार (ता.९) रोजी नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

मनपा मुख्यालयातील आयुक्त सभाकक्षात आयोजित बैठकीत मनपाचे उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी पियुष आंबुलकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय योगपटू धनश्री लेकुरवाळे, माजी उपमहापौर सुनील अग्रवाल, अनिल मोहगावकर, प्रशांत राजूरकर, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय सक्करदरा, जनार्धन स्वामी योगाभ्यासी मंडळ, हौशी नागपूर योगासन असोसियेशन, वाय के. ग्रुप ऑफ इंस्टीट्युट, पतंजली, दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेज हिंगणाचे प्रतिनिधी उपस्थित होते.




बैठकीत सर्वप्रथम उपायुक्त श्री. विनोद जाधव यांनी आयोजनाची माहिती दिली. त्यानंतर आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाच्या तयारींचा आढावा घेत, सर्व संस्थांच्या सूचना जाणून घेतल्या. पावसाळा असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासंदर्भात चर्चा करून त्याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले.

नागरिकांना योगाचे महत्व पटावे, त्यांनी योगासाठी पुढे यावे या हेतूने योग मंडळ व संस्थांच्या सहकार्याने दरवर्षी मनपातर्फे जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

# चोरांनी २ बिअर बारचे कुलूप तोडले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

ठाण्यांतर्गत चोरांनी एकाच रात्री दोन बिअर बारचे कुलूप तोडून 2 लाख 31 हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या प्रकरणी पोलिसांनी जयचंद जगन्नाथ गायधने (46) रा. चंद्रभागानगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

जयचंद यांचे घराजवळच प्राईड बिअर बार ॲन्ड रेस्टॉरेंट आहे. रात्री 12 वाजताच्या सुमारास ते बार बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपींनी त्यांच्या बारचे शटर मध्यभागातून उचकवत आत प्रवेश केला. गल्ल्यात ठेवलेली 1.50 लाखाची रोकड चोरी केली. त्यानंतर आरोपींनी जयचंद यांच्या बारपासून काही अंतरावरच असलेल्या जयेश शंभूवानी रा. राजापेठ यांचा चाणक्य बारकडे मोर्चा वळवला. त्यांच्याही बारचे शटर मध्यभागातून उचकवत आरोपी आत शिरले. गल्ल्यात ठेवलेली 81,600 रुपयांची रोकड चोरून नेली. अशा प्रकारे आरोपींनी दोन्ही बारमधून 2.31 लाख रुपयांची रोकड चोरी केली.

# गब्बरला महिला सरपंचांचे कडवे अव्हान!



भिवापूर तालुका वार्तापत्र

राजू जांभुळे

भिवापूर पासून ३० किमी दूर अंतरावर असलेल्या ग्राम पंचायत मांगरुड आहे. या गावाची लोकसंख्या २५०० इतकी असून. सध्या हे उमरेड विधानसभा क्षेत्रात चांगलीच चर्चेत आहे. या गावात मागील बऱ्याच वषार्पासून एकमेकांविरुद्ध गटागटाचे राजकारण सुरू असल्याने गावाच्या विकासाचा रथ सध्यातरी थांबला असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. त्याला कारणही मोठ आहे. २०२३ मध्ये येथे १० सदस्य संख्या असलेल्या ग्राम पंचायतीच्या निवडणूकीत थेट जनतेतून महिला सरपंच म्हणून मंजुषा जिभकाटे या सरपंच म्हणून निवडून आल्या. त्यांच्या पॅनल चे इतर दोन सदस्य ही विजयी झाले.तसेच मागील वीस वषार्पासून राजकारणात सक्रीय असणारे गब्बर रेवतकर यांच्या सह या गटाचे ७ सदस्य निवडून आले. त्यामुळे त्यांच्याकडे बहुमताचा आकडा होता. याच संधीचा लाभ घेत गब्बर रेवतकर यांनी मासिक सभा व ग्रामसभेत आलेल्या गावाच्या विकासाची कामे, समस्या, व इतर महत्वाच्या गोष्टीवर करण्यात आलेली चर्चा व गावाचा विकास आराखडा या विषयाला यांच्या सदस्याने सुरवाती पासून तीव्र विरोध करण सुरू केले.

गावातील निवडणुका पार पडल्यानंतर सर्वांनी वैयक्तीक मतभेद विसरून गावाच्या विकासा करीता एकत्र येण्याची गरज होती. परंतु तसे मात्र घडले नाही. तक्रार करण्याची जुनी सवय असलेल्या गब्बर रेवतकर यांनी सरपंच मंजुषा जिभकाटे यांच्या एक वर्षाच्या कार्यकाळतील भष्ट्राचाराची प्रकरणे भिवापूर येथे पत्रपरिषदेत समोर ठेवली. सरपंच जिभकाटे यांचेवर भष्ट्राचाराचे आरोप केले होते. त्यानंतर लगेच सरपंच मंजुषा जिभकाटे यांनी पलटवार करीत पत्र -परिषद घेवून उपसरपंच गब्बर रेवतकर यांनी केलेले आरोप केवल विरोधासाठी विरोध करणे हेच असल्याचे सांगून त्यांच्या आरोपाची हवाच काढून टाकली होती.

**एकामेका विरोधात तक्रारीचा सिलसिला!**

मांगरुड ग्राम पंचायत च्या २०२३ ला झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत थेट जनतेतून नव्याने सरपंच मंजुषा जिभकाटे निवडूण आल्या. कोणताही राजकीय पश्वभुमी नाही. बीए भाग -१ पर्यत शिक्षण घेतलेल्या नविन महिला चेहरा म्हणून मंजुषा जिभकाटे यांना सामाजिक कार्यात आवड असल्याने त्यांनी नियमीत कर भरणाऱ्यांकरीता लकी ड्रॉ ची योजना राबविली. त्यात नागरीकांना एल सी डी टिव्ही वितरीत केले. मात्र अल्पावधीत त्यांना राजकीय मंडळी वाईट अनुभव आल्याने उपसरपंच गब्बर गटाच्या दोन सदस्या विरुद्ध शासकीय जमिनीचे अतिक्रमण प्रकरण मात्र अल्पावधीत विकासाच काम करताना या राजकीय मंडळीचा चांगला अनुभव न आल्याने उपसरपंच गब्बर गटाच्या दोन सदस्या विरुद्ध शासकीय जमिनीचे अतिक्रमणाचे प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी याचे कडे दाखल केले. या दोन सदस्या विरुद्ध अतिक्रमण सिद्ध झाल्याने त्यांना सदसत्व गमवावे लागले. त्यामुळे उपसरपंच गब्बर रेवतकर यांच्या गटाला एकच धक्का बसला. त्यानंतर सरपंच गटाकडून उपसरपंच गब्बर रेवतकर विरुद्ध यांच्या विरोधात शासकीय जागेवर अतिक्रमणा च प्रकरण दाखल करण्यात येवून त्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर उपसरपंच गब्बर यांनी सरपंच मंजुषा जिभकाटे याचेविरुद्ध शासकीय जमिनीचे अतिक्रमण व अपात्रता अशी दोन प्रकरणे गब्बर रेवतकर गटाकडून दाखल करण्यात आली आहे. गब्बर रेवतकर यांना गावाच राजकारण करतांना या पुर्वी राजकीय कडवे आव्हान पूर्वी कुणाकडून मिळते नव्हते. मात्र आता महिला सरपंच मंजुषा जिभकाटे याचेकडून त्यांना कडवे आवहान मिळत आहे. त्यांनी सुरू केलेली लढाई आता त्यांना लई भारी जात असल्याची चर्चा तालुक्यात रंगत आहे. सरपंच व उपसरपंच यांनी एकामेका विरुद्ध प्रकरणे अप्पर जिल्हाधिकारी नागपूर याचेकडे टाकली असून सदर प्रकरणे चौकशीत फेऱ्यात अडकली आहे.